IRBK-0100545

म ग्रं सं वाचनालय शाखा ठाणे
विषय नाटक
दा क्र ५४५

IRBK-0100545
IRBK-0100545

३५ दा. ग्र. ५४५

१८६ - ७१८३.००

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

सूचना :– खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५(८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

5 OCT 1990

K V. Dalar

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
नोंदणी क्र.
विभाग
क्रमांक
नों. दि.

॥ श्रीगजानन प्रसन्न ॥

# रण–रागिणी.

लेखक—

**रा. रा. शांताराम गोपाळ गुप्ते,**

"हिरा हरपला, विजय–वैजयंती, संगीत रक्त–ध्वज, वेणु–नाद, हिंद–संतान" वगैरे नाटकांचा कर्ता.

प्रकाशक—

**नरहर रामचंद्र जोशी,**

"सुदर्शन" ऑफीस, खेतवाडी मुंबई नं. ४.

IRBK-0100545

प्रथमावृत्ति.

एप्रिल सन १९२३ ईसवी.

किंमत १। रुपया.

मुद्रक—काशिनाथ यशवंत माने,
" स्टँडर्ड " प्रेस, ७३–७५, १ ली, सुतार गल्ली मुंबई, नं. ४.
प्रकाशक—नरहर रामचंद्र जोशी,
" सुदर्शन " ऑफीस, ११, खेतवाडी, मुंबई, नं. ४.

# द्राक्षार्कमधु

## रक्तशुद्धि व धातुवृद्धिकारक.

हा अजबवल्ली द्राक्षार्कमधु कोंकणांतील अनेक वनस्पतींच्या रसांत द्राक्षांचा रसमिश्र करून हा " द्राक्षार्कमधु " स्वदेशी यंत्रसहायानें तयार केला आहे.

हा मधु महौषधी असून फार गोड व स्वादिष्ट आहे. हा मधु खाल्ल्यानें वात, पित्त, कफ या त्रिदोषांच्या मिश्रणानें होणाऱ्या व्याधि जातात. लघवीच्या पूर्वी अगर नंतर स्रवून जाणारी धातु बंद होते. स्वप्नावस्था होत नाहीं. वीर्यवृद्धि होते. पर्मा व गर्मी यांनीं दूषित झालेलें शरीर निर्दोष होतें. तीन दिवसांत गुण प्रत्ययास येतात. तरुण स्त्रिया व पुरुष यांनीं या द्राक्षार्कमधूचें सेवन करून यांतील खरी मजा पहावी. यानें क्षयरोग, उदररोग, दमा, यांचा नाश होतो. दिवसांतून तीन वेळां जेवलें तरी अन्न पचून भूक चांगली कडकडून लागते. याचा अनुभव पहिले दिवशींच येतो. शौचास साफ होतें. अंगांत कितीहि वर्षांची मुरलेली कडकी असो, एका सप्तकांतच नाश होतो. या औषधांस पथ्य नाहीं. नवा रोग असल्यास दहा दिवस पुरणाऱ्या एका बाटलीने गुण येतो. जुना रोग असल्यास तीन बाटल्यांनीं गुण येतो. एका बाटलीची किंमत १। रु. तीन बाटल्यांची किं. ३८४ तीन बाटल्या एकाच पार्सलांत भरून पाठवूं म्हणजे टपालखर्च जास्त पडणार नाहीं. डझन बाटल्यांची किं. ११ रु. शिवाय एक बाटली मोफत. टपालखर्च वेगळा पडेल. एजंटमार्फत १ बा. १। रु. ३ बा. ३॥ रु. डझनास १३ रु.

**म्यानेजरः—द्राक्षार्कमधु ऑफिस, पोस्ट निपाणी,**

**जि. बेळगांव.**

श्री. रा. रा. शांताराम गोपाळ गुप्ते,

यांची

लौकरच रंगभूमीवर येणारीं नाटकें

संगीत

पौराणिक ] **वेणु—नाद !** [ पौराणिक

निनाद १ ते ३

संगीत

सामाजिक ] **हिंद—संतान !** [ सामाजिक

गद्य

पौराणिक ) **विजय वैजयंती** ( पौराणिक

# बाळे रण-रागिणी !-

बरोबर पासष्ट वर्षांपूर्वीचें तुझे पीताजी मोरोपंत तांबे आज हयांत नाहींत तुझाहि नाशिवंत देह, तुझ्या कर्तृत्वाची मनमोहन छबी प्रत्येक इतिहास भक्ताच्या हृदयांत अजरामर अशी उभी करून कालवश झाली; पण आज पुन्हां तुला " बाळे " अशी वात्सल्य प्रेमानं हाक मारण्याचं भाग्य मला मिळालं ! या जगांतला जन्म तुला मोरोपंतानीं दिला, पण तुझ्या दिव्य कर्तृत्वाची संजीवनी करून, तुझी साधारण कां होईना, मूर्ति नाट्य-सृष्टींत उभी करण्यास मी कारणीभूत झालों ! नाट्य, कल्पना आणि उपलब्ध असलेली तुझी कार्य-सामुग्री या त्रयींचा प्रमाणांत मिलाफ करतांना क्वचित्प्रसंगीं नाट्याकरतां सत्याला दूर सारून, कल्पनेकडं धांव घ्यावी लागली तर क्वचित् ठिकाणीं इतिहासालाच महत्व देणें जरूर असल्यामुळं, नाट्याला दृष्टी आड करावं लागलं ! त्याचप्रमाणं इतिहासांत नाट्याच्या दृष्टीनं विस्कळीत असलेला त्वत्कालीन कथाभाग सरळ रेषेंत मांडण्याकरतां,-तुझ्या प्रभावळींत निरनिराळे रंग भरतांना, सत्याबरोबरच कल्पनामय रंगाचा उठाव तींत भरावा लागला !-काल्पनीक सुंदरलाल, कामिनी, हेस्टी यांच्या निरनिराळ्या प्रसंगांचा भडकपणा नाट्याकरतां तर आहेच पण सत्यसृष्टीलाहि तो फारसा सोडून नाहीं !-त्वत्कालिन जनानी गोष्ट बाजूला सारून, द्वितीय-झंकाराच्या शेवटीं तुझा प्रत्यक्ष प्रवेश भरदरबारांत दाखवला आहे यावद्दल मला मराठी इतिहासकारांचा जरी नसला तरी नाट्याचा आणि (Medows Teller) मेडोझ टेलर या इंग्रज गृहस्थाच्या पुढील वाक्याचा तात्पुरता तरी आधार आहे !

" The Ranee Lukshumee Bye, a maratha Bramhin lady had no affection of personal Concealment." (SECTA. PAGE 247.) यामुळं किंवा एखाद्या साधनाच्या अभावी, तुझी मूर्ति कल्पनेच्या कुंचलीनं रेखाटतांना भलत्याच ठिकाणीं तुला वैगुण्य आलं असेल किंवा एकादा भलताच आरोप तुझ्यावर केला गेला असेल तर त्याची मी मनःपूर्वक तुला क्षमा मागतों !

रण-रागिणी ! " युवती " आणि " रणांगण " या भिन्न कल्पना एके ठिकाणीं करतांना परस्पर विरोधी भावनांचा जितका गोंधळ होतो तितकाच गोंधळ " रण-रागिणी " आणि " झंकार " या दोन कल्पनांचा जरी असला

तरी पण रणरागिणी, तूं नेपोलिअन नव्हेस, तैमूरलंग नव्हेस किंवा औरंगजेबहि नव्हेस !

कोमल विचारांची, पवित्र आचारांची तूं एक स्त्री आहेस ! पुरुषांच्या सहज सिद्ध कठोरपणा कर्तव्याच्या आंचीमुळं तुझ्यांत आला ! जात्या कोमल पण कर्तव्यामुळं कठोर बनलेल्या जिवाच्या कृतीला शब्दानं संबोधणं ह्मणजे त्या कृतीचा विपर्यास करण्यासारखं आहे ! शृंगार--रसांत तुझं चरित्र लिहिण्याचा प्रसंग इतिहासानं मला दिला असता तर शृंगार--मंदिरांतल्या तुझ्या नूपुर--झंकाराबद्दल कोणालाच शंका आली नसती ! पण दुदैवानं शृंगाराऐवजीं रणरंग तुझ्या ऊलाटीं आला ! नेपोलिअनच्या रणरंगाला " दणदणाट " ही शब्द योजना योग्य होईल पण तुझ्या सारख्या स्त्रीच्या मर्दाईला कोमल शब्दानंच संबोधायला नको कां ? साहित्याला सोडल्याप्रमाणं प्रथम वाटेल परंतु साहित्याचा संबध जर मनोभावनांशीं आणि परिस्थितीशीं येत असेल तर तुझ्यासारख्या स्त्रीच्या "दणदणाटाला " " झंकार " अशा " संगीत " उपमेनंच संबोधण मला योग्य वाटतं !—

दुर्दैवी बाळे, इहलोकचा तुझा जीवनक्रम निराशेशीं झगडतांना संपला; दुर्दैवाच्या दर्यांत यशाची नौका सांपडेल या फोल आशेनं, त्या दुर्दैवाच्या लाभाशीं झुंजतां झुंजतां, तुझा अभागी आत्मा अनंतांत विरून गेला ! तरी सुद्धां दुर्दैवानें तुझा पाठपुरावा सोडला नाहीं ! रंगभूमीवर तुझा जन्म एकाद्या दुर्दैवी पोराप्रमाणं दैन्यांत झाला ! लक्ष्मी, रंगदेवीच्या रणांगणात तुझा जन्म होताना–तुझ्या स्वर्गस्थ आत्म्याच्या पुण्याईमुळं–तुझ्या नाटय–चरित्राला आलेली अपूर्व उसळी पाहण्याचं भाग्य मला मिळालं नाहीं !–तुझी नाटय माता तुझ्या पित्याला विसरली पण तूं मात्र आपल्या मातेला विसरूं नकोस !

रण–रागिणी ! शेकडों अडथळे दूर सारून " गणेश नाटक मंडळीच्या " रंगभूमिवर तुझं पाऊल पडण्यास आणि " गणेश " राज्याची रा. वामनराव पोतनीस आणि शिवरामपंत परांजपे यांच्याच हातीं असणारीं सूत्रं बरोबरीच्या नात्यानं रा. माधवराव टिपणीस यांच्याहिं हातीं पडण्याचा योगायोग जुळून आला आहे !–तुला नाटय–सृष्टींत उत्साहाच्या उतावीळपणानं जन्म दिल्याबद्दल रा. पोतनीस, परांजपे व टिपणीस यांचा मी अत्यंत आभारी आहे ! त्याचप्रमाणं

दिवसोदिवस बिकट होत जाणाऱ्या नाट्य संसाराला, उत्साहानें कमर कसून सन्मुख झाल्याबद्दल "गणेश दरबारच्या" या नूतन त्रिमूर्तीचें त्याचप्रमाणें मंडळीचे कार्यवाह श्री. रा. रा. शांतारामजी शामराव ढगे यांचें अभिनंदन करणें जरूर आहे ! बाळे, तुझ्या अपूर्णावस्थेंत ज्या प्रेमळ सुहृदाची तुझ्यावरून गोड कृपादृष्टी फिरली ते माझे मित्र कवि श्रीयुत रा. रा. सदाशिवराव अनंत शुक्ल यांचा त्याचप्रमाणें तुझें शब्दचित्र मनोहर व टिकाऊ करण्याकरतां आपलीं छाया-चित्रें आनंदानें दिल्याबद्दल "गणेश नाटक मंडळी" चा मी आभारी आहें ! शेवटीं संकटांच्या वणव्यांत परंतु पंढरपूरच्या विठोबाच्या परमपवित्र चरणीं तुझा जन्म ज्या उसळीनें आणि जोमानें झाला तीच उसळी आणि जोम त्या दयामय विठोबाच्या कृपेनें कायम राहून "तूं चिरायु हो" असा आशीर्वाद देण्यापलीकडे या तुझ्या शद्ध सृष्टींतल्या पित्याला अधीक काय करतां येणार ?—

तुझा,

शांताराम गोपाळ गुत्ते.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठा
अ. क्र. 9620
3112
स्वस्तिक वाचनालय, नौपाडा–ठाणें
विभाग क्रमांक
अनुक्रमांक

# रण–रागिणी.

## प्रथम झंकार.

### प्रथम लहरी.

[ स्थळः—झांशी–बगीचा–लक्ष्मीबाई एका पुष्करणींत पाय सोडून बसली आहे. सुंदर तिच्या हातांतील पुष्पमाला सोडविण्याचा प्रयत्न करीत आहे. ]

**लक्ष्मीः**—सोड ना सुंदर ! हें काय ? हार तुटला ह्मणजे पहा अं !–सोडतेस कीं नाहीं ?

**सुंदरः**—नाहीं सोडीत जा ! माझ्या चोरून ही एवढी गेंदवाज माळ आज कुणाकरतां केलीत हें आपण सांगितल्याशिवाय मी नाहीं सोडणार !

**लक्ष्मीः**—अग, हें काय असं ?–तुटेल ना ? सोडतेस कीं नाहीं ?

**सुंदरः**—नाहीं–साफ नाहीं सोडीत ! आधी माझ्या प्रश्नाचं उत्तर द्या आणिं मग आपली माळ घ्या ! कारण सांगायला येवढी लाज ती कशाला पाहिजे ?

**लक्ष्मीः**—या कुंजांत बसून, चोरून तूं माळ तयार केलीस त्यावेळीं मी जर तुला असंच अडवून विचारलं असतं तर तूं सांगितलं असतस कां ?–कां–बोलत कां नाहींस आतां ?

**सुंदरः**—हो, हो–अगदीं! हंसत सांगितलं असतं कीं ही देवाकरतां आहे ह्मणून—

**लक्ष्मीः**—मग मीही तुला आतां अगदीं हंसतच सांगते कीं ही माळ माझ्या पतिदेवाकरतांच आहे ! झालं आतां ? हंसली–हंसली ! सोड–सोड आतां माझी माळ—

**सुंदरः**—[ माळ सोडून ] मग आमच्या हातची माळ स्वारीला आवडली नसती वाटतं ? बरोबरच आहे ह्मणा; खाशा स्वारीकरतां खाशा स्वारींनंच केलेली माळ हवी? आजचा राणीसाहेबांचा उत्साह कांहीं निराळाच दिसतो—अं

**लक्ष्मीः**—नुसता उत्साह असून काय उपयोग ? सारीं फुलं तूं सकाळींच तोडून नेल्यामुळं, माझ्या वाटणीस या साऱ्या कळयाच आल्या—

**सुंदरः**—पण बाईसाहेब, कळयानाच जास्त आयुष्य असतं बरं का ? फुलून गेलेल्या फुलांचा सुवास मृत्यूच्या मार्गाला लागलेला असतो, पण कळ्यांच्या सुवासाला नुकतीच कुठं सुरवात होत असते बरं का बाईसाहेब—

**लक्ष्मीः**—पण त्या सगळ्या कळ्यांची पूर्ण-माला तयार होईल त्याच वेळेला त्यांची मोहकता दिसून येईल ना ? ही पहा; या विजयादशमीच्या विजयी शशांकाच्या गळयांत, चांदण्यांच्या मुकुल पुष्पांची प्रेममाला घालण्याकरितां ही चंद्रिका सारखी धडपड करीत आहे ! क्षणांत पांचपन्नास कळया आकाशांगणांत ती गोळा करते तर तुझ्या सारखीच पापी असणारी ती मेघमाला त्या कळ्या पार उधळून देते.

**सुंदरः**—एकंदरींत मी मेघमाला अं ?

**लक्ष्मीः**—पण सुंदर तें पाहिलंस कां ? तुझ्यासारख्या मेघमालेला दूर लोटून त्या चंद्रिकेनं एक लहानशीच चिमुकल्या चांदण्यांची माला तयार केली ! पहा—साधी कां होईना—पण प्रेमाची साक्षीदार ह्मणून त्या चंद्रिकेनं ती माला आपल्या पतीच्या गळयांत टाकलीच ! प्रतिपक्षाचा झालेला विजय सहन न झाल्यामुळंच कीं काय कोण जाणं, ती पहा ती मेघमालाही त्या चंद्राकड जोरानं धांव घेऊं लागली ! पहा सुंदर पहा—त्या चंद्रिकेचं वैभव कमी न होतां—आपल्या मृदुतेजाची ओवाळणी त्या चंद्रानं आपल्या पत्नीला घातल्यानं तिचं वैभव अधीकच खुलून दिसूं लागलं ! सुंदर-ती पहा तुझी बहीण ती मेघमाला कशी-काळी ठिक्कर पडून स्तब्ध राहिली ती–; तुझी सुद्धां अशीच स्थिती होणार बरं कां ? सकाळीं फुलं नेतांना बरं वाटलं-पण.

**सुंदरः**—"पण" जाऊं द्या आतां बाजूला ! एकंदरींत बाई साहेब आज या चंद्रिकेची नक्कल करणार तर ! महाराजांच्या पासून ओवाळणी झगडून घेणार कीं ते घालतील तीच घेणार ?

**लक्ष्मीः**—स्वारींतून यायचं झालं कीं सारी लाज बीज बाजूला ठेवून अगदीं स्पष्ट सांगणार कीं स्वारींतून आणलेल्या विजयश्रीची ओवाळणी आधीं घाला आणि मग या हाराकडं अतुरतेनं बघा! ती चंद्रिका पडली वेडी—चांदण्या चमेलीची माळ, तिनं ओवाळणी मिळण्याच्या आधींच त्या चंद्राला अर्पण केली—पण मी नाहीं तसं करणार.

**सुंदरः**—अगबाई; आज प्रेम—कलह आहे तर मग? विजयश्रीची ओवाळणी आपण झगडून घेणार?—

**लक्ष्मीः**—हो हो—अगदीं झगडून घेणार! स्वारींतून यायचं झालं कीं अगदीं स्पष्ट सांगणार.

**गंगाधररावः**—[ प्रवेशून ] काय?—काय सांगणार स्पष्ट?

**सुंदरः**—अगबाई, महाराज—[ जाते ]

**लक्ष्मीः**—काय सांगणार म्हणजे? आमची विजयश्रीची ओवाळणी आधीं द्या आणि मग या हाराकड पहा! स्वारीवर जाऊन मिळवून आणलेली विजयमाला ओवाळणी म्हणून या लक्ष्मीला प्रथम मिळाली पाहिजे आणि मगच हा हार आपल्याला मिळेल!

**गंगाधररावः**—स्वारींत मिळवलेली विजयमाला! राणीसाहेब, विजयादशमीच्या मुहूर्तावें बाहेर पडून, विजयश्रीला खेंचून आणण्याचे आह्मा हिंदूंचे दिवस गेले! आह्मी आमची विजयमाला "या इंग्रजांचं दास्यत्व करण्याच्या" मोबदल्यावारी त्यानां कायमची विकून टाकली! विजयमाला खेंचून आणण्याच्या कामीं आह्मी आर्यावर्तातले पुरुष आतां अगदीं नादान ठरलों आहोंत! दिलोजान, शिवाय या मूर्तिमंत लक्ष्मीला आज मी कोणत्या लक्ष्मीची ओवाळणी घालणार?

**लक्ष्मीः**—कोणत्या म्हणजे? आपल्या जवळ जर विजयश्री नसेल तर आपल्याला अतिशय प्रिय असणारी कोणतीही वस्तु या लक्ष्मीला द्या! आपण माझ्या मनाजोगती ओवाळणी घातल्याशिवाय ही माळ मी आपणास मुळींच देणार नाहीं!

**गंगाधररावः**—नाहीं; आणि मीहि ओवाळणी घातल्याशिवाय तिचा स्वीकार करणार नाहीं! राणीसाहेब, या गंगाधररावाजवळ विजयश्री इतकीच—

किंबहुना अधीक प्रिय असणारी दुसरी वस्तु ह्मणजे, आपल्या पूर्वजांनीं ज्या रण–सम्राज्ञीच्या जोरावर विजयश्री खेंचून आणली ती–ही इंग्रजांच्या कृपेनें माझ्या हातीं राहिलेली माझी आवडती समशेर! या विजयादशमीच्या शुभ-मुहूर्तानं, रण–रागिणीच्या या आवडत्या लक्ष्मीनं, जर मी या लक्ष्मीचा सन्मान केला तर चालेल ना?–[ तरवार सोडतो. ]

**लक्ष्मीः**—अहाहा! या! नाथ, हीच–हीच ओवाळणी मला घाला! ज्या या खड्गदेवतेवर साऱ्या विजयश्रींची मदार अवलंबून असते, ती ही मूर्तिमंत विजयाच जर मला मिळाली, तर या ओवाळणीपेक्षां दुसऱ्या कोणत्या ओवाळणीची इच्छा या लक्ष्मीनं धरावी? आतां तर मी ह्मणते कीं मला जर कोणची ओवाळणी घालायची असेल तर हीच घाला–नाहीं तर मला मुळीं ओवाळणीच नको—

**गंगाधरराव:**—राणीसाहेब, आपली इच्छा आजपर्यंतच्या आपल्या तेजस्वी चरित्राला साजेशीच आहे! ओवाळा–ओवाळा मला; आणि ही माझी प्रेमाची ओवाळणी घ्या—

**लक्ष्मीः**—[ हातीं कुरवंडी घेऊन ]–परमेश्वरा, "पतिदेवाच्या चिरकालीन प्रेमाबरोबरच मला अखंड सौभाग्य दे" असा मी तुला आशिर्वाद मागते!

[ ओवाळतांना हातांतला चुडा गळून पडतो. ]

**गंगाधरराव:**—पण हें काय? लक्ष्मी हें काय? तुझा चुडा कां फुटला? हा अपशकून तर नाहीं ना?

**लक्ष्मीः**—नाहीं! हा पाहिलात का? माझा चुडा फुटला नाहीं तर तो जशाच्या तसाच गळून पडला! या विजयादशमीच्या मुहूर्तानं आपल्या समशेरीची ओंवाळणी घेत असतांना, या लक्ष्मीच्या हातून या आर्यभूमीला चुडेदान मिळालं! हा अपशकून नाहीं!–या लक्ष्मीचे चुडे शाबूत असतांना, या आर्यभूमीचे चुडे फुटण्याच्या प्रसंगीं, तिला या समशेरीच्या जोरावर माझ्या हातून चुडेदान होणार आहे!

**गंगाधर०:**—अहाहा! किती गोड ही कल्पना! लाडके लक्ष्मी, कमकुवत हृदयांनीं निर्माण केलेल्या या अपशकुनांच्या कल्पना, प्रत्येक हृदयांतून जर अशाच नष्ट होतील तर काय बहार होईल?–घे–ही रण–लक्ष्मी ही या विजया-

लक्ष्मीची अति महत्त्वाची तुझ्या पतीची प्रेमाची ओवाळणी !—लक्ष्मी, आवडली ना तुला ही ? [ तरवार तिच्या कमरेस बांधतो. ]

**लक्ष्मीः**—पण—आपल्याला आवडली ना ही माझी माळ ?

[ माळ घालते. ]

**गंगाधरः**—अहाहा—किती गोड—किती मोहक हा सुवास ! लक्ष्मी—तुझ्या दिव्य प्रेमा तर या सुगंधाच्या रूपानं, या मालेंतून दरवळत नसेल ना ? शंकाच नाहीं ! कारण ही पहा, या मेघराजानं सुद्धां या जल-तुषारानं माझ्या कल्पनेला अनुमती दिली !—[ पाऊस सुरू होतो. ]

**लक्ष्मीः**—खात्रीनं ! कारण मी आपल्या गळयांत ही माळा घालतांच, त्या चंद्रिकेनं, आपल्यावर आकाशांतून हे जल-बिंदूचे मोती उधळले ! मला तर वाटतं कीं चंद्रिकनं उधळलेले हे स्वर्गीय मोती वेंचून घ्यावेत आणि त्यांची माला या माझ्या प्रेममालेच्या सोबत आपल्या गळयांत घालावी ! पहा, माझं भाषण त्या चंद्रिकेला जसं काय ऐकूच गेलं ! आणि म्हणूनच कीं काय कोण जाणं मला मोत्यांची वाण पडूं नये म्हणून, तिनं हा स्वर्गीय मोत्यांचा नुसता पाऊस सुरूं केला—; नाथ वेंचूं का हे मोती आपल्या माळेला ?

**गंगाधरः**—वेडी रे वेडी ! अग, हा परमेश्वराच्या घरचा नकली बाजार आहे ! हा विधात्याचा नजरबंदीचा एक अद्भुत खेळ आहे !—लक्ष्मी, या मोत्यांचा उपयोग इतर मोत्याप्रमाणं होणार नाहीं ! ह मोती वेंचायला तूं पुढं हो मात्र, कीं ज्याप्रमाणं त्या आकाशांत त्या तारकांचे दिव्य मोती मेघांच्या पडद्यामागं लपून जातात, त्याचप्रमाणं हे दिव्य मोती या भूमातेच्या उदरांत अदृश्य होतील ! आणि तुझ्या या कोमल हातीं निराशेची माती मात्र लागेल ! लक्ष्मी, वरच्यावर—ओंजळींत या मोत्यांना झेलण्याचा जर तूं प्रयत्न करूं लागलीस, तर त्या मोत्यांचं पाणी होऊन, तुझ्या वेड्या आशा त्या पाण्यांतच विरघळून जातील !—या मोत्यांची मजा नुसत्या डोळयांनींच पहा !—

**लक्ष्मीः**—हे पहा, या लतांच्या मांडीवर आनंदानं हसत बसलेले हे मोती या वाऱ्याच्या मंद झुळकेनं कसे टपटप खालीं पडले !—आज आनंद-आनंदाशिवाय दुसरं मला कांहींच दिसत नाहीं गडे—

[ एक कळी तुटून पडते ]

**गंगाधर•:**—पण हें पहा–हें पहा !–सारं जग आनंदांत नाहीं. लक्ष्मी–या दुर्दैवी लतेचं हें दुसरं पाडस, तिच्या दैवाच्या या चक्रवातानं तुटून पडलं! लक्ष्मी असाच नाहीं कां आपला बाळ सुद्धां आपल्याला सोडून गेला—

**लक्ष्मी:**—हें काय? आजच्या या मंगल दिवशीं त्याची कशाला हवी आठवण? देवाला आवडला–त्यानं नेला;–नाथ, आपला बाळ गेला पण आपला आनंद-राव नाहीं कां आपल्याला आनंदाच्या उपवनांत नेत ?–

**गंगाधर•:**—खरंच, आनंदराव आपल्याला आनंदाच्या उपवनांत नेतो ! त्याचं तें सदोदीत प्रफुल्लित असणारं तोंड–आपल्या मृत बालकाच्या तोंडाच्या झेल्याचा खरंख विसर पाडतं ! ! अहाहा–आनंद–तुझ्या प्रमाणंच मला सुद्धां सगळीकडे आनंद दिसूं लागला—

**लक्ष्मी:**—हा पाऊस थांबलाच, त्याच्या सुधारसानं नवजीवन मिळालेल्या विश्वाची शोभा दाखवण्याकरतां–हा पहा–त्या चंद्रानं आपला प्रकाश त्या कृष्णमेघाच्या गवाक्षांतून या विश्वावर पसरला ! खरंच, प्रेमी आत्म्यांचं मीलन करण्याकरतां तर नसेल ना ही वृद्धी !–कारण हीं पहा–हीं लतांचीं प्रेमजलानं चिंब झालेलीं पानं, या वायुलहरींबरोबर एकमेकांना गाढ आलिंगन देत आहेत!

**गंगाधर•:**—होय; लक्ष्मी—अशा प्रशांत मंगल वेळेला विलग आत्म्यांचं एकीकरण झालंच पाहिजे ! ये;–लक्ष्मी तुझ्या दिव्य आत्म्यांत या गंगाधररा-वाचा प्रणयी जीव एकरूप होऊन जाऊं दे ! [ तिला जवळ ओढून ] अहाहा–खरोखर स्वतःला विसरून भिन्नात्मे एक होण्याचा प्रसंग, सृष्टीच्या मंगल स्वरू-पावरच अवलंबून असतो !–लक्ष्मी, तुझ्या या गोंडस करपाशांत, स्वतःला बांधून घेतलं असतांना, जर या प्रसन्न वेळेला, या गंगाधररावाची एक एक जीवज्योत मंदावत जाऊन तुझ्या जीवज्योतींत मिळून,–या गंगाधररावाचं नुसतं कलेवरच तुझ्या हातीं राहिल तर आजपर्यंत जो आनंद या जिवानं अनुभवला नाहीं तो आनंद खात्रीनं—

**लक्ष्मी:**—[ मिठी सोडवून ] हें काय? कसल्या या विचित्र कल्पना ?–कांहीं तरीच मेलं—

**गंगाधर•:**—कांहीं तरीच कसं होईल ?–या चंद्राकडे पहा;–या विजयादश-मीच्या मंगलप्रसंगींच त्या बिचाऱ्याच्या नशिबीं मेघांचा कैदखाना आला आहे !

पतीच्या वियोगामुळं भांबाऊन गेलेली ही भयाण चंद्रिका पहा! लक्ष्मी माझ्या पश्चात्—

**लक्ष्मीः**—मुळींच नकोत हे विचार! विचारांना एकदा वाव मिळाला कीं विचारतरंग वाटेल तसे उठत जातात!—चलायच गडे इथून—

**आनंदरावः**—[ प्रवेशून ] बाबासाहेब, आपण इथंच काय बसलात? चला; पावसांत पार भिजून गेलात ना तुम्ही!

**गंगाधर०ः**—अहाहा! या झांशीचीं राज्यसूत्रं माझ्या पश्चात् ज्याच्या हातीं जाणार तो बालयुवराज आनंदराव!—खरोखर, लक्ष्मी, मघाशीं तूं म्हटल्या प्रमाणं हा आनंदराव म्हणजे आपल्या आनंदाचं एक उपवनच आहे! एका बाजूला तुझ्या मधूर प्रेमाचा फुलून गेलेला ताटवा आणि दुसऱ्या बाजूनं माझ्या भावि आशांचं केंद्र बनलेलें हें आनंदाचं मुखमंडल, या दोन मनमोहन वस्तूंत माझं मन गुंगून गेल्यास त्यांत नवल काय? लक्ष्मी, या विजयादशमीच्या मुहूर्तानं या झांशीची पवित्र समशेर, तुला ओवाळणी म्हणून घालून, तुझ्यावर माझ्या राज्यकारभाराची जबाबदारी मी टाकलीच आहे! अशाच एकाद्या मंगल मुहूर्तावर दत्तकाचा संस्कारविधी उरकून, तुम्हां दोघांच्या मनोहर लीला पहात स्वस्थ रहावं असा आजच्या या मंगल प्रसंगीं मी निश्चय करतों!

**लक्ष्मीः**—इश्श!—हें काय भलतंच कांहीं तरी—

**गंगाधरः**—यांत "इश्श" लें काय झालं? बाळ आनंदराव, तुला पटलं ना माझं म्हणणं?

**आनंदरावः**—हो पटलं! पण आधीं वाड्यांत चला ना. तुम्हां दोघांचेही कपडे पार भिजून गेलेत—आई, चल ना—[ लक्ष्मीला ओढतो. ]

**गंगाधर०ः**—पहा—लक्ष्मी—पहा; या बालबुद्धीला सुद्धां माझे विचार पटले!—या झांशीची सारी जबाबदारी आजपासून तुझ्यावर!—पौराणिक कालांत रण-रागिणी भवानी मातेनं, या विजयादशमीच्याच दिवशीं महिषासुराचं कंदन केलं!—द्रौपदीनं आपल्या तोंडावरचा अज्ञातवासाचा कृष्ण पडदा याच शुभदिवशीं दूर करून, पांडवांची कीर्ति उज्वल केली!! आणि याच विजयादशमीच्या मुहूर्तानं, या कलियुगांत, आपल्या मराठी राज्याचे आद्य संस्थापक श्री शिवाजी-महाराज, दिग्विजयाकरतां आपली भवानी निष्कोषित करून सीमोल्लंघन करीत

असत !–लक्ष्मी, आजपर्यंतच्या या साऱ्या गोष्टींची पुनरावृत्ति आतां तुझ्या हातीं आहे !–लक्ष्मी–चल; या पवित्र कार्याला आजपासून सुरवात कर—

[ लक्ष्मीच्या व आनंदरावच्या खांद्यावर हात टाकून जातो. ]

सीन ट्रॅन्सफर.

---

## लहरी दुसरी.

[ स्थळः—ब्रह्मावर्ताजवळचें अरण्य.—रावसाहेबास वाघिणीनें पकडलें आहे. तो तिच्यापासून सुटून जाण्याचा यत्न करीत आहे. ]

**रावसाहेबः**—सोड, वनराज्ञी–सोड मला, तुझी अचाट शक्ति या राव-साहेबाच्या हाडाचं चूर्ण करायला अगदीं असमर्थ आहे ! विनाकारण स्त्री–हत्त्येचें पातक माझ्या माथीं मारूं नकोस !–सोड,–काय ? नाहीं सोडीत ? नाहीं सोडीत ? [ सोडवून घेण्याचा यत्न करतो. ]

**मोरोपंतः**—[ प्रवेशून ] अरेरे ! रावसाहेब, हें काय ?–[ वाघिणीवर पिस्तुल झाडतो–रावसाहेब सुटतो ]–आपण जखमी केलेल्या वाघाच्या पाठीमागं मी धांवत गेलों तों इकडं हा प्रसंग !

**रावसाहेबः**—वाघाला जखम झालेलों पाहतांच ही वाघीण माझ्यावर चवताळून आली ! दैवयोगानें माझी गोळी चुकली आणि हिची आणि माझी झटापट सुरूं झाली ! इतक्यांत आपण आलात !–पण तो जखमी झालेला वाघ कुठं आहे ?

**मोरोपंतः**—माझ्या हातून तो निसटला. पण पुढं त्याचा पाठलाग, याच रानांत शिकारीला आलेल्या मेजर हेस्टी साहेबानीं सुरू केला.—

**रावसाहेबः**—काय ? आपली शिकार तुम्ही त्यांच्या स्वाधीन केलीत ? तुमच्या मनगटांत त्या वाघाला लोळविण्याची शक्ति असतांना, तुम्ही केविलवाण्या तोंडानं मागं परततात ?—

**मोरोपंतः**—श्रीमंत, मी मागं परतलों याचं कारण—



**गंगाधर०:**—लक्ष्मी, तुझ्या दिव्य आत्म्यांत या गंगाधररावाचा प्रणयी जीव एकरूप होऊन जाऊं दे!

[ पृष्ठ ६ ]

स्वस्तिक वाचनालय,

**रावसाहेबः**—काय याचं कारण ?

**मोरोपंतः**—याचं कारण, या शिकारीपासून मेजर साहेबांना होणारं समाधान—

**रावसाहेबः**—अरेरे ! एकाच्या समाधानाची जी किंमत ती सुद्धा दुसऱ्याच्या स्वाभिमानाची नसावी ना ?—मोरोपंत, तुमचा अभिमान कुठं गेला ? कुबेरनगरी झांशीचे सरदार मोरोपंत तांबे,—महामानी लक्ष्मीचे जनक मोरोपंत तांबे— आज इतके निर्वीर्य कसे बनले ?—मोरोपंत, हातून सुटलेल्या या वाघाची किंमत नाहीं;—असले पन्नास वनसम्राट नुसत्या हातानं लोळवण्याची शक्ति या रावसाहेबांत आहे !—पण मोरोपंत, हा वाघ ह्मणजे तुमचा अभिमान होता;—हा वाघ ह्मणजे हिंदूच्या स्वाभिमानाची निशाणी होती—

**मोरोपंत**—रावसाहेब, कोणताही हिंदू आपला स्वाभिमान कधींही जखमी होऊं देणार नाहीं.

**रावसाहेबः**—मग, कोणत्या भावनेनं तुह्मी आपली शिकार सोडलीत ? त्यांच्या पेक्षां तुह्मी कमी योग्यतेचे—

**मोरोपंतः**—मुळींच नाहीं ! एका पाश्चिमात्याचा जो मान तोच हिंदूचा मान ! एका टोपीवाल्याची जी माणुसकी तीच आमची माणुसकी ही भावना, या मोरोपंतांच्या हृदयांत पूर्णत्वानं जागृत होती !—रावसाहेब, मी ही शिकार आनंदानं आणि अभिमानानं आपल्या चक्रवर्ती सत्तेला अर्पण केली.

**रावसाहेबः**—अरेरे, मोरोपंत, काय बोलतां हें ? अभिमानानं अर्पण केलीत ?—आनंदानं अर्पण केलीत ?—मोरोपंत, या तुमच्या शब्दांत किती जहरीपणा आहे याची कल्पना तरी आहे कां तुह्मांला ? गुलामगिरींत मान आहे कां ? दास्यत्वांत अभिमान राहतो कां ?—आपण होऊन दुसऱ्याची गुलामगिरी कबूल करण्यांत तुमच्या झांशीच्या सरदारीला भूषण वाटलं काय ?

**मोरोपंतः**—पण राजनिष्ठा म्हणजे गुलामगिरी नव्हे; राजनिष्ठेनं स्वतःचा अभिमान नष्ट होत नाहीं ! रावसाहेब, साऱ्या आर्यावर्तानं इंग्रजांचं प्रभुत्व कबूल केलं आहे ! जितक्या एकनिष्ठपणानं मराठी सत्तेपुढं शिवाजीमहाराजांच्या त्या भगव्या झेंड्यापुढं हिंदूनीं आपल्या माना वांकवल्या, तितक्याच एकनिष्ठपणानं आपल्या चक्रवर्ती सत्तेपुढं आपल्या माना नकोत कां वांकवायला ? रावसाहेब,

राजनिष्ठा, पवित्र राजनिष्ठा हें आह्मां हिंदूंचें शील आहे! त्या राजनिष्ठेच्या जोरावर ही शिकार, मी आपल्या साम्राज्य सत्तेंतील, एका घटकावयाला प्रेमानं अर्पण केली.

**रावसाहेबः**—अशाच प्रेमानं या हिंदुस्थानचं वाटोळं झालं! मोरोपंत, तुमच्या फाजील राजनिष्ठेनं तुमच्या स्वाभिमानाची होळी केली; तुमच्या नकळत तुमच्या स्वाभिमानाला लाज आणणारीं कृत्यं तुमच्या हातून घडूं लागलीं!!—मोरोपंत, तुमच्या गतस्थितीबद्दल तुम्हाला कांहींच वाटत नाहीं ना? आज तुमची काय स्थिती आहे? "ना विष्णुः पृथिवीपतिः"—मानवरूपानं प्रत्यक्ष विष्णु भूपाल होतो, हें या आर्यावर्तातलं दिव्यतत्त्व नामशेष होऊन, "न विष्णुः पृथिवीपतिः"—अशी स्थिती आली;—तो भूपाल होणारा विष्णु गुलाम, एक कवडी किंमतीचा दास होऊन, रानोमाळ आम्हां पेशव्यांच्या प्रमाणं गोंवऱ्या वेंचीत हिंडूं लागला—तरी सुद्धां तुम्हांला कांहींच वाटूं नये ना?—

**मोरोपंतः**—रावसाहेब, या आर्यावर्तातल्या नृपालानीं वैभवसंन्यास घेतला असेल पण त्यांचा सत्त्व—संन्यास अजून झाला नाहीं—

**रावसाहेबः**—तोहि कांहीं कालानं होईल

**मोरोपंतः**—नाहीं, मुळींच नाहीं! या इंग्रजांच्या करतां राजनिष्ठेच्या पायीं—स्वामिसेवेच्या पायीं, अभिमानानं आम्हीं आमच्या हाडांचे हिमालय उभारूं पण सत्त्वाच्या पायीं—आमच्या मानाच्या पायीं—साऱ्या जगाशीं आम्हीं झुंजायला तयार होऊं—

[ पडद्यांत वाघ गुरगुरतो. ]

**रावसाहेबः**—मोरोपंत, पहा—तुम्हीं आपल्या सम्राट्सत्तेला—आनंदानं—अभिमानानं अर्पण केलेला हा वाघ, आपण होऊन आपल्या पायीं चालून येत आहे! व्हा—पुढं व्हा—आणि आपली शिकार स्वाभिमानानं दाबून धरा—

**मोरोपंतः**—नाहीं! तें पहा, साहेब त्याचा पाठलाग करीत आहेत!—आपल्याला काल विजयादशमीला भेटण्याकरतां म्हणून इथं ब्रह्मावर्ताला आलों आणि आज या वनाधिराजाच्या दानानं माझ्या चक्रवर्ती सत्तेची मला पूजा करतां आली! अस्सल राजनिष्ठ या एकाच दृष्टीनं, सम्राट्पदाची एकदां बांध-

लेली पूजा—आपली दृष्टी बदलून, केवळ अटीला पेटल्यामुळं हा मोरोपंत कधींच विस्कळीत करणार नाहीं !—हें—हिंदूचं ब्रीद नाहीं—

**रावसाहेबः**—मनाचा कमकुवलपणा हें जसं हिंदुचं ब्रीद नव्हे, तसंच स्वाभिमान विसरणं हें सुद्धां हिंदूचं ब्रीद नव्हे! मोरोपंत, माझा स्वाभिमान कायम राखण्याकरतां—हा रावसाहेब तुमच्या राजनिष्ठेवर ही—पहा—गोळी घालीत आहे ! तुम्ही बांधलेली तुमच्या देवतेची पूजा पार उधळून देत आहे ?—[ गोळी झाडतो व वाघावर पाय देऊन उभा राहतो. ]— ही शिकार माझी झाली—

**हेस्टीः**—[ प्रवेशून. ] गोली कोनी झॉडली ?—

**रावसाहेबः**—मी !—या रावसाहेबानीं—

**हेस्टीः**—कोन—कोन रावशाप ?—

**रावसाहेबः**—रावसाहेब कोण ? चक्काचूर उडालेल्या पेशव्यांच्या गादीवर असणाऱ्या दत्तक नानासाहेबांचा भाऊ ! स्वताला रोमरोमांत जिवंत समजणारा स्वतंत्र आत्मा—

**हेस्टीः**—[ मोरोपंतास ] आन् टूमी ?

**मोरोपंतः**—झांशीचा सरदार मोरोपंत तांबे—

**हेस्टीः**—मोरोपंट टांबे ! राजनिष्ठ गंगाधररावचे फॉदर-इन्-लॉ. गुड मोर्निंग रावशाप—टूमी आमची शिकार घेऊन—

**रावसाहेबः**—मुळींच नाहीं !—माझी शिकार मी घेतली.

**हेस्टीः**—पन टूमाला शीकार करन्याचा अडिकार ?

**रावसाहेबः**—जो तुमचा अधिकार तोच या रावसाहेबाचा! पंचमहाभूतांवर त्याच प्रमाणं त्यांत खेळत असणाऱ्या प्रत्येक वस्तूवर, प्रत्येक प्राण्याची सारखीच सत्ता असते !

**हेस्टीः**—पण टूमच्यावर आमची शट्टा हांय ना ?

**रावसाहेबः**—आमच्यावर म्हणजे आमच्या मनावर तर नाहीं—

**हेस्टीः**—हो हो—मनावर शुद्दा—

**राव०ः**—ऐका मोरोपंत ! साहेब, प्रत्येकाचं मन हें, पूर्ण स्वतंत्र आहे !

**हेस्टीः**—शिकार डेता कीं नाय ?

**राव०**:—नाहीं–मुळींच नाहीं !

**मोरोपंत**:—श्रीमंत माझ्या राजनिष्ठे करतां नाहीं पण माझ्या विनंती करतां तरी शिकार, यांना द्या.

**राव०**:—नाहीं–मस्तक तुटून पडेल पण ही शिकार मी यांना देणार नाहीं !

**हेस्टी**:—टूमा लोकांचीं हत्यारंच काढून घेतलीं पाहिजेत !

**राव०**:—घ्या. घ्या हीं हत्यारं ! [ पिस्तुल फेंकून देतो. ] साहेब, तुह्माला वाटल असेल कीं, निशस्त्र हिंदू, या पशुवृत्ती पुढं लीन होतील, पण लक्षांत ठेवा असले पन्नास पशू, या रावसाहेबासारखा एखादा निशस्त्र हिंदू, सहज लीलेनं पिळून ठार करील ! एक दिवस असा उजाडेल कीं, त्या दिवशीं स्वाभिमानी हिंदू निःशस्त्र असला, तरी त्याचं मनःसामर्थ्य, त्याच्या स्वाभिमानाची धडक, त्याच्या नैसर्गिक आर्यत्वाची उसळी हजारों शस्त्रं बोथट करील !

**हेस्टी**:—शिकार डेटे कीं नाय ?

**मोरोपंत**:—रावसाहेब, नाइलाज होऊन जबरदस्तीनं ही शिकार यांना द्यावी लागेल !

**रावसाहेब**:—अरेरे–मोरोपंत–कसली राक्षसी ही घरफोडी ! या शब्दा-पेक्षां या रावसाहेबाचं मस्तक तुह्मी का उडवलं नाहींत ?

**मोरोपंत**:—माझ्या राजनिष्ठेमुळं हे शब्द माझ्या तोंडून बाहेर पडले ! क्षमा करा !–राजनिष्ठेकरतां–माझ्या शब्दाकरतां–रावसाहेब–प्रसंग पडला तर, माझ्या साऱ्या देशावर मी तलवार चालवीन, आणि मागून माझ्या देशबंधूंच्या करतां, माझ्या स्वतःच्या रक्ताचं कारंज फोडीन ! माझ्या सरळ, साध्या मनाला, राजनिष्ठेशिवाय दुसरं कांहीं एक दिसणार नाहीं ! राजद्रोही–विश्वासघातकी–असा डाग विनाकारण–कोणताही हिंदू आपल्याला लाऊन घेणार नाहीं !

**रावसाहेब**:—घ्या. घ्या ही शिकार साहेब ! माझं स्वतःचं यश, मोरो-पंत–तुमच्याकरतां–केवळ तुमच्याकरतां–मी यांच्या स्वाधीन करतों ! मोरोपंत स्वतःच्या राजनिष्ठेचं प्रदर्शन करतां करतां, तुह्मी आपल्या सरळ पण देश-हिताला घातक असणाऱ्या हृदयाचं प्रदर्शन केलंत !–जा–साहेब–जा घेऊन ही शिकार !

[ साहेबाचे लोक वाघाला नेतात. ]

**हेस्टीः**—आमचा डौरा झांशीला आला ह्मजे गांठ पडेलच! आच्छा!

[ जातो ]

**रावसाहेबः**—मोरोपंत, आजची शिकार ह्मणजे आपल्या उभयतांच्या आयुष्याच्या परस्पर विरोधी दिशा दाखवणारी एक मार्गदर्शिकाच झाली! मोरोपंत, प्रसंग पडला तर तुमच्या सरळ मनाला अनुसरून या रावसाहेबाशीं वागा! तुच्या दिव्य राजनिष्ठेच्या आड जर हा रावसाहेब विनाकारण आला तर त्याच्या मस्तकाच्या चिंध्या उडवल्याशिवाय राहूं नका! पण अपमान सहन करून, स्वाभिमानावर लाथ मारून स्वामिनिष्ठेचं प्रदर्शन करूं नका एवढीच तुह्माला विनंती आहे!

**मोरोपंतः**—रावसाहेब, स्वाभिमान विसरून, अपमान सहन करून, जिवंत राहणं ह्मणजे जिवंतपणीं रौरवांत उडी घेणं होय!—

**रावसाहेबः**—तर मग, तुमच्या दिलदार स्वाभावावर विश्वास ठेऊन, हा रावसाहेब,-तुमचा प्रतिस्पर्धी—मित्र प्रेमानं आपला हात तुमच्या हातीं देत आहे! प्रसंग येतांच हा हात तुमच्या हातांतून निघेल!

[ हात पुढें करतो. ]

**मोरोपंतः**—तोंपर्यंत मी सुद्धां खुल्या दिलानं आणि सरळ भावानं हा हात अस्सा माझ्या हृदयाशीं धरीन!!!

[ रावसाहेबाचा हात हृदयाशीं धरतो. ]

[ पडदा पडतो. ]

---

## लहरी तिसरी.

[ **स्थळ—झांशी.** सुंदरलालचें घर. सुंदरलाल प्रवेश करतो. ]

**सुंदरलालः**—कालमहिमा कांहीं और आहे यांत शंका नाहीं! सात समुद्राच्या पलीकडचे हे टोपीवाले, पण यांना सुद्धां आमच्यांत मिसळावसं

**राव०:**—नाहीं–मुळींच नाहीं !

**मोरोपंत:**—श्रीमंत माझ्या राजनिष्ठे करतां नाहीं पण माझ्या विनंती करतां तरी शिकार, यांना द्या.

**राव०:**—नाहीं–मस्तक तुटून पडेल पण ही शिकार मी यांना देणार नाहीं !

**हेस्टी:**—टूमा लोकांचीं हत्यारंच काढून घेतलीं पाहिजेत !

**राव०:**—घ्या. घ्या हीं हत्यारं ! [ पिस्तुल फेंकून देतो. ] साहेब, तुम्हाला वाटत असेल कीं, निशस्त्र हिंदू, या पशुवृत्ती पुढं लीन होतील, पण लक्षांत ठेवा असले पन्नास पशू, या रावसाहेबासारखा एखादा निशस्त्र हिंदू, सहज लीलेनं पिळून ठार करील ! एक दिवस असा उजाडेल कीं, त्या दिवशीं स्वाभिमानी हिंदू निःशस्त्र असला, तरी त्याचं मनःसामर्थ्य, त्याच्या स्वाभिमानाची धडक, त्याच्या नैसर्गिक आर्यत्वाची उसळी हजारों शस्त्रं बोथट करील !

**हेस्टी:**—शिकार डेटे कीं नाय ?

**मोरोपंत:**—रावसाहेब, नाइलाज होऊन जबरदस्तीनं ही शिकार यांना द्यावी लागेल !

**रावसाहेब:**—अरेरे–मोरोपंत–कसली राक्षसी ही घरफोडी ! या शब्दा–पेक्षां या रावसाहेबाचं मस्तक तुम्ही का उडवलं नाहींत ?

**मोरोपंत:**—माझ्या राजनिष्ठेमुळं हे शब्द माझ्या तोंडून बाहेर पडले ! क्षमा करा !–राजनिष्ठेकरतां–माझ्या शब्दाकरतां–रावसाहेब–प्रसंग पडला तर, माझ्या साऱ्या देशावर मी तलवार चालवीन, आणि मागून माझ्या देशबंधूंच्या करतां, माझ्या स्वतःच्या रक्ताचं कारंज फोडीन. ! माझ्या सरळ, साध्या मनाला, राजनिष्ठेशिवाय दुसरं कांहीं एक दिसणार नाहीं ! राजद्रोही–विश्वासघातकी–असा डाग बिनाकारण–कोणताही हिंदू आपल्याला लाऊन घेणार नाहीं !

**रावसाहेब:**—घ्या. घ्या ही शिकार साहेब ! माझं स्वतःचं यश, मोरो–पंत–तुमच्याकरतां–केवळ तुमच्याकरतां–मी यांच्या स्वाधीन करतों ! मोरोपंत स्वतःच्या राजनिष्ठेचं प्रदर्शन करतां करतां, तुम्ही आपल्या सरळ पण देश–हिताला घातक असणाऱ्या हृदयाचं प्रदर्शन केलंत !–जा–साहेब–जा घेऊन ही शिकार !

[ साहेबाचे लोक वाघाला नेतात. ]

**हेस्टीः**—आमचा दौरा झांशीला आला ह्मजे गांठ पडेलच! आच्छा!

[ जातो ]

**रावसाहेबः**—मोरोपंत, आजची शिकार ह्मणजे आपल्या उभयतांच्या आयुष्याच्या परस्पर विरोधी दिशा दाखवणारी एक मार्गदर्शिकाच झाली! मोरोपंत, प्रसंग पडला तर तुमच्या सरळ मनाला अनुसरून या रावसाहेबाशीं वागा! तुमच्या दिव्य राजनिष्ठेच्या आड जर हा रावसाहेब विनाकारण आला तर त्याच्या मस्तकाच्या चिंध्या उडवल्याशिवाय राहूं नका! पण अपमान सहन करून, स्वाभिमानावर लाथ मारून स्वामिनिष्ठेचं प्रदर्शन करूं नका एवढीच तुह्माला विनंती आहे!

**मोरोपंतः**—रावसाहेब, स्वाभिमान विसरून, अपमान सहन करून, जिवंत राहणं ह्मणजे जिवंतपणीं रौरवांत उडी घेणं होय!—

**रावसाहेबः**—तर मग, तुमच्या दिलदार स्वाभावावर विश्वास ठेऊन, हा रावसाहेब,-तुमचा प्रतिस्पर्धी—मित्र प्रेमानं आपला हात तुमच्या हातीं देत आहे! प्रसंग येतांच हा हात तुमच्या हातांतून निघेल!

[ हात पुढें करतो. ]

**मोरोपंतः**—तोंपर्यंत मी सुद्धां खुल्या दिलानं आणि सरळ भावानं हा हात असा माझ्या हृदयाशीं धरीन!!!

[ रावसाहेबाचा हात हृदयाशीं धरतो. ]

[ पडदा पडतो. ]

---

## लहरी तिसरी.

[ स्थळ—झांशी. सुंदरलालचें घर. सुंदरलाल प्रवेश करतो. ]

**सुंदरलालः**—कालमहिमा कांहीं और आहे यांत शंका नाहीं! सात समुद्राच्या पलीकडचे हे टोपीवाले, पण यांना सुद्धां आमच्यांत मिसळावसं

वाटतं ! साहेब हिंदी बोलतो–तर हिंदी साहेब बनूं लागतो !–बाबासाहेबांच्या देवघरांत या सुंदरलालचा जन्म नुसता देवपूजेंतच जातो कीं काय असं वाटत होतं; पण हे टोपीवाले या झांशीच्या दरबारांत आल्यापासून, बाबासाहेबांच्या ब्राह्मण्याला थोडा आळा पडूं लागला आहे ! ही मनोरम साहेबी वागणूक डोळ्यांपुढं गुलजार पलंगाप्रमाणं नाचूं लागल्या पासून–माझी स्थिती एकाद्या छबकड्या–छोकरीप्रमाणं झाली आहे !–साहेबाप्रमाणं नटावं–साहेबाच्या तिच्या प्रमाणं आमच्याही तिला एकादा परकर नेसायला द्यावा–असं वाटलं; पण लोक हंसतील ह्मणून मन कचरलं ! वाड्यांत आमच्या तिला मिळणारे कांहीं सुंदर जिन्नस एका साहेबाला देऊन मी त्याच्याशीं दोस्ती करून घेतली;–आज तिच्या नकळत तिचा कंठा देऊन, त्याच्याकडून ही एक औषधाची कुपी आणली–पण या औषधाचे गूण काय हेंच विचारायचें विसरलों ! आमच्या तिच्या समोर जबानी देण्याची पाळी आली तर काय सांगूं? दमाखोकलावारक—[ विचार करीत उभा राहतो. ]

**मुंदरः**—[ कंठा शोधीत प्रवेशून ]–आतां शोधूं तरी कुठं ? [ सुंदरलालला पाहून ] अगबाई–हे इथं काय करतायत ?–आणि तें हातांत काय ? कुपी ! स्वारीनं कंठा घालवून, ही कुपी आणली वाटतं–(प्रकाश) अहो, माझा कंठा, कुठं आहे ?

**सुंदर०**:–(एकदम दचकून) बालहारक–कंठा ! अरे बापरे ! ज्या दत्ताला भीत होतों तेंच पुढं ! चोरीचं बेंड इतक्यांत कसं फुटलं !

**मुंदरः**—कायहो, कां बोलत कां नाहीं ?

**सुंदर०**:—काय बोलूं ?

**मुंदरः**—माझा कंठा कुठं नेलात तो आणून द्या. माझा तुह्मींच नेलात !

**सुंदर०**:—हें खरंना ? मग आतां कितीही कंठशोष केलास, तरी कंठा तुला मिळणं शक्य नाहीं ! तो गेला साहेबाकडं.

**मुंदरः**—म्हणजे ? माझा कंठा तुम्ही साहेबाला दिलात तर ?

**सुंदर०**:—अरेच्या ! बोलण्याच्या भरांत मीं हें सुद्धां कसं भकलों बुवा ! आश्चर्य आहे !

**मुंदरः**—चला-निघा घराबाहेर ! माझा कंठा मला आत्ताच्या आत्ता पाहिजे. मागं एकदां असंच कांहींसं दिलं, आज कंठा दिला; आतां उद्यां मलाच देऊन टाका, म्हणजे झालं !

**सुंदर०ः**—कंठा साहेबाला दिला म्हणून, तुला देईल कीं काय ? तुला देण्या-इतका खुळा मी नाहीं !

**मुंदरः**—ही वटवट पुरे करा ! आणि कंठा आणून द्या ! पण अशानं नाहीं तुम्ही ताळ्यावर येणार ! एकदां झालं-दोनदां झालं- आतां अशीच्या अशी बाईसाहेबांकडे जाते आणि—

**सुंदर०ः**—अरे देवा ? ती कडक बिजली ? अग ए असं काय करतेस ? मी चुकलों. तोंडांत मारून घेतों. पण रागावूं नकोस ! तूं कधीं चुकलीस तर तुला सुद्धां मीं रागावणार नाहीं ! ह्या टोपीवाल्यांचे कांहीं गुण घे ! यावेळीं तुझ्या ठिकाणीं जर एखादी साहेबीण असती, तर नवऱ्यानं क्षमा मागतांच, लडिवाळ-पणानं त्याच्या गळयांत पडली असती ! सुंदरी, तूं क्षमा करून, खरं सूख काळ्या गोऱ्याच्या एकींत आहे.—

**मुंदरः**—आज तुमचं डोकं तर नाहींना फिरलं ?

**सुंदर०ः**—यांत तुला राग तो कशाचा आला ? अग, प्रत्येक ठिकाणीं; काळ्या-गोऱ्याचा संगम झालाच पाहिजे, असा विधीसंकेत आहे ! चांदणीची चमचम् खुलवायला, काळया अंधाराची साथ असलीच पाहिजे ! सीता मूर्तिमंत सौंदर्य तर राम घनःश्शाम ! आपल्या मादक दर्पानं मनाला मोहिनी घालणाऱ्या सुंदर केतकी भोंवती काळा भुंगा गुंगायचाच ! या हिंदुस्थानचीच गोष्ट घे. काळ्या गोऱ्याच्या एकीला बाध येऊं नये म्हणून, हे गौरकाय, काळ्या हिंदूना भेटायला आले ! फार कशाला, आपल्याकडे एकदांच पाहाणाराला सुद्धां, आपण एकमेकांच्या नावांची चोरी करून काळ्या गोऱ्यांची मैत्री या पूर्वीच सिद्ध केली आहे, असं वाटेल ! मुंदर या नांवानं एकदम सुचवला जाणारा उंदराचा काळेपणा, ह्या सुंदरच्या नशिबीं तर माझ्या नावांत सांठवलेल्या साऱ्या सौंदर्याची मालकीण ही मुंदर—

**मुंदर**—घरादाराचं वाटोळं करायचा बेत आणलांत तरी चारगटपणानं बडबडायला पुन्हां लाज नाहीं वाटत ?

**सुंदर०:**—लाज! अग लाज धरली त्याचं काज विघडलंच म्हणून समज! नूतन-विवाहित जोडप्यांतल्या फाजील लाजेला ज्या वेळीं फाटा मिळतो, त्याच वेळीं त्यांच्या जिभेला फाटा फुटून प्रेमांत गोडी लागते! लाज ही एकीचा नाश करणारी आहे! पहा—अलीकडं तुझी लाज फाजील नाहींशीं झाल्यानं, तुझ्या सुद्धां जिभेला कसा फाटा फुटला आहे!

**सुंदर:**—पण तुमच्या अकलेला फाटा फुटला आहे! पुरुषांच्या अकलेल फाटा फुटला म्हणजे बायकांच्या जिभेला सुद्धां फाटा फुटूं नये कीं काय? नवऱ्याचे वाढलेले कान कापून बरोबर करण्याचा त्याच्या अर्धांगीचा जन्मसिद्ध जरी नसला, तरी लग्नसिद्ध हक्कच आहे,—समजलांत?

**सुंदर०:**—हां-खबरदार! धुळाक्षरं शिकवितांना माझ्या पंतोजींनीं सुद्धां माझे कान कधीं पकडले नाहींत!—कजाक—हिडींबा.

**सुंदर:**—मी कजाक हिडिंबा काय? बाबा साहेबांचे कोरडे पाठीवर उडाले म्हणजे समजेल! [ जाऊं लागते. ]

**सुंदर०:**—आतां काय तुझ्या पुढं नमस्कार घालूं! खरंच कुणाचा होऊं नये चाकर, आणि कुणाचा होऊ नये नवरा (नमस्कार घालतो इतक्यांत, कामिनी प्रवेशते.)

**कामिनी:**—कोण? सुंदरलाल? अहो हें काय (स्वगत) अहाहा काय हा प्रेमळ स्वभाव!

**सुंदर०:**—अरे देवा! कोण कामिनी? काय ही फजिती! जमीन दुभंगून एकदम गडप कां झालों नाहीं!

**कामिनी:**- हें हो काय सुंदरलाल? नमस्कार आणि तोही बायकोला?

**सुंदर:**—(स्वगत) शेवटीं या नमस्कारानं दगा दिला! अग बये, आताच तुला तरी कसं यायला फावलं? आणि आलीस ती आलीस पण आंधळी होऊन कां नाहीं आलीस?

**कामिनी:**—कांहो स्तब्ध कां?

**सुंदर:**—त्यांची वाचा बसली आहे.

**सुंदर०:**—हो कामिनी, हिच्या प्रेमाचा लोठरा माझ्या घशांत अडकल्या मुळं, मला बोलतां येत नाहीं!

**कामिनीः**—सुंदर, इतका तोंडाळपणा नवऱ्याशीं चांगला नाहीं हो! पाप लागतं वरं अशानं! इतक्या दिवस मी ऐकत होते कीं सुंदरलाल म्हणजे भोळे सांभ आहेत पण आज अगदीं खात्रीच झाली! (स्वगत्) खरंच, माझं प्रेम बसलं तें अगदीं योग्य जागींच बसलंय हो! आतां तर निश्चयच झाला. लग्न करीन तर या लालाशींच करीन! (उघड) सुंदर, असला लाल तुला मिळाला हें तुझं नशीब समज!

**मुंदरः**—असल्या लालपेक्षां एकादी कांच पुरवली! खरंच माझं नशीब तुझ्या वाट्याला जाईल तर मी नशीबवान होईन!

**कामिनीः**—नशिबाची अदलाबदल करायला मी याक्षणीं तयार आहे—पण तूंच—

**मुंदरः**—[ बाजूस ] लक्षण कांहीं ठीक दिसत नाहीं.

**सुंदर०ः**—अरे बापरे! एका मुलूखमैदानशीं तोंड देतां देतां जर घामाघूम होऊन जातों तर दुसरी महांकाली कशाला गारद करायला येते?

**कामिनीः**—[ बाजूस ] बाई ग बाई, काय ही यांची केविलवाणी दशा! जीव कसा माशासारखा तळमळतोय! (उघड) मुंदर, बाईसाहेबांच्या पुढची ही अल्लाची गाय प्रत्यक्ष नवऱ्याशीं इतकी लाथाळ आहे तर!

**मुंदरः**—त्याला कारण यांचे गूण.

**सुंदर०ः**—आणि हिचं प्रेम—

**मुंदरः**—यांचे गूण! असं काय त्यानीं केलं ग?

**सुंदर०ः**—कांहीं नाहीं; तिचा एक भिकार कंठा देऊन हें औषध आणलं—पहा हें.

**मुंदरः**—(रागानें कुपी हिसकून घेते) औषध—औषध! एवढं कसलं हो तें बहुगुणी औषध आहे?

**सुंदर०ः**—दमाखोकलासर्दीवारक—वातहारक, पित्तशामक, तापमारक, पौष्टीक असं हें बहुगुणी औषध आहे.

**मुंदरः**—[ वास घेऊन ] अगबाई, ही तर दारू—

**कामिनीः**—काय दारू?

सुंदर०:—लाज! अग लाज धरली त्याचं काज विघडलंच ह्मणून समज! नूतन-विवाहित जोडप्यांतल्या फाजील लाजेला ज्या वेळीं फाटा मिळतो, त्याच वेळीं त्यांच्या जिभेला फाटा फुटून प्रेमांत गोडी लागते! लाज ही एकीचा नाश करणारी आहे! पहा—अलीकडं तुझी लाज फाजील नाहींशीं झाल्यानं, तुझ्या सुद्धां जिभेला कसा फाटा फुटला आहे!

सुंदरः—पण तुमच्या अकलेला फाटा फुटला आहे! पुरुषांच्या अकलेल फाटा फुटला म्हणजे बायकांच्या जिभेला सुद्धां फाटा फुटूं नये कीं काय? नवऱ्याचे वाढलेले कान कापून बरोबर करण्याचा त्याच्या अर्धांगीचा जन्मसिद्ध जरी नसला, तरी लग्नसिद्ध हक्कच आहे,—समजलांत?

सुंदर०:—हां-खबरदार! धुळाक्षरं शिकवितांना माझ्या पंतोजींनीं सुद्धां माझे कान कधीं पकडले नाहींत!—कजाक—हिडींबा.

सुंदरः—मी कजाक हिडिंबा काय? बाबा साहेबांचे कोरडे पाठीवर उडाले म्हणजे समजेल! [ जाऊं लागते. ]

सुंदर०:—आतां काय तुझ्या पुढं नमस्कार घालूं! खरंच कुणाचा होऊं नये चाकर, आणि कुणाचा होऊ नये नवरा ( नमस्कार घालतो इतक्यांत, कामिनी प्रवेशते. )

कामिनीः—कोण? सुंदरलाल? अहो हें काय ( स्वगत ) अहाहा काय हा प्रेमळ स्वभाव!

सुंदर०:—अरे देवा! कोण कामिनी? काय ही फजिती! जमीन दुभंगून एकदम गडप कां झालों नाहीं!

कामिनीः- हें हो काय सुंदरलाल? नमस्कार आणि तोही बायकोला?

सुंदरः—(स्वगत) शेवटीं या नमस्कारानं दगा दिला! अग बये, आताच तुला तरी कसं यायला फावलं? आणि आलीस ती आलीस पण आंधळी होऊन कां नाहीं आलीस?

कामिनीः—कांहो स्तब्ध कां?

सुंदरः—त्यांची वाचा बसली आहे.

सुंदर०:—हो कामिनी, हिच्या प्रेमाचा लोंढरा माझ्या घशांत अडकल्या मुळं, मला बोलतां येत नाहीं!

**कामिनी:**—सुंदर, इतका लोंडाळपणा नवऱ्याशीं चांगला नाहीं हो! पाप लागलं वरं अशानं! इतक्या दिवस मी ऐकत होते कीं सुंदरलाल म्हणजे भोळे सांभ आहेत पण आज अगदीं खात्रीच झाली! (स्वगत) खरंच, माझं प्रेम बसलं तें अगदीं योग्य जागींच बसलंय हो! आतां तर निश्चयच झाला. लग्न करीन तर या लालाशींच करीन! (उघड) सुंदर, असला लाल तुला मिळाला हें तुझं नशीव समज!

**मुंदर:**—असल्या लालापेक्षां एकादी कांच पुरवली! खरंच माझं नशीव तुझ्या वाट्याला जाईल तर मी नशीववान होईन!

**कामिनी:**—नशिबाची अदलावदल करायला मी याक्षणी तयार आहे—पण तूंच—

**मुंदर:**—[ वाजूस ] लक्षण। कांहीं ठीक दिसत नाहीं.

**सुंदर०:**—अरे बापरे! एका मुलूखमैदानशीं तोंड देतां देतां जर घामाघूम होऊन जातों तर दुसरी महांकाली कशाला गारद करायला येते?

**कामिनी:**—[ वाजूस ] बाई ग बाई, काय ही यांची केविलवाणी दशा! जीव कसा माशासारखा तळमळतोय! (उघड) मुंदर, बाईसाहेबांच्या पुढची ही अल्लाची गाय प्रत्यक्ष नवऱ्याशीं इतकी लाथाळ आहे तर!

**मुंदर:**—त्याला कारण यांचे गूण.

**सुंदर०:**—आणि हिचं प्रेम-

**मुंदर:**—यांचे गूण! असं काय त्यानीं केलं ग?

**सुंदर०:**—कांहीं नाहीं; तिचा एक भिकार कंठा देऊन हें औषध आणलं—पहा हें.

**मुंदर:**—(रागानें कुपी हिसकून घेते) औषध–औषध! एवढं कसलं हो तें बहुगुणी औषध आहे?

**सुंदर०:**—दमाखोकलासर्दीवारक–वातहारक,पित्तशामक,तापमारक, पौष्टीक असं हें बहुगुणी औषध आहे.

**मुंदर:**—[ वास घेऊन ] अगबाई, ही तर दारू–

**कामिनी:**—काय दारू?

**सुंदर०ः**—दारू ? अर्रर ! असा कसा घसरलों ! बेट्यानं घात केलान्.

**सुंदरः**—सांग, आतां रागावूं नको तर यांचे काय पाय धरूं ? कां हीच कुपी आतां यांच्या नरड्यांत ओतूं ?

**सुंदर०ः**—शांतं पापम् ! शांतं पापम् ! पण मी खरी आतां काय करूं ? कां हीच कुपी त्या देणाऱ्याच्या टाळक्यांत घालूं ? फसलों; झालं; एकदां सोडून पन्नासदा तुझे पाय धरतों.

**कामिनीः**—[ स्वगत ] अहाहा ! हा जीव ओंवाळून टाकावासा वाटतो ! ( उघड ) नका, सुंदरलाल तुह्मी नका तिचे पाय धरूं—मीच तुमच्याकरतां तिचे पाय धरते ! सुंदर, तुला कंठाच पाहिजे ना ?

**सुंदरः**—( स्वगत् ) हें यांचं प्रेम मला डोईजड तर नाहीं ना होणार ? ( उघड ) हो मला कंठाच पाहिजे, देतेस तूं ?

**कामिनीः**—हो, मी देते ! पण या लालाना एक शब्दही बोलणार नाहीं असं वचन दे.

**सुंदरः**—वचन द्यायच्या आधीं, मी घरांतली कोणतीहि वस्तु बाहेर देणार नाहीं अशी यांनीं शपथ घेतली पाहिजे ! मग देते मी वचन.

**कामिनीः**—सुंदरलाल, माझ्याकरतां घ्या ही शपथ.

**सुंदर०ः**—आज पासून तुझ्याकरतां काय वाटेल तें करीन मग शपथेची काय गोष्ट आहे ? देवा शपथ मी आतां घरातलं कांहींएक बाहेर देणार नाहीं !

**कामिनीः**—दे आता मी मागितलेलं वचन.

**सुंदरः**—हें घे ( वचन देते ) पण तूं कंठा देणार कुठला ?

**कामिनीः**—अग, आज आनंदरावला महाराजांनीं दत्तक घेतलं ! आणि एलिस् साहेबानीं तो दत्तक कबूल केला ह्मणून बाईसाहेब आज साऱ्या पाळे-करणीना कंठे देतायत ! मी तुला वाड्यांत बोलवायला आले तर इथं हा प्रकार ! आतां मला मिळणारा कंठा मी तुला देईन; पण यांना आतां छळूं नकोस.

**सुंदरः**—त्याची नको तुला आतां काळजी.

**सुंदर:**—खरंच कामिनी, तुझ्या आजच्या उपकारानं माझी काळजी करण्यासारखी स्थिती होती ती टळली! मी तुझे उपकार जन्मांत विसरणार नाहीं! (स्वगत्) मी हिच्यावर प्रेम करायला लागलों कीं काय?

**कामिनी:**—(स्वगत्) हे सुद्धां माझ्यावर प्रेम करतात वरं कां! आई म्हणते कीं "पोरी, तुझं वाशिंगवळच जड, वाशिंगवळच जड." पण पाहाते आतां मऽझं लग्न कसं होत नाहीं तें!

**सुंदर:**—कामिनी, कधींमधीं येऊन भेटत जा बरं का?

**सुंदर:**—कांहो, परक्या बायकांशीं असंच वागायचं शास्त्रांत सांगितलं आहे; नाहीं?

**कामिनी:**—सुंदर, पण मी कुणी परकी कां आहे?

**सुंदर०:**—आणि शिवाय हिच्या आजच्या वर्तनानं मला कांहीं निराळंच वाटायला लागलं आहे, त्याला मी तरी काय करूं?

**सुंदर:**—नशीब माझं! बाई कामिनी, चांगलं केलंस वरं! सवत पण सवत.

**कामिनी:**—इश्श! हें ग काय? चल मुकाट्यानं वाड्यांत.

**सुंदर:**—नाहीं तर प्रेम चव्हाट्यावर येईल ना? (जातात.)

**सुंदर०:**—प्रेम! ही चीज आज मला समजली! या कामिनीचं माझ्याव-वर आणि माझं तिच्यावर प्रेम आहे बरं कां? पण—पण आमचं कुटुंब!

[ तोंड वाईट करून जातो. ]

[ पडदा उघडतो. ]

---

## लहरी ४ थी

स्वस्तिक वाचनालय नौपाडा - ठाणे.

[ **स्थल:**—झांशी. गंगाधररावांचा रंगमहाल. लक्ष्मीबाई राणी प्रवेशतात.]

**लक्ष्मी:**—एलिस् साहेबांच्या अनुमतीनं आज आनंदाला दत्तक घेतल्या-पासून, काय असेल तें असो, माझ्या आनंदाला पारावार उरला नाहीं! दसऱ्याच्या दिवशीं ओवाळणी म्हणून ही समशेर तिकडनं मला द्यायची झाली,

पण हा रणमर्दाचा साज, आवड असलांही, अंगावर लेण्यांत जनानी मर्यादेचं मी उल्लंघन तर नाहीं ना करीत असं माझं मलाच वाटे! आज या आनंदाच्या वेळीं या झांशीच्या भावि अधीपतीला-माझ्या बाळ आनंदाला या भाग्यशाली अलंकाराचं वाळलेणं घालून, त्याची प्रेमानं मी दृष्ट काढीन म्हणजे झालं! पेशव्यांच्या यशाची ही जडजोखीम माझ्या सारख्या अवलेनं जवळ ठेवण्याचं धाडस करूं नये हेंच वरं!

[ तरवार सोडून खालीं टेऊं लागते तों गंगाधरराव येतात. ]

**गंगाधर**:—हां हां सुकुमार! त्या देवतेचा असा उपमर्द नका करूं! या गंगाधररावाची ती प्रेमाची ओवाळणी म्हणजे मराठ्यांची ती विजय-माला आहे! आपल्या सारख्यांच्या हस्तस्पर्शानं आनंदीत झालेला त्या बिचारीचा दिल् आपल्या अशा कृतीनं दुखावणार नाहीं कां? उचला-उचला तिला! ( लक्ष्मी तरवार हातीं घेते ) पहा, किती मोहक दृश्य पुढं दिसूं लागलं!

**लक्ष्मी**:—पण त्यागाच्या भावनेनं मी हिला नाहीं सोडीत-केवळ योग्यतेच्या शंकेनं—

**गंगाधर**:—पण आपली योग्यता आपण ठरवायची नाहीं! तो निकाल विजया दशमीच्या शुभदिवशींच आम्ही लावला आहे! बसूं या-त्या देवतेच्या करपाशाचा विळखा आपल्या कटिबंधावर बसूं द्या! कां वृत्ति चंचल कां? आपल्याला कमीपणा कां वाटतो? सौंदर्यानं आपण केतकींतून जन्मल्याप्रमाणं दिसत असाल तर तिची माता मूर्तिमंत सौदामिनी आहे! लाजेनं-अहाहा-याच-याच लाजेनं आपला देह गुलावी खुलावटीनं मुसमुसलेल्या गुलाबाच्या कोमल पाकळ्यांचा बनवल्याचा भास होतो,-तर रणरंगानं रंगलेल्या या देवतेच्या मस्तानी सौंदर्यावर डोळे ठरत नाहींत! कोमलतेनं आपण तिच्या-वर मात कराल, तर चपलतेंत ती आपल्याला हार जाणार नाहीं!! तुम्हां दोघींच्या संयोगानं या हिंदुस्थानच्या इतिहासाला नवं वळण लागणार नसेल कशावरून? तुम्हाला ओवाळणी समशेर घालण्याची बुद्धि मला झाली, यांत विधि-योजनाच कारण असली पाहिजे! आपल्या हातून वीरांना लाजविणारी कृती कशावरून होणार नाहीं?

**लक्ष्मीः**—या मर्दाईच्या गोष्टीची या मनाला कांहींच नवलाई वाटत नाहीं! प्रसंग पडला तर या देवतेला तिच्या मर्जीविरुद्ध मी ओढून घेईन; मग आतां तर आपण होऊन हिचा हात माझ्या हातीं दिला आहे! हिला मी कशी दूर करीन? (तरवार कंबरेस बांधते.)

**गंगाधर०ः**—अहाहा! पहा—त्या आरशांत आपली छबी नीट निरखून पहा! शृंगारमंदिरांत प्रेमाच्या भरतीनं कंपायमान होणारी आपली नाजूक काया, या समर—साजानं अधीकच साजून दिसते! नका अशा लाजेनं खालीं पाहूं नका! ते तेजाळ विशाळ डोळे, त्या प्रतिबिंबाकडं लावायचे नसले तर या डोळ्याकडं रोखा! मग त्यांतल्या बिजलीच्या चमकीनं या हृदयाचा ठाव काढला तरी हरकत नाहीं! नका अशा मागं सरूं नका; तो पहा, नूपुरांच्या भारानं पाऊल थबकत पडल्यामुळं, क्षणाक्षणाच्या अवकाशानं उठणारा मंद छुमछुमाट त्या समशेरीच्या खळखळाटांत विरून जात आहे! किती अस्वस्थता इतक्यांत ही? प्रेमानं डंवरलेल्या वृत्तिचा हा बेभानपणा कीं या लढाऊ सजा-वटीमुळं क्षात्र—तेजाला आलेली उसळी?

**लक्ष्मीः**—नाहीं; या नवाईनं मनाची झालेली द्विधावृत्ति—

**गंगाधर०ः**—अशी द्विधावृत्ति होणं साहजीक आहे! पण कामदेवाच्या या मंदिरांत, या समरशृंगारापेक्षां—शृंगार साहित्याचीच बडदास्त आपण गृहि-णीच्या नात्यानं अधीक ठेवायला नको कां? या ठिकाणीं हृदयाला महिरून टाकणाऱ्या, सुधेचा वर्षाव करणाऱ्या त्या डोळींच्या कमानींतून—मंदिरांतून पाऊल बाहेर पडतांच—शत्रूला अंध बनविणाऱ्या तेजाचा अवतार झाला पाहिजे!—हृदयाच्या दिलदारीनं दगड बनलं पाहिजे—किंबहुना—आमच्याशीं गुजगोष्टी करतांना, प्रेमाच्या कोंडमाऱ्यानं बहरून गेलेल्या मनोवृत्ति भडकून गेल्यामुळं थरारणाऱ्या कायेचा—अन्यायाचा प्रतिकार करतांना थरकांप उडाला पाहिजे!—

**लक्ष्मीः**—चुकीच्या जाणीवतेनं ओशाळलेला हा जीव उपरोधीक उपदेशानं अधीक लाजऊं नये गडे! बाळपणीं नानासाहेब पेशव्यांच्या संगतीनं दांडपट्टा—भाला, तरवार शिकतांना त्यांत मी प्राविण्य मिळवलं;—लग्नानंतर परवां दसऱ्याला तरवार पुन्हा माझ्या हातीं आली पण प्रेमाच्या चढत्या रंगाखालीं माझी मर्दानी

आवड लोपून गेली. पण आज आपल्या कडूनच माझ्या युद्धप्रीतिका प्रोत्साहन मिळतांच, आवडत्या विषयाच्या अभिमानामुळं वृत्ति किंचित् बावरली !–[illegible] हार न गेलेल्या या लक्ष्मीनं आपल्या पायाशीं, आपल्या हृदयाच्या दिलरुब्यावर प्रेमाची गाणीं छेडून, आपली आनंदी वृत्ति फुलवून टाकायचीं मी क्षणभर विसरले याची क्षमा करा !

**गंगाधरः**—तर मग या–अशा जवळ या ! [तिचे हात धरून ओढून घेतो ] नका–या नितांत मनोहर लज्जामय हालचालींनं, हा हळवा जीव एकदम असा घायाळ करूं नका !–नका–या मुखमंडळावर विश्वकर्म्यानं मांडलेला अद्भूत रत्नांचा खेळ पाहण्याकरितां, आतूर झालेल्या या दृष्टीला–मधें या हातांच्या नागिणी उभारून बाध आणूं नका !– आहाहा–ती पहा–अस्मानच्या साऱ्या नक्षत्रांची मांडणी दातांच्या ठिकाणी झाली आहे !–गुरूला आणि शुक्राला–ही या डोळ्यांच्या छकुल्या रुपेरी मंजुषेंत जागा मिळाली–आणि रक्तवर्ण मंगळ हा पहा–या भालप्रदेशीं या कुंकुमतीलकांत—[ कुंकवाकडे बोट नेतो. लक्ष्मी तोंड लपवितांना हात उचलते इतक्यांत अकस्मिक रीतीनें तिच्याच हातानें कुंकू पुसटते] पण--पण--हें काय ?--या तुझ्या हातांच्या नागिणींनं तुझा कुंकुमतीलक गिळून टाकला !–अरेरे–[ सोडून देतो. ]–त्या दिवशीं तुझा चुडा भंगला; आज ऐन उन्मादाच्या वेळीं तुझं कुंकू पुसटलं !–लक्ष्मी–तुझ्या आशांचे मोती शेवटीं मेघांचे अश्रू तर नाहीं ना ठरणार ?

**लक्ष्मीः**—अगबाई ! हें काय ? त्या दिवशीं मनाचं समाधान मानून घेतलं पण आज मनांत चर्र झालं ! देवि महन्मंगले–या अमंगलाचं निवारण तूंच कर !

**गंगाधरः**— ती काय करणार ? भवितव्याचा नकाशा प्रत्यक्ष ब्रह्मदेवालाही बदलता येणार नाहीं ! या झांशीचं भग्न भविष्य मला स्पष्ट दिसूं लागलं !–लक्ष्मी, तुझ्या सारख्या अप्सरेचं सान्निध्यसुख माझ्या अभाग्याच्या नशिबीं नाहीं !--आजच्या या अशुभानं तर माझा सारा उत्साह मावळून गेला ! हा क्षण सुखाचा कीं शेवटचा हेंच मला समजेना ! नाहीं--कल्पना बधीर झाली; मनांत निराशेच्या अंधारामुळं शून्यता भासूं लागली !–लाडके, या जगाकडं प्रेमाच्या शेवटच्या दृष्टीनं पहात असतांना जिवा-वैधव्याच्या कल्पनेनं–नको, वाईट वाटून घेऊं नकोस

पण तुझ्या मांगल्याचा मालक या जगांतून नाहींसा होतांना--तुझ्या खचलेल्या धीरामुळं लटाटणाऱ्या तुझ्या कायेकडं पाहून, जे शेवटचे शब्द तुला सांगितले असते, तेच शब्द, हा क्षण शेवटचा समजून तुला सांगतों. लक्ष्मी, या झांशीचं वैभव, पूर्वजांचं नांव, स्वतःचा धर्म, स्वतःचे हक्क पालन करण्याकरतां जगांतील कोणत्याही असुरी सत्तेशीं झगडायला तूं मागं पुढं पाहूं नकोस ! यापुढं तुझी पाठीराखी ती तुझी बहीण समशेर.

लक्ष्मीः—नका-महाराज-अशा निराश शब्दांच्या समशेरीनं या लक्ष्मीचं हृदय असं चिरूं नका ! ज्यांनीं आपल्या मनाला भयंकर दंश केला, त्या या चांडाळणीच्या हातांच्या नागिणी या क्षणीं छाटून टाका !–

गंगाधरः—वेडा जीव !· तुझे हात छाटल्यानं माझं नशीब कसं छाटलं जाणार ? जाऊं दे सोड मला ! भडकलेल्या जिवाचं समाधान एकांतांत मला करूं दे. घे ते अश्रू मागं– [ जातो. ]

[ लक्ष्मी तटस्थपणें त्याच्याकडे पहात रहाते. ]

लक्ष्मीः—अश्रू मागं घे !–घेतले वरं अश्रू मागं ! आपल्या कोमल मनाला चरका देणारा अपशकुन, शृंगारशय्येवर या अभागिनीच्यामुळं झाला. आर्य–स्त्रीनं अभद्र बोलूं नये असं म्हणतात;–पण मी ही लक्ष्मी बोलत नसून या झांशीची जबाबदारी, अखंड चुडेमंडित असणारी ही राज्यलक्ष्मी माझ्या तोंडून हे शब्द वदवीत आहे कीं " अनाथ स्थितींत मी माझ्या पतीची आज्ञाच प्रमाण मानीन "! –या बेमानीच्या दुनियादारींत दोन भिन्न आत्म्यांची दिलजमाई झाली कीं परस्परांच्या कुडीवरचा मोह एकमेकांच्या जीवन–कर्तव्यांत विरत असतो ! प्राणेश, आपलं भडकलेलं भान ताळ्यावर आणण्याकरितां, या हृदयांत ठसलेल्या आपल्या कर्तव्य–मूर्तीला मी ही जिवाची आणभाक ऐकवली ! याची–दृश्य जगांत आपल्याला खूणगांठ पटून, आपलें मन शांत राहो !– [ तरवार उपसून ] –बाई विजये, आजपर्यंत ज्या नर–रत्नांच्या हातचं तूं लेणं झालीस, त्यांना आनंद देण्याकरितां तूं अनेक तऱ्हेचीं साहसं केलीं असशील !–आणि म्हणूनच तुला जीवाची जिवलगा म्हणविण्यांत, त्यांनाही भूषण वाटलं ! आज ज्याची तूं सहधर्मचारिणीं आहेस, त्या तुझ्या पतीला, या तुझ्या प्रेमळ म्हणविणाऱ्या सवतीनं–मर्मी दुखावलं, याबद्दल तूं रागावणार तर नाहींस ना ? सखे, फसवून

आवड लोपून गेली. पण आज आपल्या कडूनच माझ्या युद्धप्रीतिला प्रोत्साहन मिळतांच, आवडत्या विषयाच्या अभिमानामुळं वृत्ति किंचित् बावरली !— प्राणेश, रावसाहेबासारख्या वीराला शस्त्रविद्येंत हार न गेलेल्या या लक्ष्मीनं आपल्या पायाशीं, आपल्या हृदयाच्या दिलख्याावर प्रेमाची गाणीं छेडून, आपली आनंदी वृत्ति फुलवून टाकायची मी क्षणभर विसरले याची क्षमा करा !

**गंगाधर**:—तर मग या—अशा जवळ या ! [तिचे हात धरून ओढून घेतो ] नका—या नितांत मनोहर लज्जामय हालचालीनं, हा हळवा जीव एकदम असा घायाळ करूं नका !—नका—या मुखमंडळावर विश्वकर्म्यानं मांडलेला अद्भूत रत्नांचा खेळ पाहण्याकरितां, आतूर झालेल्या या दृष्टीला—मधें या हातांच्या नागिणी उभारून बाध आणूं नका !— आहाहा—ती पहा—अस्मानच्या साऱ्या नक्षत्रांची मांडणी दातांच्या ठिकाणी झाली आहे !—गुरूला आणि शुक्राला—ही या डोळ्यांच्या छकुल्या रुपेरी मंजुषेंत जागा मिळाली—आणि रक्तवर्ण मंगळ हा पहा—या भालप्रदेशीं या कुंकुमतीलकांत—[ कुंकवाकडे बोट नेतो. लक्ष्मी तोंड लपवितांना हात उचलते इतक्यांत अकस्मिक रीतीनें तिच्याच हातानें कुंकूं पुसटते] पण--पण--हें काय ?--या तुझ्या हातांच्या नागिणींनं तुझा कुंकुमतीलक गिळून टाकला !—अरेरे—[ सोडून देतो. ]—त्या दिवशीं तुझा चुडा भंगला; आज ऐन उन्मादाच्या वेळीं तुझं कुंकूं पुसटलं !—लक्ष्मी—तुझ्या आशांचे मोती शेवटीं मेघांचे अश्रू तर नाहीं ना ठरणार ?

**लक्ष्मी**:—अगबाई ! हें काय ? त्या दिवशीं मनाचं समाधान मानून घेतलं पण आज मनांत चर्र झालं ! .देवि महन्मंगले—या अमंगलाचं निवारण तूंच कर !

**गंगाधर**:— ती काय करणार ? भवितव्याचा नकाशा प्रत्यक्ष ब्रह्मदेवालाही बदलता येणार नाहीं ! या झांशीचं भग्न भविष्य मला स्पष्ट दिसूं लागलं !—लक्ष्मी, तुझ्या सारख्या अप्सरेचं सान्निध्यसुख माझ्या अभाग्याच्या नशिबीं नाहीं !--आ- जच्या या अशुभानं तर माझा सारा उत्साह मावळून गेला ! हा क्षण सुखाचा कीं शेवटचा हेंच मला समजेना ! नाहीं--कल्पना बधीर झाली; मनांत निराशेच्या अंधारामुळं शून्यता भासूं लागली !—लाडके, या जगाकडं प्रेमाच्या शेवटच्या दृष्टीनं पहात असतांना जिवा-वैधव्याच्या कल्पनेनं—नको, वाईट वाटून घेऊं नकोस

पण तुझ्या मांगल्याचा मालक या जगांतून नाहींसा होतांना–तुझ्या खचलेल्या धीरामुळं लटाटणाऱ्या तुझ्या कायेकडं पाहून, जे शेवटचे शब्द तुला सांगितले असते, तेच शब्द, हा क्षण शेवटचा समजून तुला सांगतों. लक्ष्मी, या झांशीचं वैभव, पूर्वजांचं नांव, स्वतःचा धर्म, स्वतःचे हक्क पालन करण्याकरतां जगांतील कोणत्याही असुरी सत्तेशीं झगडायला तूं मागं पुढं पाहूं नकोस ! यापुढं तुझी पाठीराखी ती तुझी बहीण समशेर.

**लक्ष्मीः**—नका–महाराज–अशा निराश शब्दांच्या समशेरीनं या लक्ष्मीचं हृदय असं चिरूं नका ! ज्यांनीं आपल्या मनाला भयंकर दंश केला, त्या या चांडाळणीच्या हातांच्या नागिणी या क्षणीं छाटून टाका !–

**गंगाधरः**—वेडा जीव !· तुझे हात छाटल्यानं माझं नशीब कसं छाटलं जाणार ? जाऊं दे सोड मला ! भडकलेल्या जिवाचं समाधान एकांतांत मला करूं दे. घे ते अश्रू मागं– [ जातो. ]

[ लक्ष्मी तटस्थपणें त्याच्याकडे पहात रहाते. ]

**लक्ष्मीः**—अश्रू मागं घे !–घेतले वरं अश्रू मागं ! आपल्या कोमल मनाला चरका देणारा अपशकून, शृंगारशय्येवर या अभागिनीच्यामुळं झाला. आर्य–स्त्रीनं अभद्र बोलूं नये असं ह्मणतात;–पण मी ही लक्ष्मी बोलत नसून या झांशीची जबाबदारी, अखंड चुडेमंडित असणारी ही राज्यलक्ष्मी माझ्या तोंडून हे शब्द वदवीत आहे कीं " अनाथ स्थितींत मी माझ्या पतीची आज्ञाच प्रमाण मानीन "!–या बेमानीच्या दुनियादारींत दोन भिन्न आत्म्यांची दिलजमाई झाली कीं परस्परांच्या कुडीवरचा मोह एकमेकांच्या जीवन–कर्तव्यांत विरत असतो ! प्राणेश, आपलं भडकलेलं भान ताळ्यावर आणण्याकरितां, या हृदयांत ठसलेल्या आपल्या कर्तव्य–मूर्तीला मी ही जिवाची आणभाक ऐकवली ! याची–दृश्य जगांत आपल्याला खूणगांठ पटून, आपलें मन शांत राहो !– [ तरवार उपसून ] –बाई विजये, आजपर्यंत ज्या नर–रत्नांच्या हातचं तूं लेणं झालीस, त्यांना आनंद देण्याकरितां तूं अनेक तऱ्हेचीं साहसं केलीं असशील !–आणि ह्मणूनच तुला जीवाची जिवलगा ह्मणविण्यांत, त्यांनाही भूषण वाटलं ! आज ज्याची तूं सहधर्मचारिणीं आहेस, त्या तुझ्या पतीला, या तुझ्या प्रेमळ ह्मणविणाऱ्या सवतीनं–मर्मीं दुखावलं, याबद्दल तूं रागावणार तर नाहींस ना ? सखे, फसवून

बोलत नाहीं; पण जर माझ्यामुळं घडलेल्या या अशुभानं पतीला संतोषित करण्याचं तुझं व्रत सोडणार असेल,–तुझ्या भाग्याचा टिळा नाहींसा होणार असेल, तर देहीं खेळणाऱ्या जिवंत कुंकवाच्या टिळ्यानं तुझं कपाळ साजरं करीन, हीच माझी प्रतिज्ञा !–याला साक्षी माझं सौभाग्य ! ! या झांशीचीं वैभव-देवता ! ! !

[ ड्रॉप पडतो. ]

## प्रथम झंकार समाप्त.

# द्वितीय झंकार.

## लहरी पहिली.

[ स्थळः—ब्रह्मावर्त गंगातटाक. नानासाहेब पेशवे सायंसंध्येस बसले आहेत. जवळ मोरोपंत. ]

**मोरोपन्तः**—[ मावळत्या सूर्याकडं पाहून. ] श्रीमंत नानासाहेब, या मावळत्या सूर्याकडं दृष्टी गेली कीं झांशीचा सूर्यास्त डोळ्यापुढं स्पष्ट उभा राहतो ! श्रीमंत गंगाधररावांना कैलासवासी होऊन आज उणीपुरीं तीन वर्षं झालीं, पण अद्याप ती गोष्ट कालच झालीसं वाटतं !

**नानासाहेबः**—मोरोपंत, परमेश्वरी इच्छेपुढं पादशाही इच्छेचा मुळींच पाड नसतो !–विचारी मनानं गेल्याचा शोक न करतां सध्यःपरिस्थितीकडं नजर रोखली पाहिजे.–पाहिलंत या सूर्याकडं ? खरोखर याच्या या प्रशांत रक्तबिंबाकडं दृष्टी गेली कीं हृदयांत कसलेही भडकणारे विचार असले तरी त्या सर्वांना, या सायंकालच्या अर्घ्याबरोबरच, या गंगाजलांत सोडून द्यावं, असंच वाटतं ! मानवी मनोवृत्तिंना क्षुब्ध करणाऱ्या गोष्टी ज्याप्रमाणं या जगांत प्रत्यहि घडत असतात, त्याचप्रमाणं त्या क्षुब्ध मनोतरंगांना शांततेचं स्वरूप आणून देण्याचीहि साधनं अस्तित्वांत आहेत ! मला तर वाटतं कीं रात्रीच्या वेळीं भयाण राक्षसी रूप धारण करणाऱ्या धरित्रीला प्रसन्नता आणण्याकरतां प्रभातकाल आणि मध्यान्हीच्या प्रखरतेला प्रशांत स्वरूप देण्याकरतां सायंकाळ; या दोन कालांची योजना या दुनियेच्या व्यवहारांत परमेश्वरानं याच हेतूनं केली असावी !–हल्लीं या हिंदुस्थानांत बंडाच्या पेटलेल्या वणव्याकडं दृष्टी–जाऊन, स्वधर्माकरितां स्वामीशीं–या इंग्रजानीं झुंजायला तयार झालेल्या या हिंदुमुसलमानांचा विचार करूं लागलं कीं एकवेळ चित्तवृत्तींत चलबिचल होऊन हातीं शस्त्र घ्यावं.

**रावसाहेबः**—[ एकदम प्रवेशून. ] होय, नानासाहेब, शस्त्र–आतां हातीं शस्त्रच घेतलं पाहिजे.

**मोरोपन्तः**—श्रीमंत, मी ज्या कामाकरतां झांशीहून इथं आलों, ते काम करण्याची वेळ आली. या बंडांत झांशी राजनिष्ठच राहणार ?

**रावसाहेबः**—नानासाहेब, माझ्या ह्मणण्याप्रमाणं वागायला आपली तयारी आहे किंवा नाहीं.

**नानासाहेबः**—ह्मणजे काय रावसाहेब ?

**रावसाहेबः**—ह्मणजे काय ? नानासाहेब, बोला- आपण आणखी किती दिवस ही पळीपंचपात्री घेऊन या सूर्याला अर्घ्य देणार ? त्या अर्घ्याबरोबर तुमच्या अंगांत नवीन तेजस्वितेचा संचार होण्याऐवजीं, तुमची मूळची तेजस्विताच जर त्या अर्घ्या बरोबर प्रत्यहीं कमी होत जाऊन, त्या सूर्याच्या तेजांत मिळूं लागली तर या अर्घ्याचा काय उपयोग ? पानिपतच्या रणांगणावर पराक्रमाची शिकस्त करून प्रखर तेजाच्या सूर्याला सुद्धां लज्जेनें खालीं मान घालून अस्ताला जायला भा पाडणारे पेशवे,-मराठ्यांच्या झेंड्याला अटकेपार नाचवणारे पेशवे,-एकोणिसाव्या शतकांत पळीपंचपात्री घेऊन, आपल्या क्षत्रियत्वावर लाथ मारून-भिक्षुकी करूं लागले, असाच लौकीक तुह्मी मिळवणार काय ? बोला—नानासाहेब-बोला· स्वतःला पेशवे ह्मणवून घ्यायचा तुह्माला काय अधिकार ? न्यायदंडाच्या ऐवजीं—राजदंडाच्या ऐवजीं दर्भाच्या काड्या हातीं धरल्या ह्मणून ? समशेरीच्या ऐवजीं हातीं पळी धरली ह्मणून ?

**नानासाहेब**—रावसाहेब, तुला झालं तरी काय ? बंडवाल्यानीं तर तुझ्यावर जादू केली नाहीं ना ?

**रावसाहेब**—होय, केली, आणि तीच जादू तुमच्यावर करण्याकरतां मी आलों आहें ! बोला, हातीं शस्त्र घेणार कीं दर्भाच्या काड्या घेणार ?

**मोरोपन्त**—रावसाहेब, शांतपणानंच कोणत्याही गोष्टीचा विचार केला पाहिजे ! या वेळेला शस्त्र उचलण्यापेक्षां–स्वामिद्रोह करून राजद्रोहाचं खापर डोक्यावर फोडून घेण्यापेक्षां–स्वामिनिष्ठ राहून, आपल्याला स्वतःचं हीत जितकं साधतां येईल तितकं दुसऱ्या कोणत्याही रीतीनं शक्य नाहीं !

**रावसाहेब**—मोरोपन्त, या इंग्रजांच्या करतां तुमच्या हिंदूलोकांनीं आजपर्यन्त या आर्यभूमीवर आपलं थोडं का रक्त सांडलं ? आमचे हिंदुलोक यांच्याकरतां, यांच्या सत्याच्या पायावर उभारलेल्या न्याय-मंदिराच्या रक्षणाकरतां, जगांत

कुठंही आपल्या रक्ताचा सडा घालायला तयार नव्हते कां ?–पण तुमच्या धर्मावर घाला आला असतांना–तुमच्या गोमातांचे बळी रोज शेकड्यानं पडत असतांना सुद्धां तुह्मी राजनिष्ठेचे पोवाडे गावेत ! खरोखर, धन्य आहे तुमची आणि तुमच्या राजनिष्ठेची ! ! प्रत्यक्ष तुमची झांशी खालसा होऊन, तुमचं सर्वस्वीं वाटोळं झालं तरी सुद्धां तुमचे डोळे उघडूं नयेत ना ?

**मोरोपन्त**—झांशी आमच्याकडं असतांना ती जशी इंग्रजांशीं राजनिष्ठ राहिली तशीच ती आतांही राहणार ! स्वतःच्या अर्थापेक्षां आपल्या दानतीवर डाग कधीं हि न येऊं देण्याकरतां, हिंदू आपलं रक्त कुठंही सांडायला तयार होतात–असंच झांशी साऱ्या जगाच्या अनुभवास आणून देईल!–रावसाहेब, ज्या इंग्रजांनीं अन्यायानं झांशी खालसा केली, त्याच इंग्रजांनीं तीच झांशी आपखुशीनं आमच्या स्वाधीन केली ! याच बंडांत आह्मी आपलं रक्त त्यांच्याकरतां सांडलं, हें पाहतांच ते आमच्याशीं प्रेमानं वागूं लागले ! बोला, आह्मी त्यांच्याशीं द्रोह कां करावा ?–आमच्या राजनिष्ठेचा अपमान–आमच्या स्वाभिमानाचा अपमान त्यांच्याकडून झाला कां ?

**रावसाहेब**—भोळ्या मना ! झांशी तुमच्याकडं आली हा भ्रम आहे ! इंग्रजी मुत्सद्यांनीं या बंडाच्या वेळीं टाकलेला हा एक बुद्धी–डाव आहे ! दिवसेंदिवस अवजड होत जाणारा राज्यशकट अशा अडचणींतून केवळ मानमरातबाच्या भाड्यावारी तुमच्याकडून ओढून घ्यावा, याच्या पलीकडं यांत दुसरा कोणताही डाव नाहीं. त्यांच्यावर चालून आलेल्या नथेखानला तुह्मी आपल्या तरवारीच्या जोरावर मागं फिरवलंत–पण या प्रकरणाचे तिढे लवकरच कसे जखडले जातील ते पहा ! या परिस्थितींतून निभाऊन जातांच तुह्मांला सिंहासनावरून खालीं खेंचून.

**मोरोपंत**—ज्याक्षणीं तसा प्रसंग येईल, त्याक्षणींच झांशीची तरवार उपसली जाईल, रावसाहेब लक्षांत ठेवा, हें रक्त अस्सल हिंदूचं आहे.

**रावसाहेब**—त्याच रक्ताच्या उसळी करितां आज सारा देश टपून बसला आहे ! नानासाहेब, बोला, आपण हातीं शस्त्र घेऊन बाहेर पडायला आज तयार आहांत काय ? सारे बंडवाले, आपल्या एका शब्दाची वाट पहात आहेत ! सांगा ? त्यांची निराशा करून, साऱ्या समाजाचं अहित करून समाज—द्रोहाचें पातक माथ्यावर घेणार कीं,–

**नानासाहेबः**—पण, रावसाहेब, साऱ्या समाजाचंच मन चुकींच असेल तर ? कांहीं विशिष्ट कारणानं समाजाचं अन्तःकरण भडकून, मनःक्षोभामुळं अविचार होण्याचा सम्भव फार असतो.

**रावसाहेबः**—नानासाहेब, समाजांतील एका व्यक्तीला हे शब्द काढण्याचा अधिकार मुळींच नाहीं. समाजाचा मी बांधलेला आहे हें तत्व कबूल केल्यावर असा प्रश्न विचारण्याचा अधिकार कोणासही नाहीं ! समाजाची इच्छा हींच त्याची इच्छा ! समाजाचं ध्येय हेंच त्याचं ध्येय ! आणि समाजानं स्वीकारलेला मार्ग हाच त्याचाही मार्ग ! नानासाहेब, मी समाजाचा बांधलेला नाहीं. असं म्हणून तुमच्या पेशवाई–पदाला काळिमा तरी फासा किंवा, या वेळीं समाजाच्या मताचा पुरस्कार तरी करा !

**नानासाहेबः**—रावसाहेब, तूं या वेळीं मला कसं अगदीं पेंचांत पकडलं आहेस ! काय करूं ?

**रावसाहेबः**—काय करूं ? काय करूं ? या मावळत्या सूर्याकडं दृष्टी फेंका, म्हणजे, तो, तुम्हाला ‘ काय करूं ’ ह्या प्रश्नाचं उत्तर देईल. पानिपतच्या रणसंग्रामांत देहाच्या चिंध्या उडवून घेणाऱ्या, सदाशिवराव भाऊंचा तेजस्वी आत्मा, या मावळत्या सूर्यांत जागृत होऊन, पानिपतच्या रणभूमीवरून वाहणारा हृदयभेदी रक्ताचा पाट, आरक्त–क्षितीजावर पसरलेल्या या रक्तिमेनं तुम्हांला दाखवित आहे ! पानिपतच्या समर–भूमीवर जिरलेलं पुण्यश्लोक रक्त आज या आकाशांत उसळून, तुम्हांला विचारीत आहे, कीं, ही स्वर्गीय रक्तिमा तुमच्या रक्तांत आहे कां ? सांगा–नानासाहेब, या घटकेला–सारादेश हाच माझा संसार, साऱ्या देशाचं कल्याण तेंच माझं कल्याण, असं म्हणायाला आपण तयार आहांत काय ? या मावळत्या सूर्याला साक्षी ठेवून, माझ्या देशाचा संसार थाटण्याकरितां मी माझ्या एकट्याच्या संसारावर लाथ मारायाला तयार आहें, अशी प्रतिज्ञा करण्याची तुमची छाती आहे काय ?

**नानासाहेबः**—या नानासाहेबाची छाती ! रावसाहेब, सदाशिवराव भाऊंनीं ज्या पेशव्यांच्या पराक्रमाचा डंका, अलम दुनियेंत गाजवला, त्याच पेशवाईच्या गादीचा, नामधारी कां होईना, पण मालक मी आहें ! माझी छाती ! ह्याच्यापेक्षांही भयंकर प्रतिज्ञा असेल तर सांग ! ती सुद्धां मी करीन ! माझ्या एकट्यावर

जर साऱ्या देशाचा आनंद अवलंबून असेल तर हीच प्रतिज्ञा काय, पण देशाच्या इच्छे पर्यंत मी उपाशीसुद्धा रहायला तयार आहें !

**रावसाहेबः**—होय; सारा देश आपल्या शब्दाकरतां आतूर आहे ! या बंडाला राष्ट्रिय स्वरूप देणं आपल्या हातीं आहे ! मीरतचे सारे बंडवाले आज ब्रह्मावर्ताच्या पायांशीं सेनानीची भिक्षा मागीत आहेत !

**नानासाहेबः**—माझ्या देशाच्या संसाराकरिता-सौख्याकरितां मी माझ्या स्वतःच्या संसारावर आणि सौख्यावर लाथ मारिली ! जा, रावसाहेब, तात्या टोपीला बंडवाल्यांची व्यवस्था ठेवायला सांगा. मोरोपंत, माझ्या मतें सरकारशीं राजनिष्ठ राहण्याची पायरी गेली असें वाटल्यावरून मी माझा मार्ग स्वीकारला आहे ! लक्ष्मीबाईंची या बंडांत सरकारशीं राजनिष्ठ राहण्याची इच्छा आह्मांला पूर्ण करतां येत नाहीं—याबद्दल नाईलाज आहे ! जा, सरकाराशीं राजनिष्ठ असणारे सारेजण आजपासून आमचे शत्रू झाले आहेत !—रावसाहेब, या गंगेला साक्षी ठेऊन ही पहा मी माझी ब्रह्मवृत्ति पळीपंचपात्री गंगार्पण केली—[ पळी पंजपात्री गंगार्पण करतो. ]

**रावसाहेबः**—जा, मोरोपंत, जा आणि आपल्या राजनिष्ठेच्या जोरावर रणांगणांत आमच्याशीं सामना द्यायला तयार व्हा ! दोन वर्षांपूर्वी वाघाच्य शिकारीत मित्रप्रेमानं तुमच्या हृदयावर शांतपणानं पडलेला हा रावसाहेबाचा हात आतां तुमच्या गळ्यावर पडायला तयार झाला आहे !—जा.

**मोरोपंतः**—रावसाहेब, हें युद्धाचं आव्हान मी मोठ्या आनंदानं स्वीकारतों ! हा मोरोपंत जोंपर्यंत इंग्रजांशीं राजनिष्ठ आहे तोंपर्यंत आपल्याशींच काय पण साऱ्या जगाशीं सामना द्यायला त्याची तयारी आहे ! इंग्रजानीं जोपर्यंत आमचा अपमान केला नाहीं तोंपर्यंत झांशी आपल्या स्वामीशी कधींही बेइमान होणार नाहीं ! आपल्या धमकीला बिचकून हा मोरोतंत एक पाऊलही मागं सरणार नाहीं हें पूर्ण लक्षांत ठेवा. एवढंच नव्हे, तर याक्षणीं याठिकाणीं या राजनिष्ठ मोरोपंतांची तरवार माझ्या शत्रूच्या या चक्रव्यूहांत-तुमच्या सारख्या बंडखोराची—

**रावसाहेबः**—हां, खबरदार—

**मोरोपंतः**—पुन्हाही ह्मणतों—बंडखोरांची लढण्याची हौस पूर्ण करायला तयार आहे ! या देहांतून तुमच्या निमकहराम तरवारीनीं फोडली जाणारी रक्ताची

प्रत्येक चिळकंडी आपल्या तेजस्वी लालीनं जगाला सांगेल कीं मोरोपंत राजनिष्ठ होता ! लक्ष्मीची झांशीं राजनिष्ठ होती ! या मोरोपंताच्या अंगांत संचार करणारा रक्ताचा प्रत्येक थेंब आपल्या शीलाकरतां प्रत्यक्ष देशबंधूशीं लढायला तयार आहे; समजलात ?

**रावसाहेबः**—आणि तुह्मीही लक्षांत ठेवा कीं असल्या देशबुडव्या राजनिष्ठांची हाडं देशांकरतां पिंजून टाकायला हा रावसाहेबही तयार आहे.

**मोरोपंतः**—ही हाडं पिंजून जातील पण राजनिष्ठ राहतील! याची प्रचीति रावसाहेब, जर आपल्याला पाहायची असेल तर ही पहा—या मोरोपंताची तरवार आहे! [तरवार उपसतो] आपल्या विरुद्ध झांशीच्या लक्ष्मीनं रणशिंग फुंकायच्या आधीं या मोरोपंताच्या तरवारीचा खणखणाट झांशीच्या राज निष्ठेला खडबडून जागं करील.

**रावसाहेबः**—परस्परांच्या भिन्न मार्गावर पाऊल टाकतांना—ज्या ठिकाणाहून हे मार्ग फुटले त्या ठिकाणीं जर आपल्या उभयतांच्या रक्ताचीच पहिली निशाणी होण्याचा विधिसंकेत असेल—तर तो आपल्याला तरी कसा टाळतां येणार [ तरवार उपसतो. ]

**नानासाहेबः**—[ मध्यें येऊन ] नाहीं—हा विधिसंकेत नाहीं ! रावसाहेब, मोरोपंत, भावि रक्तपात या पवित्र गंगातटाकीं होतां कामा नये तर आपल्या उभयतांच्या पवित्र ध्येयाची सुरवात या ठिकाणी झाली पाहिजेत !—तुमची राजनिष्ठा—मोरोपंत—लक्ष्मीबाईची पवित्र राजनिष्ठाच जर देशोद्धाराकडं वळली तर खात्रीनं देशोद्धाराचं मंदीर हां हां ह्मणतां वर चढेल ! तुमच्या स्वर्गीय स्वामिसेवेची किंमत या काळांत अगदींच अल्प होणार !

**मोरोपंतः**—दैवयोगानं जर तसा अनुभव आलाच तर नानासाहेब, आमचा मार्ग चुकला असं समजून—आह्मी आपल्या मार्गाकडे आनंदानं वळूं.

**नानासाहेबः**—महाराणीची भेट आह्मांला उघडपणें घेतां येईल कां?

**मोरोपंतः**—नाहीं—मुळींच नाहीं ! राजनिष्ठेच्या विरुद्ध असणारी कोणतीच गोष्ट यापुढं आमच्या हातून होणार नाहीं ! नानासाहेब, रावसाहेब माझ्या कठोर

वर्तनाबद्दल न रागावतां-ऐकेवेळी असणारे माझे अन्नदात ह्मणून या आपल्या सेवकाचा पण यापुढं आपला मार्ग रोखून धरणाऱ्या आपल्या शत्रूचा हा शेवटचा प्रणाम घ्या !

[ नमस्कार करतो. ]

**रावसाहेबः**—जा-मोरोपंत-जा; राजनिष्ठेनं फुलून गेलेल्या स्वर्गीय आत्म्या ! तुझ्या अचल मनाचं कौतुक करावसं वाटतं पण आमच्या दुर्दैवानं त्याच्यावर यापुढं कठोर प्रहार करावे लागतील त्याची क्षमा कर !

[ जातात. ]

---

## लहरी दुसरी.

[ **स्थलः**-झांशी. सुंदरलालचें घर. कामिनी प्रवेश करते. ]

**कामिनीः**—संक्रांत सगळयावर येते, पण मेली बायकांवर येऊन ही मुंदर कशी टळत नाहीं देव जाणं ! वाड्यांत पहावें तर बाईसाहेबांची लाडकी हीच; सर पाळेकरीण हीच;-आणि बाईसाहेबांचा राग कुणावर तर माझ्यावर ! बरं, घरीं पहावं तर देवाच्या गुणाचा नवरा, पण त्याला सुद्धां ही मुंदर अष्टौप्रहर वहिलांतनं काढते आणि चुलींत घालते आणि चुलीतनं ओढते आणि वहिलांत कोंबते !-खरंच, या सुंदरलालच्या गुणानं मला वेड लागायची वेळ आली. “ तुझ्या पश्चात् मी सुंदरलालशीं लग्न करीन ” असं देवीच्या पायांना साक्षी ठेऊन मी हिला वचन दिलं, त्याला आज तीन वर्षं झालीं असतील, पण मेली अजून मरत नाहीं ! मला तर वाटतं कीं ही तर कांहीं मरणार नाहींच पण शपथ मोडली तर देवी मला मात्र मारणार; नाहींं तर शेवटीं प्रेमानं तरी मी मरणार !! एकंदरींत माझं मात्र वडवडलं आहे खरं !-सुंदरलाल-अहो सुंदरलाल !

**सुंदर**•:—[ प्रवेश करीत, ]-तक्षक-तक्षक !-काळभैरव-काळभैरव !!

**कामिनीः**—अहो तक्षक काळभैरव काय ह्मणता ?

सुंदर०:—अग, मला वाटलं माझी ती लाडकी नागीणच आली! तक्षकाच्या नांवानं तिला बांधणार होतों आणि काळभैरवाचा सोटा तिला दाखवणार होतों! पण पहातों तो ही माझी कामिनी.

कामिनीः—खरंच, सुंदरलाल-या कर्कशेच्या तावडींतून कसं हो सुटावं?

सुंदर०:—खरंच; ती घरांत नाहीं तर आताच एखादी युक्ति सुचते कां पाहूं! तिच्या देखत असली वाटाघाट करण्याची निदान माझी तरी छाती नाहीं.

कामिनीः—मला सुद्धां तिचं भयच वाटतं! नथेखानशी परवा लढाई झाली तेव्हां लढतांना किती पण भयंकर दिसत होती ह्मणता? एक एक डोळा एवढाला केला होता.

सुंदर०:—त्याचा अनुभव मला आहे! रागावून एकदां कां तिनं डोळे वटारले कीं मी सगळाच त्यांत जातों कीं काय असं वाटून मी डोळे झांकून घेतों।

कामिनीः—रक्तानं चिंब झाली होती, त्यावेळेला तर तिच्याकडे बघवत नवतं! नुसता चंडिकेचा अवतार दिसत होता.

सुंदर०:—रागावली ह्मणजे हा देखावा मला कधीं कधीं दिसतो खरा! मी देवीला एक नवस करणार आहे.

कामिनीः—कोणता?

सुंदर०:—कीं देवी, माझ्या बायकोला एकदा सपाटून राग आण आणि त्या रागाच्या झटक्यानं ताठून तिला मरूं दे!!

सुंदर०:—[ एकदम प्रवेशून ]-कोण? कामिनी?

सुंदर०:—अरे बापरे! मेलों वाटतं! [ डोळे झांकून घेतो. ]-कामिनी, अग तूं तरी जिवंत आहेस कां?-मेली असलीस तर सांग! वीज पडल्यामुळं माझे डोळे गेलेत-मला कांहीं दिसत पण नाहीं आणि समजत पण नाहीं.

कामिनीः—सुंदरलाल-जातें हो जातें.

सुंदरः—कामिनी-अहो भटजीबुवा.

सुंदर०:—अजून मी जिवंत आहे बरं कां! यापुढं जीव वांचवायचा असेल तर यःपलायते!

कामिनीः—आतां काय करूं? माझे पाय लटपटतायत.

सुंदर०:—माझीहि तीच दशा आहे!–तूं ह्या दारानं पळ–मी या खिडकींतून उडी टाकतों.

मुंदरः—खबरदार कामिनी ! तिथून हालशील तर देवीची शपथ आहे तुला ! हं भटजी.

[ त्याला पकडते ]

सुंदर०:—अरेच्या ! नवऱ्याला भटजी ह्मणते! अग कामिनी मी सांपडलों पण तूं तरी आपला जीव वांचव.

कामिनीः—अहो मेलीनं शपथ घालून माझे पाय मोडलेत हो!

सुंदर०:—तर मग आटोपला सारा कारभार ? देवी शरण......

मुंदरः—तुह्मी दोघेही आज गुन्हेगार आहांत.

सुंदर०:—कसूर माफ ? कामिनी, चुकेदान मागून घे.

मुंदरः—पुन्हां तोच गुन्हा ! देवीची शपथ तुह्मी कां मोडलीत ?

सुंदर०:—मुळींच मोडली नाहीं.

कामिनीः—अहो मोडली ह्मणा–खोटं बोलूं नका–देवीचा राग होईल हो राग होईल !

सुंदर०:—अग घाबरूं नको.

मुंदरः—तुह्मी शपथ कशी नाहीं मोडलीत तें सांगा पाहूं.

सुंदर०:—तुझ्या पश्चात् ही कामिनी माझी पत्नी ना ? झालं तर मग पश्चात् ह्मणजे गैरहजरींत ! देवीचा देव आला तरी सुद्धा खोटं ठरणार नाहीं.

मुंदरः—हे शब्दांचे डावपेंच नकोत.

सुंदर०:—नाहीं; हे डावपेंचाचे शब्द आहेत !

मुंदरः—अहाहा ! काय पण अक्कल ! दिवे ओंवाळा दिवे अक्कलेवरून.

सुंदर०:—मग भागलं ! दिवाळींत नरकचतुर्दशीच्या पहांटे माझ्यावरून प्रेमानें दिवे ओवाळतेस तेवढेच पुरेत! प्रेमांत असतांना सुद्धा त्या दिव्यानं जर मला भाजायची वेळ आणतेस तर मांझी खोड मोडण्याकरतां, माझ्या अक्कलेवरून दिवे ओंवाळतांना मला जाळूनच टाकशील.!

मुंदरः—तुह्माला काय ह्मणाव हा.

सुंदर०:—तुइय' अगदीं उलट ? ह्मणजे बायकोच्या उलट पुरुष.

मुंदरः—बस्स हा चावटपणा पुरे झाला.

सुंदर०:—बंद ! आतां अधिक बोलेन तर मार खाईन.

मुंदरः—कायग कामिनी माझ्या घरांत मी नसतांना तूं कां आलीस?

सुंदर०:—( कामिनीस बाजूला )-तूं आहेस कीं नाहींस हें बघायला ह्मणून सांग—

कामिनीः—घर आहे सुंदरलालचं.

मुंदरः—ठेवलंय त्यांच्या काकाचं.

सुंदर०:—हो-तुझंही नाहीं-माझंही नाहीं आणि तिचं तर नाहींच नाहीं ! ज्याचं घर तो गेला स्वर्गांत; तूं खुशाल या घरांत ये ग.

कामिनीः—मी यांना भेटायला आले होतें-समजलीस ?

सुंदर०:—आणि मी परवानगी दिली होती-कळलं ?

मुंदरः—तुमची परवानगी गेली चुलींत ! बाईसाहेबांना सांगूनच हिची चांगली खोड मोडते; पण या घरगुती भानगडांत बाईसाहेब पाहिजेतच कशाला मुळीं ! माझे हात कुठं केळी खायला नाहीं गेले.

[ कामिनीस मारायला धांवते सुंदरलाळ मधें उभा राहतो. ]

सुंदर०:—अर्रर्र-धांवा-खून-खून.

कामिनीः—अहो हें काय सुंदरलाल-ही कैदाशीण तुमचा सुद्धां चावा घेईल बरं.

सुंदर०:—धांवा-धांवा-खून-खून.

मुंदरः—काय उगीच ओरडत सुटलायत ? खरंच खून झाला कीं काय ह्मणून सारा गांव गोळा होईल अशा ओरडण्यांनं.

सुंदर०:—आमचा जीव गोळा होतांना आह्मी ओरडलों आणि सारा गांव गोळा झाला तर त्याला आह्मी काय करणार ?

कामिनीः—कशाला तिच्या तोंडीं लागता ?

सुंदर०:—तुझं तोंड शाबूत राखण्याकरता.

कामिनीः—( स्वगत ) अहाहा ! काय हें यांचं प्रेम ! रूप नाहीं पण अगदीं देवरूप आहेत हो.

मुंदरः—काय ग कामिनी, यांच्यावर तुझं प्रेम असलं तरी तुझं अजून लग्न व्हायचं आहे ना ? मग ? कुवार असतांना पुरुषाशीं अशा चोरून गप्पा मारायला तुला शरम नाहीं वाटत ?

कामिनीः—पण उघडपणें गप्पा मारल्या तर तुझ्या पोटांत पोटशूळ उठतो ना ?

मुंदरः—माझ्या धाकामुळेंच ही सवत वाळत चालली तर !—काय हो ?

सुंदरः—हो–तिचा आणि माझा गांधर्व–विवाह सुद्धां लागला

कामिनीः—डोंबल माझं.

मुंदरः—काय ?( स्वगत )–देवाचा देव आला तरी सुद्धां ही माझी सवत झाल्याशिवाय राहणार नाही ! मग मी तरी जिवाचा एवढा तडफडाट कशाला करून घेऊं ? पण–नाहीं–असं नाहीं मी चालूं द्यायची ! कांहीं अटीवरच मी हें प्रेम बोकाळूं देईन ( उघड )–गांधर्व–विवाह काय ?

सुंदरः—हो–हो गांधर्व–विवाह ! देव–प्रणीत गांधर्व–विवाह !

कामिनीः—अहो–काय बरळताय तुह्मीं हें ! तुह्माला वेड का लागलं ? अहो शपथेची कांहीं आठवण ?

सुंदरः—घसरलों वाटतं !

कामिनीः—अहो वाटतं कसल ? सपशेल घसरलांत ! किती हो भोळे तुह्मी ! याच भोळेपणामुळें मी तुमची झालें !

मुंदरः—काय हो, माझ्या असा गळा का पायचा होता तर माझ्याशीं लग्न तरी कशाला केलंत ?

सुंदरः—पण मला काय माहीत माझं सणंग इतकं जाड भरडं आणि डोई जड निघेल ह्मणून !

सुंदरः—आधीं घेतलीत कशाला डोकीवर—

सुंदर०:—हा शहाणपणा त्या देवाच्या देवानं—त्या महादेवानं जर आम्हांला शिकवला नसतां तर ही घोडचूक मी खात्रीनं केली नसती ! शंकरानं मस्तका-वर घेतली गंगा पण माझ्या डोक्यांत पडली ही बिजली ! देवा, तुझ्या घरचा रंगारी मलाच तेवढा सफेता द्यायचा कसारे विसरला ! अग कामिनी, तूं एखादी साहेबीण कां झाली नाहींस ?

कामिनीः—अहो पण इतकं होण्यापेक्षां झालेलीं लग्नंच मोडतां आलीं असतीं तर कितीं हो छान झालं असतं ? तरीपण हिला दिलेली शपथ आपल्याला नडलीच असती.

सुंदर०:—सुंदर मुंदर.

कामिनीः— [ स्वगत ] काय ? मुंदर सुंदर ! अगबाई. ह्मणजे हे आतां तिच्यावर प्रेम करायाला लागले कीं काय ? आतां माझं कसं होणार ? [ प्रकाश ] अहो सुंदरलाल, तिला सुंदर काय ह्मणता ?

सुंदर०:—भलं रुदितेन ! अलं रुदितेन ! सुंदर मुंदर या अपराध्यांना एकदां क्षमा कर !

मुंदरः—तुह्मी शपथ मोडलीत असं कबूल करा !

कामिनीः—कबूल, पण तूं आम्हांला क्षमा कर ! वाटल्यास मीं नेहमीं तुझ्याजवळ राहीन; तुझ्या पश्चात् यांच्याशीं बोलणार सुद्धां नाहीं. पण यांना त्रास देऊं नकोस.

सुंदर०:—[ बाजूस ] तूं बोलली नाहींस तर मीच तुझ्याशीं सारखा बोलत राहीन ! त्यांत काय आहे ! ( उघड ) मग माफी—

मुंदरः—विचार करून सांगते.

सुंदर०:—कामिनी, तोंपर्यंत अनुकूल निकाला करतां देवीचं ध्यान करूं !

मुंदरः—अहो ध्यान ! एका अटीवर माफीच नाहीं पण तुह्मां दोघांना मोकळे पणानं वागूं सुद्धां देईन !

सुंदर०:—वाहवा ? कामिनी, पुढं ये; देवी प्रसन्न होऊन आशिर्वाद ओरडण्याच्या बेतांत—

सुंदर:—हां बडबड—

सुंदर•:—बंद एकदम बंद ! कोणती अट.

सुंदर:—मी सांगेन त्याप्रमाणं ऐकायचं.

सुंदर•:—यांत कोणत्या गोष्टींचा समावेश होतो ?

सुंदर:—नथेखान पुन्हां केव्हां लढाई सुरू करील याचा नियम नाहीं; ह्मणून प्रत्येकाला स्वसंरक्षणाकरितां तरी लढतां यावं कशी बाईसाहेबांची इच्छा आहे. ह्मणून तुह्मीं दोघांनी माझ्या पासून तें शिक्षण घेतलं पाहिजे !

कामिनीः—लढाई अगबाई ! नुसता कांदा कापतांना सुद्धां माझे डोळे पाण्यानं भरून येतात, मग माणसं मारतांना माझं कसं होणार ? मी ही अट.

सुंदर•:—बेशक कबूल कर [ सुंदराकडे पाहून ] कबूल ! त्यांत काय आहे ? लढाई शिकायला कशाला पाहिजे ? या क्षणीं पाहिजे तर लढून दाखवितों ?

सुंदर:—असे बायकोच्या नथींतून तीर मारणारे वीर दमडीला दहा हजार मिळतात.

सुंदर•:—अगदीं बोल बोलूं देईना ? अग-पण त्यांत सुद्धां शिताफी पाहिजे नाहीं तर नथीतन तीर मारतां मारतां नथीसह नाकच मारलं जायचं ! कामिनी, अट कबूल कर—

सुंदर:—नुसतं कबूल करून नाहीं चालायचं ! शपथ दिली पाहिजे.

कामिनीः—शपथ ! कसंहो करूं सुंदरलाल ? मला देवाचं भय वाटतं !

सुंदर•:—अग देव काय भुतं आहेत ? पुण्याप्रमाणं पापाचाही पाठिराखा देवच आहे. तसं जर नसतं तर पाप हा शब्दच मुळी ऐकूं आला नसता ! अग " आलीया भोगासी असावें सादर ॥ देवावरी भार घालुनियां ॥ या अभंगाची तरी हिच मखली आहे ! शपथ घेऊन सारा भार देवावर टाक ह्मणजे शपथ मोडल्याचं पाप सुद्धां त्याच्याकडंच जाईल ! आतां काय, बाईसाहेब मूर्तीमंत रणदेवता, ही त्यांची लाडकी बिजली, आणि तूं बडी लढवयी होणार ! अशा रीतीनं बायकांची एक फळटणच तयार करून प्रमिलेचं राज्य इथं सरू होऊं

यात ह्मणजे झालं ! या जनानी वीरांना जिंकायला या काळांत अर्जुन खूप आहेत ! कर अट कबूल !

कामिनीः—बरं कबूल !

सुंदरः—चला तर देवीच्या देवळांत—

[ जातात ] —पडदा उघडतो.

---

## लहरी तिसरी

[ स्थलः—झांशीं लक्ष्मीचा महाल कृष्णवस्त्रांकित रावसाहेब प्रवेश करितो. ]

रावसाहेबः—या आर्यावर्ताची बाहेर निघालेली स्वातंत्र्य—लक्ष्मी परत फिरवण्याचा आशा किरण या हृदयांत बाळगून-त्या किरणाच्या प्रतिस्पर्ध्याच्या, या अंधकाराच्या आश्रयानं या चालत्याबोलत्या लक्ष्मीच्या मंदिरापर्यंत तर आलों ! लक्ष्मी, इंग्रजांनीं तुझ्या विरूद्ध तरवार उपसली, तुला बंडखोर ठरवलं हें ऐकून तुझ्या हृदयाचे तुकडे उडाले असतील, पण माझ्या हृदयांत आनंदाच्या तुफान लाटा उसळत आहे ! कारण स्त्रियांचीं मनं स्त्रियानांच वळवतां येतात या न्यायानें जर या आर्यावर्ताच्या रसून जाणाऱ्या भाग्यलक्ष्मीचा तूं हात धरलास तर लक्ष्मी ती भाग्यलक्ष्मी, या हिंदुस्थानची स्वातंत्र्य देवता खात्रीनें मागें फिरेल ! पण ही पहा लक्ष्मीच आली,--ही अशी भांबवल्या सारखी का ? मोरोपंताच्या महाला-जवळ मी दबून बसलों असतांना त्यांनीं रामचंद्रराव देशमुखाजवळ वाचुन दाखव-लेला, रोजसाहेबाचा खलिता तर ही वाचत नाहीं ना ? आडूनच पहावें काय आहे तें—( जातो. )

लक्ष्मीः—( स्वप्नांत )-कोण ? कोण तूं म्हणालीस ? या झांशीची रक्षणकर्ती देवता ? मग मी काय करूं ? हें काय ? तुं मला बोलावतेस कां ? मला बोलावून काय करणार ? अगबाई, तूं कुठं आणि मी कुठं ? काय म्हणालीस मी मनांत आणलं तर तुझ्या जवळ येईन. कशी—कशी बरं येईन ? मी एक

दीन अबला आहे ! मी मानवी कोटींतली आहे ! तुझ्या सारखी देवता कुठं आहे ! अशी हंसतेस काय गडे ? पहा-पहा-पुन्हां आपलं तेंच ! पण हें काय ? हे धुराचे लोटच्या लोट कुठून उठूं लागले ? आणि तूं हे काय करतेस ? हें तूंच झेलतेस काय ? तोफेचे गोळे !-अगबाई-लाल-लाल, मावळत्या सूर्यापेक्षांही भडक ! काय ह्मणालीस ? त्या गोळ्यांचा तुझ्यावर कांहींच परिणाम होत नाहीं ! कांहीं तरीच सांगतेस झालं ! पाहूं-पाहूं तुझे हात ! काळे ठिक्कर ना पडले ते ! काय ? माझ्यावरही तोच प्रसंग येणार आहे ? ह्मणजे तुझं तें रक्तवस्त्र माझ्या भावि संकटाची सूचना होय ? बाग बा—मी अशानं भिऊन जाईन असं कां तुला वाटतं ? अशी जवळ काय येतेस ?

**रावसाहेबः**— [ कृष्णवस्त्रांकित प्रवेशून. ]-अहाहा ! देवता-मूर्तिमंत पावित्र्य !

**लक्ष्मीः**—कोण ? कोण तें ?

**रावसाहेबः**—हिच्या स्वप्नाचाच फायदा घेतला पाहिजे ! ( प्रकाश )- लक्ष्मी—

**लक्ष्मीः**— [ बिचकून ]-काय मी पाहते ? आतां पर्यंत मी स्वप्नांत होते काय-कोण ?

**राव०ः**—ताई, बिचकूं नकोस ! माझ्या अज्ञात स्वरूपाला भिऊं नकोस ! ताई, पापी विचार या हृदयांत मुळींच नाहीं-एवढं आश्वासन तुला माझ्याशीं शांतपणानं बोलूं देईल ना ? ताई—

**लक्ष्मीः**—आधीं बुरखा दूर करा-आणि मग बोला—

**राव०ः**—बुरखा ! मनू हा बुरखा तुझ्या आज्ञेनं मी याक्षणीं दूर करतों पण या आर्यावर्ताच्या तोंडावर पडत चाललेला गुलामगिरीचा बुरखा-कोण-केव्हां दूर करणार ?-ताई, नको-अशी मागं सरूं नकोस !-हा पहा-हा काळा पडदा या रावसाहेबाच्या तोंडावरून दूर झाला-[ तोंडावरचा पडदा दूर करतो. ]

**लक्ष्मीः**—कोण ?-श्रीमंत ?

**राव०ः**—नाहीं;-हा रावसाहेब श्रीमंत नाहीं-या झांशीच्या लक्ष्मीचा भाऊ-ताई, तुझ्याजवळ एका आश्वासनाची याचना करणारा एक कंगाल आहे—

लक्ष्मीः—बोला, श्रीमंत, ही लक्ष्मी–आपल्या शीलाला धक्का न लागूं देणार–कोणतंही आश्वासन आपणांस द्यायला तयार आहे ! दादा, ही तुझी ताई, तुझी कोणतीहि पवित्र आज्ञा मान्य करायला तयार आहे–

राव:०—पवित्र, मंगल!–मनूताई, माझी विनंती इतकी पवित्र आहे कीं तिच्यामुळं तुझ्या शीलाला डाग न लागतां उलट त्याचं तेज अधीकच खुलून दिसेल ! दे–वचन–दे;–या रावसाहेबाला देशोद्धाराचं वचन दे ! तुझ्या शीलाला या पासून कमीपणा नाहीं ! तुझ्या वंशाला या पासून बट्टा नाहीं ! ताई, तुझ्या देशाचा यापासून भाग्योदय आहे.

लक्ष्मीः—हें घ्या वचन !–माझ्या शीलाला न दुखवतां मी आपल्याला मदत करायला तयार आहे–[ वचन देते. ]

राव०ः—तर मग–मनू–सांग,–निरपराध्यांना कुत्र्याप्रमाणं यमाच्या दरवारांत धाडणाऱ्यांच्या विरुद्ध तूं लढायला तयार आहेस काय ? –स्वतःच्या माना करतां, स्वतःच्या वैभवाकरतां–दुसऱ्याच्या वैभवावर जळते निखारे ठेऊन, त्यांच्या वैभवाची रक्षा करणाऱ्या सत्तेशीं झुंजायला तूं तयार आहेस काय ? तुझ्या मातृभूमीची गुलामगिरी टाळण्या करितां–ताई–तुझी तरवार म्यानाबाहेर उसळेल का ?–बोल–ताई बोल–माझ्या प्रश्नाचीं उत्तरं दे–

लक्ष्मीः—हां–रावसाहेब, समजला आपला हेतू ! ही झांशीची गादी पेशव्यांच्या कडून जरी आह्माकडं आली असली तरी पण ती इंग्रजांशीं विनाकारण कधींहि बेइमान होणार नाहीं ! लक्ष्मी आपलं वचन पाळायला ज्याप्रमाणं स्वतःचं प्राणार्पण करायला तयार आहे–त्याचप्रमाणं आपल्या राजनिष्ठेकरतां—

रावसाहेबः—राजनिष्ठा ! राजनिष्ठा !–मनू. कोठपर्यंत तूं राजनिष्ठ राहणार ? तुझ्या राजनिष्ठेच्या देवतेला, दिवसाढवळ्या चव्हाट्यावर आणून वाटेल तशी तिची विटंबना केली–तुला बंडखोर ठरवलं—

लक्ष्मीः—काय ? बंडखोर—?

राव:—हो; बंडखोर–झांशीची लक्ष्मी बंडखोर ! मनूताई–तुझी, दिव्य राजनिष्ठा इंग्रजांच्या न्यायी दरबारांत बंडखोर ठरली–तरी सुद्धां तुझ्यापुढं वस्तुस्थितीचा प्रकाश पडूं नये ना ? स्वराज्यावर पाणी सोडणारे साधु बाजीराव मेले–गेले;

त्यांच्या हाडांची राख सुद्धां आतां दिसणार नाहीं;—पण मनू—त्यांच्या नादान कृत्याकडं तुच्छतेनं पाहणारी हा नव्या उसळीचा—हिंदुस्थानं—तुह्माला अनुकूल काल आला असतांना सुद्धां तुह्मीं आपल्या प्रगतीचा मार्ग चोखाळला नाहींत, ह्मणून तुमच्या जिवंतपणीं तुमच्या तोंडावर थुंकेल.

**सुंदर**:—[ लखोटा घेऊन प्रवेश करते ]—बाईसाहेब,—मामासाहेबानीं हा खलिता आपल्याकडं आत्तां ने ह्मणून पाठवून दिला आहे. [ लखोटा देते ]

**राव०**—[ बाजूस ]—हाच तो राजेसाहेबाचा निर्वाणीचा खलिता !

**लक्ष्मी**:—( वाचून )—हें काय मी पाहते ?

**राव**:—हें काय ?—मनू—माझ्या ताई, तुझ्या राजनिष्ठेचा हा अपमान—तुझ्या राजनिष्ठेची विटंबना—

**लक्ष्मी**:—होय—रावसाहेब—आपलं भाषण खरं ठरलं.

**राव०**:—बोल,—ताई—अजून तरी आपलं वचन पाळायला तूं तयार आहेस कां?

**लक्ष्मी**:—नका—रावसाहेब—बोलूं नका ! या वेळेला माझी स्थिती फारच चमत्कारिक झाली आहे ! माझ्यांत उभं राहण्याचं सामर्थ्य नाहीं ! रावसाहेब, ही भूमी माझ्या पायाखालीं दुभंग होत असल्याचा मला भास होत आहे ! शेषाच्या मस्तकावर असलेला या जगाचा मनोरा डळमळूं लागला असं मला वाटतं ! थांबा,—रावसाहेब थांबा,—माझं डोकं थोडं शांत होऊं द्या—[कोचावर पडते]

**सुंदर**•—हा काय गोंधळ झाला ?

**राव०**:—हें पहा—तुझ्या बाईसाहेबांना थोडी झोप घेऊं दे.

**लक्ष्मी**:—झोप—? रावसाहेब—आतां कसली झोप? जा—रावसाहेब—बाबांच्या कडं जा—अजून मनाचा एक निश्चय होत नाहीं ! उद्यां पर्यंत थांबा; उद्याच्या दरबारा नंतर या लक्ष्मीचं आपणांस शेवटचं उत्तर मिळेल—[ स्तब्ध पडते. ]

**रावसाहेब**:—परमेश्वरा, या दुबळ्या हिंदूची तुला करुणा येऊं दे—

[ जातो. ]

पडदा पडतो.

---

# लहरी चौथी.

( स्थळः—झांशी—मोरोपन्ताचा दिवाणखाना. मोरोपन्त प्रवेशतात. )

**मोरोपन्तः**—या हृदयांत चाललेला कोलाहल कांहीं केल्या शांत होत नाहीं! सत्यासत्यामधला भेद न जाणणारी न्यायदेवता, खरी न्याय देवता ह्मणूं कीं त्या न्यायदेवतेची विटंबना करायला बसविलेलं एक सोंग ह्मणूं?—या न्यायदेवतेची—असल्या भिकार भुताची आजपर्यंन्त बांधलेली पूजा, लाथेच्या एकाच ठोकरीनं उधळून देऊं कीं तिच्यापुढं हात जोडूं?—राजनिष्ठे—राजद्रोही ठरलेल्या भ्रष्ट राजनिष्ठे—काय केलंस हें?—तुझ्या पायीं या झांशीनं, आपल्या स्वामीचं—या इंग्रजांचं रक्षण करतां करतां—आपल्या देशबंधूंच्या माना कापल्या;—स्वाभिमानावर लाथ मारली!! आमच्या निष्पाप स्वधर्मियांचे आह्मीं खून पाडले!!! अरेरे, हे स्वदेशियांच्या रक्तानं रंगलेले हात—पापी मोरोपन्ता, तूं आतां कशानं धुऊन काढणार? खुनाच्या सुकून गेलेल्या रक्तानं काळं ठिक्कर पडल्यामुळं, पुन्हां पवित्र होण्याकरतां तुझ्या डोळ्यासमोर धडपडत असणारं हें झांशीचं यश—तूं आतां—कसं शुद्ध करणार? या तेजावरणांत तरळणाऱ्या रजारजांतून माझ्याकडं रोखलेले मृतांचे फिरून गेलेले डोळे मी कसे चुकवूं? आमच्या राजनिष्ठेला बळी पडलेले त्यांची माझ्या भोंवती नाचणारीं हीं रक्तबंबाळ कबंधं मी कशी शांत करूं? खून—खून! या राक्षसी राजनिष्ठेनं सगळीकडं पाडलेले माझ्या देशबन्धूंचे खून मी पाहूं तरी किती? मंनू मनू आज तुझी काय स्थिती झाली असेल?—तुझ्या हृदयपुष्पाचा आज चुराडा उडाला असेल!—परमेश्वरा, कठोरहृदयी देवा! काय हे तुझे खेळ! एकाद्या उद्यानांत, वालुकामय मार्गावर बसून, त्याच वाळूच्या कणांशीं खेळतां खेळतां—शेजारीं फुललेल्या एकाद्या सुकुमार फुलाचा चोळामोळा करणाऱ्या बालिश हृदयांत आणि तुझ्या लीलामय अन्तःकरणांत काय अन्तर? भावि परिस्थितीशीं झगड्यांत कोणत्या शक्तिचा धावा करूं?—अस्मानांतून हरदम तुटून पडणाऱ्या स्वतंत्र तेजपुंजानो—या स्वतंत्र होणाऱ्या झांशींतील जिवांच्या डोळ्यांत शिरून, त्यांचं तेज इतकं वाढवा कीं मूर्तिमन्त स्वातंत्र्य त्यांतून प्रकट होईल!!! ( सेवक प्रवेशतो )

**सेवक**—एलिस साहेब आपल्या भेटीस आले आहेत.

**मोरोपंतः**—एलिस साहेब? कां बरं आले?—जा—त्यांना पाठवून दे—[ सेवक जातो. ]

**एलिसः**—[ प्रवेशून ]—नमस्कार—मोरोपंत—; मला कांहीं खाजगी बोलायचं ह्याय!

**मोरोपंतः**—खुशाल बोला.

**एलिसः**—नथेखानशीं आपल्या झालेल्या लडाईचा आमचे गव्हर्नर जनरल शायबाचे मनावर बलटाच परिनाम होऊन—

**मोरोपंतः**—असं ह्मणण्यापेक्षां—नथेखाननं तुमची तुमडी भरून तुमचे कान फुंकल्यामुळं ह्मणानात–

**एलिसः**—कशानंका होयना—पण टेनी टूमच्यावर शेनापटी सर ह्यू रोज़ येना पाटाविलं ह्याय! टेवा टेंच्याकडून आज चौकशी केली! जाईल टर शामोचारानं उट्टर—

**मोरोपंतः**—सामोपचार! सामोपचार–साहेब! आतां कसला सामोपचार? आमच्या आजपर्यंतच्या राजनिष्ठेचे असे धिंडवडे प्रतिक्षणाला निघत असतांना सुद्धां जर आह्मीं आतां सामोपचारानं वागलों, तर आमचे पूर्वज स्वर्गातून आमच्या तोंडावर थुंकतील! या झांशीच्या गादीवर येऊन गेलेल्या महाभागांचे आत्मे या वातावरणांतील अणुरेणूंत संचार करून, आमच्या नादान वर्तनाचा ते धिःकार करतील! आमच्या मातांचे स्वर्गांत चमकणारे आत्मे आमच्या या निसत्त्व भेकड कृत्याबद्दल, आपण होऊन संतती–हीनांच्या नरकांत उड्या घेतील! साहेब, सांगा सामोपचार अजून करतां येणं शक्य आहे काय? तुह्मी जर आमच्या जागीं असतात तर काय केलं असतंत? तुह्मीं शांत राहिला असतात काय?

**एलिसः**—खाट्रीनं नशटों! पण मोरोपंट जरा बेटानं घेटलं, टर अजून डोनी बी बाजू कडाचित शांट होटील! रोज आपनांशीं बहुटेक सामोपचारानंच वागटील! टूमच्या स्थिटीबद्दल मला फार वाईट वाटतो.

**मोरोपंत**—हे कुणाचे शब्द! इंग्रजाचे–एका इंग्रजाचे! आहाहा–साहेब गंगाधररावांनीं आपल्याला "महात्मा" ह्मटलं तें अगदी योग्यच ह्मटलं! साहेब

इंग्रजांचीं अंतःकरणं जर तुमच्यासारखीं असतीं, तर आज हिंदु आणि इंग्रज बंधु-भावानं नसते का वागले ?

**एलिसः**—वागलेही अशटे-पन टशं होनं शक्य नाय! मोरोपंट, टूमच्या-धर्माच्या आड यऊं नाय आशं मला किटी ठरी वाटतो-पन करनार काय ? झांशी यापुढं राजनिष्ठ राहावी आशि माजि फॉर इच्छा हाय !

**मोरोपन्त**—ती ठेवणं किंवा न ठेवणं आपल्या हातीं आहे-

**एलिसः**—यावेळीं रानीशापाचं मन आपनंच शावरलं पायजे-

**मोरोपन्त**—ज्याचं स्वतःचंच मन भडकून गेलं आहे तो दुसऱ्याचं मन कसं सांवरणार ? साहेब, लक्ष्मीचं मन सांवरून सांवरण्यासारखं नाहीं ! रोज झांशीवर चालून आले हें ऐकल्यापासून तिचं मस्तक फिरून गेलं आहे !

**एलिस**—काय होणार कोन जानं ?

**मोरोपन्त**—होणार काय ? आमच्या प्रश्नाचा योग्य तो निकाल लागला नाहीं, आमच्या राजनिष्ठेचा योग्य तो मोबदला जर आह्माला मिळाला नाहीं तर परिणाम ठरलेलाच आहे ! लक्षांत ठेवा, साहेब, आह्मी हिंदु स्वामीकरतां प्राण देऊं पण स्वामीकडून अपमान करून घेणार नाहीं ? कालचक्राच्या गिरकी बरोबर भिरकाऊन दिलेल्या प्राण्यांच्या दुर्दैवानें, त्यांच्या सेव्या-स्थिती ऐवजीं त्यांना सेवक बनावं लागतं; पण त्यामुळें त्यांची मानसिक योग्यता, हृदयांत संचारणाऱ्या दैवि शक्ति कधींच लुप्त होत नाहींत ! जित झाले म्हणून कांहीं मेल्ले नसतात !-जे-त्यांना तेवढीं अंतःकरणं आणि जितांना अंतःकरणंच नाहींत का ? बोला-जितांना मान नाहीं कां ? साहेब, तुमच्याकरतां-स्वतःचे जीव देणाऱ्या जितांना मान नाहीं का ?-

**एलिसः**—अशं कशं होईल ? मोरोपंट, टूमच्या शारख्या इचारी मानसांचं शुद्धां डोक्शं जर फिरून गेला टर मग ह्या रानशाप, नानाशापालाच डोश काय म्हनून डेवा ? खरंच-झांशीच्या बाबटींत अन्याय झाला हाय—

**मोरोपंतः**—ओरछाच्या राजाला दत्तकाचा हक्क तहनाम्यांत नसतानं त्याच्या पश्चात तें संस्थान कायम राहतं ! दत्तकाची परवानगी त्या संस्थानला देण्यांत येते; पण झांशीच्या तहनाम्यांत, दत्तक घेण्याचा अधिकार स्पष्टपणें दिसत असतांना सुद्धां झांशी खालसा होते ! हा न्याय कां ? आमच्या देखत

झांशींत कसायीखाना उघडून आमच्या धर्माची विटंबना करण्यांत येते ! हें कृत्य न्यायाचं आहे कां ! अशा अन्यायाचा प्रतिकार तडफदार रक्ताकडून कोणत्या रीतिनं होणार !

एलिसः—पन मोरोपंट माझी आपनांस एक रिक्वेस्ट हाय ! आपन होइल टिटकं करुन रानीशापाचं मन आंवरुन दरा ! आमच्या डरबारांत राजेशापांच्या प्रटिनिडीला होटील टिटकीं शांट उट्टरं—

मोरोपन्तः—त्या प्रतिनिधींकडून अपमानकारक असं एक जरी वर्तन घडलं तरी सुद्धां लक्ष्मींची तरवार आज बाहेर पडेल—

एलिसः—पन माझी आपनांस ही रिक्वेस्ट हाय ना !

मोरोपन्तः—साहेब, आपल्याकरतां मी हें कबूल करतों ! पण जर दरबारांत आमचा अपमान झाला तर पुढच्या परिणामाला मी मुळींच जबाबदार नाहीं ! आमच्याकडून प्रथम कांहींच होणार नाहीं !–एवढं मी आपणांस वचन देतों ! साहेब, आपल्या आजपर्यंतच्या प्रेमळ वर्तनाकडं दृष्टी गेली कीं हृदय कसं भरुन येतं–आणि पुढच्या भयंकर मार्गांत पाऊल टाकतांना आपली तेजस्वी मूर्ति डोळ्यापुढं सारखी उभी राहते ! पण काय करूं ?– नाइलाज होतो–

[ जातो. ]

एलीसः—नाइलाज! नाइलाज! आ मालकम्, मालकम्, सी दी ॲक्च्युअल इफेक्ट ऑफ युवर पॉलीसी! यू ब्राट्ट दी पेशवाज रूल टू ॲन एन्ड ॲन्ड इन् दी सेम वे, यू प्लेड ॲन् इम्पॉर्टन्ट पार्ट इन् दी ॲनेक्सेशन ऑफ झांशी! पावरफुल ब्रिटानिया इफ दाऊ वील्ट नॉट-चेन्ज दाय प्रेझेंट पॉलिसी बी शुअर दॅट इट वील रूईन दाय कॉज!

—जातो—

—पडदा उघडतो—

———

ठाणे

# लहरी पांचवी

[ स्थळ- झांशी-लक्ष्मीचा दरबार, सरदार वगैरे आहेत असा प्रवेश. ]

**रामचन्द्रराव**—बोला, सरदारहो-आजच्या मंगल दिवशीं, राष्ट्रदेवीच्या नांवाचा इतक्या उच्च स्वरांत जयजयकार करा कीं सप्तपाताळांत दडून बसलेले आपले शत्रू, आपल्या आनन्दगर्जनेनं खडबडून जागे होतील !-बोला-महाराणी लक्ष्मीचा जयजयकार असो !

**सर्व**:—महाराणी लक्ष्मीचा जयजयकार असो !—

( हेस्टी आणि एलिस प्रवेशतात. )

**हेस्टी**:—( रागानें ) लछीमीबाईका जयजयकार! आमच्या राज्यांत आमच्या जयजयकाराविगर डूसऱ्या कुनाचाबी जयजयकार करन्याची सक्त मनाई हाय ! बण्डखोर-चोर-लुटारू-राजद्रोही ! टूमाला मी इंग्रजांचा प्रतिनिधी या जोरावर असें फर्मावटे कीं टूमी आट्टाच्या आट्टा-याच ठिकानीं लछिमीबाईचा जयजयकार केल्याबद्दल माफी मागून " खुल्क खुदाका, मुल्क पादशहाका, अम्मल अंग्रेज-सरकारका " अशा जयजयकार केला पायजे !-बोलो-अंग्रेजसरकारका जयजयकार—

**एलिस**:—नो मि हेस्टी, इटइज अगेन्स्ट देअर यूज्वल प्रॅक्टिस् !

**हेस्टी**:—टूमी बी टेंची टरफडारी करटे ? मी आज, जनरलच्या जोरावर अशं फर्मावीत आहे !-" बोलो-" खुल्क खुदाका, मुल्क पादशहाका, अम्मल अंग्रेजसरकारका—"—

**रामचन्द्रराव**—परकीयवकील या नात्यानं आपण आपल्या जागेवर प्रथम बसा—आणि महाराणीसाहेब येतांच त्यांच्याजवळ काय बोलायचं असेल तें बोला करा-महाराणी लक्ष्मीचा जयजयकार करा-

**सर्व**:—महाराणी लक्ष्मीचा जयजयकार असो—

**हेस्टी**:—नाहीं-नाहीं-अंग्रेजसरकारका जयजयकार—

( लक्ष्मी महाराणीच्या पोषाखांत, मोरोपन्त, सुन्दरसह, प्रवेशते, सर्वजण खडी ताजीम देतात. हेस्टी खालीं बसतो. )

# लहरी पांचवी

[ स्थळ- झांशी-लक्ष्मीचा दरबार, सरदार वगैरे आहेत असा प्रवेश. ]

**रामचन्द्रराव**—बोला, सरदारहो-आजच्या मंगल दिवशीं, राष्ट्रदेवीच्या नांवाचा इतक्या उच्च स्वरांत जयजयकार करा कीं सप्तपाताळांत दडून बसलेले आपले शत्रू, आपल्या आनन्दगर्जनेनं खडबडून जागे होतील !-बोला-महाराणी लक्ष्मीचा जयजयकार असो !

**सर्व**:—महाराणी लक्ष्मीचा जयजयकार असो !—

( हेस्टी आणि एलिस प्रवेशतात. )

**हेस्टी**:—( रागानें ) लछीमीबाईका जयजयकार! आमच्या राज्यांत आमच्या जयजयकाराविगर दूसऱ्या कुनाचाबी जयजयकार करन्याची सक्त मनाई हाय ! बण्डखोर-चोर-लुटारू-राजद्रोही ! टूमाला मी इंग्रजांचा प्रतिनिधी या जोरावर असें फर्मावटे कीं टूमी आट्टाच्या आट्टा-याच ठिकानीं लछिमीबाईचा जयजयकार केल्याबद्दल माफी मागून " खुल्क खुदाका, मुल्क पादशहाका, अम्मल अंग्रेज-सरकारका " अशा जयजयकार केला पायजे !-बोलो-अंग्रेजसरकारका जयजयकार—

**एलिस**:—नो मि हेस्टी, इटइज अगेन्स्ट देअर यूज्वल प्रॅक्टिस् !

**हेस्टी**:—टूमी बी टेंची टरफडारी करटे ? मी आज, जनरलच्या जोरावर अशं फर्मावीत आहे !-" बोलो-" खुल्क खुदाका, मुल्क पादशहाका, अम्मल अंग्रेजसरकारका—"—

**रामचन्द्रराव**—परकीवकील या नात्यानं आपण आपल्या जागेवर प्रथम बसा—आणि महाराणीसाहेब येतां त्यांच्याजवळ काय बोलायचं असेल तें बोला करा-महाराणी लक्ष्मीचा जयजयकार करा-

**सर्व**:—महाराणी लक्ष्मीचा जयजयकार असो—

**हेस्टी**:—नाहीं-नाहीं-अंग्रेजसरकारका जयजयकार—

( लक्ष्मी महाराणीच्या पोषाखांत, मोरोपन्त, सुन्दरसह प्रवेशते, सर्वजण खडी ताजीम देतात. हेस्टी खालीं बसतो. )

**लक्ष्मी**—खबरदार त्यांचा जयजयकार कराल तर ! या झांशींत–या शिवराय मामंजीच्या झांशींत–या लक्ष्मीच्या झांशींत, या लक्ष्मीचाच जयजयकार झाला पाहिजे !

**सर्व**—महाराणी लक्ष्मीचा जयजयकार असो—( लक्ष्मी गादीवर बसते. )

**हेस्टी**—अपमान ! अपमान–

**लक्ष्मी**—अपमान–अपमान ह्मणून टाहो फोडणारांनीं, दुसऱ्याच्या–मानाप–मानाकडं विशेष लक्ष दिलं पाहिजे ! आपण इंग्रजांचे वकील, आपण त्यांच्या सेनानीचे मदतनीस,—त्यांच्या दरबारांतून वावरलेले; आपल्याला दरबारी शिस्त माहीत असायला पाहिजे होती ! दरबारी जयजयकारावर हुकमत चालविण्याचा तुह्माला काय अधिकार ? शिवाय दरबारच्या बराबर तुह्मी या लक्ष्मीला खडी ताजीम द्यायला पाहिजे होती–

**हेस्टी**—कोन टूमी ! टूमी आमचे–प्रटिनिढी–

**लक्ष्मी**—ह्मणजे तुमच्या मध्यवर्ती सत्तेच्या ठिकाणी होते ! तुह्मी माझा प्रत्यक्ष उपमर्द करून आपल्या सम्राज्ञीचा अप्रत्यक्ष रीतिनं अपमान केला आहे !

**हेस्टी**—आमी टूमाला महारानी शमजटच नाय ! टूमी एक बंडखोर–

**लक्ष्मी**—होय, अन्यायाविरुद्ध हें बण्डच आहे ! बोला–काय तुमच्या सेनापतींचं ह्मणणं आहे !—

**हेस्टी**—टूमी मोरोपंटाशह, टूमचे प्रमूख आठ शरडार घेऊन–निशस्त्र आमच्या जनरलशापाना भेटलं पाहिजे !

**मोरोपन्त**—काय ! निशस्त्र येऊन भेटलं पाहिजे !

**हेस्टी**—हो हो–भेटलंच पायजे–नाय टर–

**मोरोपन्त**—नाहींतर ! नाहींतर काय होणार ? नाहींतर कोणते भयंकर प्रसंग या झांशीला भोगावे लागणार ? धमकी देऊन जरब बसविण्याचे दिवस आतां गेले हें पूर्ण समजून रहा ! आजच्या झांशीचं तेज पूर्वीच्या झांशीच्या तेजाहून फार निराळं आहे! आजच्या झांशीच्या प्रत्यक जिवंत प्राण्यांत स्वाभिमानाची—देशाभिमानाची ज्योत सारखी धगधगत असलेली तुह्मांला दिसेल समजलात ? नाहीं तर काय होणार ?

**हेस्टी:**—नाय टर रणांगनावर आमच्याशीं झुंजायला टयार व्हा.

**लक्ष्मी:**—झुंजायला तयार व्हा! आज ही झांशी आपल्या आत्मतेजावर रणांगणांत तुमच्याशीं झुंजायलाही तयार आहे समजलात? तुमच्याकरतां ज्या झांशीनं तुमच्या शत्रूला, आपल्या प्रजेची मस्तकं तुडवीत तुमच्याकडे येऊं दिलं असतं त्याच झांशीच्या प्रजेची मस्तकं तुटून पडल्याशिवाय झांशींत तुमचा प्रवेश होणार नाही! लक्षांत ठेवा. साहेब, आजपर्यंत आमचे हिंदुस्थानचे पुरुषच तुमच्याशीं लढले असतील पण आज एक स्त्री आपल्या आत्मविश्वासावर तुमच्याशीं लढायला तयार होईल!

**हेस्टी:**—टूमच्या आट्मविश्वासाला जालून पोलून टाकन्याचं शामर्थ्य आमच्यांत हाय हें टूमीबी घ्येनांत ठेवा.

**एलिस्:**—रानीशाप.

**हेस्टी:**—रानीशाप! कोन रानीशाप? बंडखोर—

**लक्ष्मी:**—साहेब, आपण वकील या नात्यानं या ठिकाणीं आला आहांत हें विसरूं नका! वकीलीची मर्यादा सोडून जर आपला एकही शब्द यापुढं आला तर प्रसंग फार निराळा येईल! बोला साहेब.

**एलिस्:**—रानीशाप, आपण जरा शांट.

**लक्ष्मी:**—शांत! आतां शांत कशी राहूं! माझी झांशी अन्यायानं खालसा केली, त्यावेळीं माझ्या हक्काकडे दुर्लक्ष करून मी शांत राहिलें!, आपल्या समक्ष घेतलेला दत्तक नामंजूर करण्यांत आला, तरी मी शांत राहिलें! तुम्ही टाकलेल्या भाकरीच्या तुकड्यावर कुत्र्याप्रमाणं मी संतुष्ट झालें आणि उलट माझ्या देशबंधूवरच थुंकून तुमच्या बायका पोरांचं याच याच बंडांत रक्षण केलं! राजनिष्ठेचं मी कर्तव्य केलं! तुमच्या नरडीचा घोंट घ्यायला निघालेल्या नथेखानाचा गळा परस्पर दाबून आम्ही आमच्या राजनिष्ठेच्या मंदिरावर कळस चढविला! त्याचा मोबदला काय, तर झांशी बंडखोर! साहेब सांगा, मी शांत कशी राहूं? तुमच्या प्रत्येक कृत्यानं या लक्ष्मीच्या हृदयाच्या चिंध्या उडाल्या; कृतज्ञतेच्या ऐवजीं कृतघ्नता तिच्या वाट्याला देऊन, तिच्या सर्वांगाची तडफड उडवलीत तरी तिनं शांत रहावं काय? “लक्ष्मी या झांशीचं वैभव, पूर्वजांचं



**लक्ष्मी०**:—स्वतंत्र झालेल्या आत्म्यांना कैदखाना माहीत नसतो ! जा, अर्ध्या घटकेच्या आंत झांशीबाहेर चालते व्हा !

[ पृष्ठ ५० ]

हेस्टी:—नाय टर रनांगनावर आमच्याशीं झुंजायला टयार व्हा.

लक्ष्मी:—झुंजायला तयार व्हा! आज ही झांशी आपल्या आत्मतेजावर रणांगणांत तुमच्याशीं झुंजायलाही तयार आहे समजलात? तुमच्याकरतां ज्या झांशीनं तुमच्या शत्रूला, आपल्या प्रजेची मस्तकं तुडवीत तुमच्याकडे येऊ दिलं असतं त्याच झांशीच्या प्रजेची मस्तकं तुडून पडल्याशिवाय झांशींत तुमचा प्रवेश होणार नाही! लक्षांत ठेवा. साहेब, आजपर्यंत आमचे हिंदुस्थानचे पुरुषच तुमच्याशीं लढले असतील पण आज एक स्त्री आपल्या आत्मविश्वासावर तुमच्याशीं लढायला तयार होईल!

हेस्टी:—टूमच्या आट्मविश्वासाला जालून पोलून टाकन्याचं शामर्थ्य आमच्यांत हाय हें टूमीबी घ्येनांत ठेवा.

एलिस्:—रानीशाप.

हेस्टी:—रानीशाप! कोन रानीशाप? बंडखोर—

लक्ष्मी:—साहेब, आपण वकील या नात्यानं या ठिकाणीं आला आहांत हें विसरूं नका! वकीलीची मर्यादा सोडून जर आपला एकही शब्द यापुढं आला तर प्रसंग फार निराळा येईल! बोला साहेब.

एलिस्:—रानीशाप, आपण जरा शांट.

लक्ष्मी:—शांत! आतां शांत कशी राहूं! माझी झांशी अन्यायानं खालसा केली, त्यावेळीं माझ्या हक्काकडे दुर्लक्ष करून मी शांत राहिलें!, आपल्या समक्ष घेतलेला दत्तक नामंजूर करण्यांत आला, तरी मी शांत राहिलें! तुम्ही टाकलेल्या भाकरीच्या तुकड्यावर कुत्र्याप्रमाणं मी संतुष्ट झालें आणि उलट माझ्या देशबंधूवरच थुंकून तुमच्या बायका पोरांचं याच याच बंडांत रक्षण केलं! राजनिष्ठेचं मी कर्तव्य केलं! तुमच्या नरडीचा घोंट घ्यायला निघालेल्या नथेखानाचा गळा परस्पर दाबून आम्ही आमच्या राजनिष्ठेच्या मंदिरावर कळस चढविला! त्याचा मोबदला काय, तर झांशी बंडखोर! साहेब सांगा, मी शांत कशी राहूं? तुमच्या प्रत्येक कृत्यानं या लक्ष्मीच्या हृदयाच्या चिंध्या उडाल्या; कृतज्ञतेच्या ऐवजीं कृतघ्नता तिच्या वाट्याला देऊन, तिच्या सर्वांगाची तडफड उडवलीत तरी तिनं शांत रहावं काय? “ लक्ष्मी या झांशीचं वैभव, पूर्वजांचं



**लक्ष्मी०**:—स्वतंत्र झालेल्या आत्म्यांना कैदखाना माहीत नसतो! जा, अर्ध्या घटकेच्या आंत झांशीबाहेर चालते व्हा!

[ पृष्ठ ५० ]

स्वस्तिक वाचनालय,
नौपाडा - ठाणे

नांव, स्वतःचा धर्म, स्वतःचे हक्क पालन करण्याकरतां, जगांतील कोणत्याही असुरी सत्तेशीं झुंजायला तूं मागंपुढं पाहुं नकोस" ही माझ्या पतीची शेवटची आज्ञा कशी माझ्या कानांत सारखी घुमत आहे! नथेखानच्या तरवारीला बळी पडून, आमच्या राजनिष्ठेच्या मंदिरावर अभिमानानं लटकत असणारीं आमच्या रणगाजींचीं मस्तकं यावेळीं हंसून माझा उपहास करीत आहेत! सांगा, साहेब, मी कशी शांत राहूं?

**एलिस्:**—रनांगनावर आमच्या शैन्याशीं—

**मोरोपंतः**—साहेब, एकदां रणांगणांत पाऊल टाकल्यावर जयापजयाची काळजी कोण करतो? झांशीच्या ललाटीं पूर्ण सत्यानाशच लिहिला असेल, तर झांशीच्या साऱ्या प्रजेचीं मस्तकं समरभूमीवर पसरलीं जातील, पण त्या मृत-आत्म्याना स्वाभिमानाचं समाधान स्वर्गांत खात्रीनं मिळेल!

**हेस्टीः**—वश वश झालं हें राजड्रोही भाशनं! बोलों-ए बंडखोर टूझं उट्टर शांग.

**लक्ष्मीः**—जा, जा या लक्ष्मीचा, या बंडखोर लक्ष्मीचा तुझ्या सेनापतीला असा निरोप कळीव कीं झांशीतील एकही मनुष्य निशस्त्र स्थितींत तुमच्या भेटीस येणार नाहीं! उलट आल्या वाटेनं परत-

**हेस्टीः**—टशं शांगण्याचा अडिकार टूला नाय.

**लक्ष्मीः**—काय? या लक्ष्मीला हा अधिकार नाहीं? या झांशीच्या महाराणी लक्ष्मीला हा अधिकार नाहीं? पतिदेवा, पहा स्वर्गांतून एकदम निघुन आपल्या पत्नीचा भरदरबारांत, आपल्याच झांशींत होत असलेला हा अपमान पहायला प्रत्येक अणुरेणूंत संचार करा आणि आपला तेजस्वी करारीपणा या लक्ष्मीला द्या! मामंजी, आपला पुण्यात्मा या क्षणाला या ठिकाणीं प्रकट करून "शिवराव भाऊंची सून लक्ष्मी खरी" असा धन्यवाद साऱ्या जगाकडून घेण्याकरतां प्रलयकालचा कडकपणा माझ्यांत निर्माण करा! बोला साहेब, अजूनही या लक्ष्मीनं शांतच रहावं का?

**एलिसः**—रानीशाप आपल्या परिस्थितीचा विचार—

**लक्ष्मीः**—त्याच बरोबर तुम्हीही आपल्या परिस्थितीचा विचार नको का करायला? साहेब, ज्या हिंदु-मुसलमानांनीं एकमेकांशीं झुंजतां झुंजतां

आजपर्यंत आपल्या रक्ताच्या नद्या निर्माण करून, या हिंदी द्वीपकल्पा भोंवतीं पसरलेल्या सागराला शोणिताचा साज चढवला, तेच —तेच हिंदु मुसलमान आज एकमेकांकरतां आपल्या रक्ताचे खळाळ, वाटेल तेव्हां आणि वाटेल त्या ठिकाणीं आनंदानं सोडायला तयार आहेत !

**हेस्टी**:—बंड ! म्युटिनि ! बोलों उत्तर बोलों–

**लक्ष्मी**:—जा–तुमच्या सेनापतिला आमचं हें उत्तर कळवा ! [ तरवार उपसून हेस्टीपुढं फेकून देते ] झांशीचीं हाडंन हाडं चिंवून निधेपर्यंत तुमच्याशीं ती सामना द्यायला तयार आहे ! ! !

**हेस्टी**:—तूमी आमचे कैडी आहांत.

**लक्ष्मी**:—स्वतंत्र झालेल्या आत्म्यांना कैदखाना माहीत नसतो ! जा अर्ध्या घटकेच्या आंत झांशीबाहेर चालते व्हा नाहीं तर लष्करी नियमाप्रमाणं " शत्रू " म्हणून तुम्हांला कैद केलं जाईल ! जा–बाबा यांना सुखरूप नेऊन पोंचवा ! आणि झांशीकरांना शंकरकिल्यांत जाण्याचा हुकुम सोडा. [ जाऊं लागते. ]

**एलिस**—रानीशाप—

**लक्ष्मी**:—नाईलाज आहे साहेब–[ जाऊं लागते. ]

**हेस्टी**:—खबरडार पुढं जाल टर—

**लक्ष्मी**:—[ मागेंवळून ] काय करणार ? पुढं गेलें तर काय करणार ?

**हेस्टी**:—[ तरवार उपसून ] बंडखोर—

[ एलिस मध्यें येतो, लक्ष्मी हेस्टीवर पिस्तूल रोखते. ]

**मोरोपंत**:—हां खबरदार ! [ तरवारी रोखतात. ]

**रावसाहेब**:—[ प्रवेशून ]

**हेस्टी**:—माय गॉड !

[ पडदा पडतो. ]

**द्वितीय झंकार समाप्त.**

५४५
१०१८५

स्वस्तिक वाचनालय
पांचपाखाडी - ठाणे.

# झंकार तिसरा.

## लहरी पहिली.

[ स्थळः—झांशी. देवीचें देऊळ. देवीच्या मागें सुंदरलाल लपला आहे, देवीपुढें विड्याचें तबक, कामिनी प्रार्थना करीत आहे. ]

**कामिनीः**—देवी, या इंग्रजांशीं सुरू झालेल्या लढाईत माझी सवत ती मेली सुदर मारली जावो. प्रेमामुळें माझा जीव तडफडूं लागला आहे ! त्या भोळ्या सुंदरलालना त्या जखणीच्या जाचांतून तूं सोडविलंस तर तुला चांदीचे डोळे करून लावीन ! ( नमस्कार करते.. )

**सुंदर०ः**—[ देवी मागून ] हे प्रियतमें भक्तललामे, मी तुझी भक्ती पाहून तुझ्यावर प्रसन्न झालें आहें ! वरं ब्रूहि ! वरं ब्रूहि !

**कामिनीः**—[ घाबरून ] अगबाई, ही आकाशवाणी कीं भुताटकी ! पळून जायची सुद्धां शक्ति अंगामध्यें राहिली नाहीं ! आतां काय करूं ?

**सुंदर०ः**—( देवीमागून ) वत्से, न भेतव्यम् ? न भेतव्यम् ! पळूं नकोस किंवा घाबरूं नकोस ! ही आकाशवाणी किंवा भूताटकी नसून ही देववाणी आहे ! वरं ब्रूहि ! वरं ब्रूहि !

**कामिनीः**—अहाहा—मी किती भाग्यशाली ! लोक ह्मणतात कीं कलियुगांत मुळीं देवच नाहीं; पण मलातर दोनच क्षणांत देवी प्रसन्न होऊन माझ्याशीं बोलूं सुद्धां लागली !

**सुन्दर०ः**—[ पूर्वोक्त ] वत्से, लक्ष्मी सुंदरसारेख पाखंडी येण्याचा आतां संभव आहे तस्मात् लौकर वर माग.

**कामिनीः**—पण गडे देवी, खरंच का ते पाखंडी आहेत ?

**सुन्दर०ः**—( पूर्वोक्त ) अग हो, आणि ह्मणूनच ह्मणतें कीं लौकर वर माग आणि मला जाऊं दे !

कामिनीः—नको ग जाऊंस तूं ! तूं अशीच माझ्याशीं बोलत रहा म्हणजे त्या मेल्यांना माझी देवभक्ति कळून येईल !

सुन्दरः—( पूर्वोक्त स्वगत ) अग पण माझा देवपणा चव्हाट्यावर येईल त्याचा काय वाट ?- [प्रकाश] तसं मला करतां येत नाहीं ! तुझ्या भोळ्या स्वभावाची मला कींव येते.—बोल; काय पाहिजे ?

कामिनीः—सुंदरच्या त्रासानं ते मेले सुंदरलाल सारखे वाळत ग चाललेत माझं त्यांच्यावर प्रेम आहे !–

सुंदर०—[ पूर्वोक्त ]–समजला, तुझा हेतू समजला ! तुझी इच्छा लौकरच पूर्ण होईल ! पण सुंदरला जगांतून नाहींशी करण्या आधीं तुझं सुंदरलालवर किती प्रेम आहे याची परीक्षा घेतली पाहिजे !–तूं त्यांच्या करतां काय करशील ?

कामिनीः—वाटेल तें करायला सांग—

सुंदर०–[ देवी मागून ]–तर मग धांवत येऊन माझ्या सिंहासनाशीं टक्कर दे–

कामिनीः—ही पहा घेते– [ धावूं लागते इतक्यांत. ]

सुंदर०—शाबास ! शाबास ! वत्से, तुझी इच्छा पूर्ण होईल–

[ ती टक्कर देणार इतक्यांत सुंदरलाल मधें येऊन सांवरून धरतो. ]

अग–अग–मरशील ना ?

कामिनीः—अगबाई, कोण–सुंदरलाल ? तुम्ही कसे इथं ?

सुंदर०—हें विड्यांचं तबक घेऊन मी इथं आलों तों तूं ध्यान–मग्न दिसलीस ! इतक्यांत देवी तुझ्याशीं बोलूं लागली ! तो तुमचा सारा संवाद मी ऐकला. तुझं माझ्यावरचं प्रेम पाहून मी अगदीं गारीगार झालों आहें. देवीच्या आशिर्वादानं आपले हेतू पूर्ण होणारच;–पण त्याच्या आधीं तुला एक काम सांगायचं आहे.

कामिनीः—सांगा–माझ्या लालाच्या पायीं मी जीव वाहिला आहे.

सुंदर०ः—हें मला माहीत कां नाहीं ? पण हें काम जरा नाजुक आहे; राजकारणांतलं आहे.

कामिनीः—काय ? राजकारण ? मग–नको ग बाई ! सुळीं सुद्धां जावं लागायचं–

**सुंदर०:**—अग पण त्या सुंदरची आणि तुझा अपमान करणाऱ्या त्या तुझ्या बाईसाहेबांची खोड मोडायची आहे ना आपल्याला !-हें घे औषध. [ पुडी देतो. ]-हें औषध माझ्या ओळखीच्या साहेबा पासून मी आणलं ! शंकर किल्ल्यांत राहायला गेल्यावर मी सांगेन तेव्हां, हें पाण्याच्या साऱ्या टाक्यांत मिसळ, ह्मणजे त्यांची चांगली खोड मोडेल !-पुडीचं काम विसरूं नकोस ! एवढी चोरी बिनबोभाट तूं केलीस तर आपल्या प्रेमाची चोरी कुठंच उमगणार नाहीं !-देवी आपली पाठिराखी आहेच !

**कामिनी:**—पण पूड पाण्यांत टाकतांना मला कुणी पाहिलं तर ?

**सुंदर०:**—तर मात्र आपली खोड मोडेल ! त्या पहा, बाईसाहेब आल्या—चल-पळ-पळ-[ दोघेही जातात. दरबारी वेषांत, लक्ष्मी, सुंदर, मोरोपंत व इतर सरदार येऊन देवीला मुजरे करतात. ]

**लक्ष्मी:**—बाबा, सरदार मानकरी हो, झांशीची समशेर, इभ्रत पणाला लावून, कर्तव्या करतां काल बाहेर पडलीच आहे;-आतां यापुढं आपल्या जबाबदारीचा प्रश्न येतो ! झांशीच्या दौलतीला बहाल केलेलीं आपलीं स्वामिनिष्ठ मस्तकं, तिची आबाद राखण्याकरतां, आपल्या तकदिराला तुडवीत रणांगणीं आह्मी उधळून द्यायला तयार आहोंत-असं या देवी भवानीच्या मंदिरात सर्वांकडून जाहीर झालें पाहिजे ! बोला, झांशीच्या गादीचा हा निर्वाणीचा सवाल आहे ! राष्ट्रदेवीच्या या नवरात्रांत-तिच्या सौभाग्याचा करंडा, आपल्या उसळत्या रक्ताचं कुंकूं करून भरायची ज्या रणमर्दांची हिंमत असेल त्यांनीं बेगुमान पुढं येऊन देवीच्या पायीं हात मारावा आणि यांतला विडा उचलावा !

**मोरोपंत:**—[ स्वगत ] अहाहा ! खरोखर, प्रतिरात्रीं आकाशांत चमकणारा नक्षत्रांचा नकाशा ह्मणजे जगांत या मनूप्रमाणं कर्तृत्ववान् ठरणाऱ्या दिव्य आत्म्यांची नाम-सूचीच होय ! [ प्रकाश ] झांशीचा सरदार, हा मोरोपंत तांबे, भवानी बरोबर दौलतीला मुजरा करून, आपलं मस्तक या पणाला प्रथम लावीत आहे ! [ देवीला नमस्कार करून विडा उचलतो. ]

**लक्ष्मी:**—लक्षांत ठेवा कीं प्रतिज्ञेचा उच्चार करण्या आधीं प्रत्येक मर्दाला, आपल्या हातानं आपल्या स्त्रीचं कुंकूं वाढवावं लागेल आणि प्रत्येक सुवासिनीला आपलं मंगळसूत्र तोडावं लागेल ! !

**सर्वः**—याच अटीवर आह्मी हे विडे उचलतों–

[ सर्वजण विडे उचलतात व देवीला आणि नंतर लक्ष्मीला मुजरे करतात. ]

**लक्ष्मीः**—झांशीच्या दरबारचे हे शेवटचे विडे, माझ्या देखत सर्वांच्या तोंडीं रंगूं द्यात ! [ सर्वजण विडे खातात. ] प्रतिज्ञेची आठवण ठेवा आणि मग तरवारीला हात घाला ! कारण ही नागवेलीच्या नवतीची नार, रणरंगानं भरलेली आहे; ती तुमच्या तरवारीच्या धारेचा जाब, नागिणीच्या तडफीनं तुह्मांला विचारील ! !–जा–बाबा–शंकर किल्ल्यावर झांशीचं निशाण उभारा !–जा–सुंदर–आज पासून किल्ल्यावरच्या साऱ्या पहाऱ्यावर तुह्मी देखरेख राहील–

[ सर्वजण मुजरे करून जातात. ]

**लक्ष्मी**—[ तरवार काढून ] बाई विजये, प्रतिज्ञे प्रमाणं तुझ्या सौभाग्या पायीं, आज या झांशींतल्या साऱ्या वीरपत्न्यांच्या सौभाग्यावर मी पाणी सोडीत आहे ! साऱ्या सौभाग्यवतींच्या केशपाशांचं गंगावन करून, जरी तुह्मी या झांशीच्या राज्यलक्ष्मीची वेणी मला घालावी लागली, तरी त्यालाही मी आनंदानं तयार आहे !–“ शीर कलम झालं तरी बेहेत्तर पण शील कलम होऊं देणार नाहीं ”–या प्रतिज्ञेचा पुकारा माझ्या साऱ्या झांशीनं केला आहे ! या झांशीचा मान–झांशीचा धर्म ह्मणजेच झांशीचं शील; आणि विजये, हेंच तुझं सौभाग्य ! – लाडके, या तुझ्या वैभवावरून जीव ओंवाळून टाकायला तयार झालेल्या या रण–झुंझार दासांचे राई राई एवढाले खंड पडतील पण तुझं सौभाग्य अखंड राहील !—

[ पडदा पडतो. ]

---

## लहरी दुसरी.

[ **स्थळः—झांशीच्या जवळचें अरण्य.** कृष्णवेषांत रावसाहेब प्रवेशतो. ]

**रावसाहेबः**—संकेताप्रमाणं छावणी घेऊन लक्ष्मीच्या मदतीला तर आलों ! आतां पुढचं यश परमेश्वरी इच्छेवर अवलंबून आहे ! खरोखर, मानवी आशा-निराशांचं मूर्तिमंत चित्र ह्मणजे ही कृष्ण निशा ! या निसर्ग रचनेप्रमाणंच,

भवितव्यतेच्या भाग्यांबरांत भावि विजयाच्या चिमुकल्या चांदण्या चमचमतात, त्याचप्रमाणें निराशेचा भयाण अंधारही तिथें थैमान घालीत असतो!–किती भयाण हा अंधार! कोणत्या महाराक्षसाची कृष्णछाया या भूगोलावर प्रत्यही पडत असेल कोण जाणं! या अफाट काळ्या दर्यांत, किती तरी मोहक आशांच्या चांदण्या तटातट् तुटून पडत असतील आणि किती तरी आशांच्या मोत्यांचे शिंपले जन्माला येत असतील! वसुंधरेच्या आशानिराशांची मोजदाद करण्याकरतां, परमेश्वराच्या लीलालहरीनं निर्माण झालेला हा वारा, साऱ्या जगांत खळबळ उडवून, स्वर्गीय मंगलालाहि लाजवणारे लाल गोळे सोडणाऱ्या या शंकरकिल्ल्यांतील मंगलाची मोजणी–करण्याकरतां, त्याच्या हृदयावर टक्कर देत आहे;–पण मस्तकाच्या चिंध्या उडाल्यामुळं, केविलवाणा घूत्कार करीत मागं फिरत आहे! वायुराजा, लक्ष्मीच्या मंगलामंगलाची गणती तुला कशी करतां येणार? हृदयाला आनंदानं नाचवणाऱ्या त्याचप्रमाणं मनाची माती करून आयुष्याचा अंत करणाऱ्या भविष्याचा उगम, वर्तमानकाळांत मनुष्याच्या डोळ्या-देखत त्याच्या पायाखालीं होत असतो, तरी देखील तो ज्याचा त्याला समजत नाहीं; तर तुझ्यापुढं फिरत सुटलेल्या [illegible]लचक्रावरच्या प्राण्याच्या पळत्या पाव-लाखालीं काय आहे, हें तुझ्यासारख्या [illegible]ला काय समजणार?

[ हेस्टी हिंदी सैनिकासह प्रवेश करतो व चोरकंदीलाचा उजेड रावसाहेबावर पाडतो. ]

**हेस्टी**:—पकरो–पकरो काफरकू—

**रावसाहेब**:—हां–खबरदार–कोण आहे? हेस्टी?

**हेस्टी**:—कोन? रावशाप? बंडखोर रावशाप?

**रावसाहेब**:—होय, तोच हा बंडखोर रावसाहेब! तुमचा शत्रू हा राव-साहेब तुमच्यापुढं आहे! आमच्या मानाकरतां—

**हेस्टी**:—मान? तुमाला कशला मान? बंडखोर–दरोडेखोर टूमी! टूमाला कशला मान?

**रावसाहेब**:—आह्मांला कसला मान? वीस वर्षांच्या तुमच्या शेंबड्या पोराला मान आणि आह्मांला कसला मान?

**हेस्टी**:—चूप रहो-पकरो-अबीके अबी पकरो-

**राव**:—काय मगदूर आहे तुमची ! आघाताला प्रत्याघातच मिळेल ! समजलात ?

**हेस्टी**:—पकरो-पकरो-

[ हिंदी सैनिक पुढें होतात ]

**राव**:—या-या-तुमचे रक्त जर हिंदू नसतील तर पुढं या, आणि या रावसाहेबाला कैद करा ! तुमच्या आया जर हिंदूंच्या माता नसतील तर पुढं-या आणि माझ्यावर आपलीं शस्त्रं चालवा ! गुलाम व्हा-आपल्या मायबहिणींची विटंबना करण्याकरतां धांवत सुटा ! नका असे मागं सरूं नका !-तुम्हां सर्वांच्या समशेरीला सामना द्यायला, या एकटया रावसाहेबाची ही एकटी तरवार तयार आहे ! !-उपसा-आपल्या तरवारी उपसा ! तुमचा भाऊ-तुमच्या मातांचा हा मानलेला मुलगा-तुमच्यापुढं छाती ठोकून उभा आहे-

**हेस्टी**:—अरे, पकरो उस्कू-

**एक सैनीक**:—नै साप-आप पकरो-आप पकरो—

**हेस्टी**:—रिअली दी हेडस् ऑफ दोज इन्डियन रास्कलस् मस्ट बी नॉक्ड डाऊन !

**राव०**:—पहा साहेब, काल किती विचित्र आला आहे ! तुमचे स्वतःचे लोक तुमचा हुकूम पाळीत नाहींत, एवढंच नव्हे, तर हेच माझे गुलाम झालेले देशबांधव, माझ्याएकाच शब्दाबरोबर या साहेब बहाद्दुराला इथं कैद करतील; समजलात ? पण तुमच्या सारख्या घमेंडखोरांची रग रणांगणावर जिरवण्याचं सामर्थ्य आमच्या मनगटांत असतांना, हा नादानपणचा मार्ग मी कधींच स्वीकारणार नाहीं !-गुलाम झालेल्या माझ्या देशबंधूना रणांगणावर दुर्दैवाने तुमच्याशीं, तुमच्या मातांच्या अब्रूकरतां, तुमच्या धर्माकरतं दोन हात करावे लागतील !-तुम्हांला जबरदस्तीनं माझ्या मार्गातून दूर करावं लागेल, पण माझ्यावर न रागावतां धीरानं माझ्याशीं लढायला तयार व्हा-

[ जाऊं लागतो. ]

**हेस्टी**:—खबरडार ! आमचा उपमर्द ! टूमी कोनापुरं बोलले ?



सुंदर०:—अरे—यानीं तर माझ्यावर हल्ला करण्याचा विचार केला ! [ पृष्ठ ५९ ]

रावसाहेबः—एका इंग्रज सरदारापुढं ! साहेब, विनाकारण रक्तपात व्हावा अशी माझी इच्छा नाहीं ! तुमची जर इच्छाच असेल, तर तुमच्याशीं दोन हात करायला, या क्षणीं मी तयार आहें.–सोडा–माझा रस्ता मोकळा करा ! आणि उजळ माथ्यानं युद्धाला उभे रहा !–जा, झांशीच्या महाराणी लक्ष्मीच्या मदतीला आलेल्या माझ्या सैन्याशीं टक्कर द्यायला तयार व्हा !–जा.

हेस्टीः—पकरो–

राव०:—" पकरो–पकरो " असं घसा कोरडा करून छाती फुटेपर्यंत ओरडलात, अगदीं कल्पांतापर्यंत ओरडलात तरी सुद्धा आतां हे लोक माझ्यावर हात टाकणार नाहींत !–साहेब, तुमच्या उज्ज्वल कर्तृत्व–शक्तिवर–तुमच्या अंगीं वास्तव्य करणाऱ्या साहसी गुणांवर कोणीही लुब्ध होईल पण तुमच्या अन्यायाचे तुकडे करण्याकरतां उपसलेल्या आमच्या समशेरी कधींच म्यान होणार नाहींत.

हेस्टीः—मग आमच्या टरी कशा म्यान होटील ? [ तरवार उपसतो. ]

राव०:—त्या निमकहराम तरवारीशीं झुंजायला अशा उसळलेल्या आमच्या तरवारी तरी कशा मागं फिरतील !–[ तरवार उपसतो. ] आजपर्यंत, जगाच्या पाठीवर नांदत असलेल्या मोठमोठ्या वीरांच्या तरवारी, तुमच्या प्रखर समशेरींन दचकल्या असतील ! तुमच्या चरणधूलींत, स्वतःचीं मस्तकं लोळवण्यांत मोठमोठ्या रणझुंजारांना भूषण वाटत असेल–पण आत्माभिमानाच्या ऊर्मीनं उपसली गेलेली समशेर–त्या जिवाची हाडं–मोडून, निखळून पडेपर्यंत हातची सुटत नसते ! चला–व्हा दूर.

हेस्टीः—आटां डूर कशाला ?–[ लढूं लागतो. रावसाहेब; वार करून निघून जातो. ]–पकरो–खून–खून–मरडर !

शिपाईः—साप पळाला–साप पळाला.

हेस्टीः—साप कूटं पलाला ! दौरो–पकरो–

एक शिपाईः—साप–हमारा देश पकरनेकुवास्ते हम जाता हूं !–[ सर्व सैनिक जातात. ]

हेस्टीः—अरे ! येबी पलाले ! माय गॉड ! [ जातो. ] पडदा उघडतो.

---

# लहरी तिसरी

[ स्थळः—शंकर किल्ल्याची एक बाजू. सुंदर सुंदरलालला ओढीत प्रवेशते—मागे कामिनी—सर्वांच्या हातीं तरवारी. ]

सुन्दरलालः—अग—अग हें काय ? हें काय ? बायकोचा नवरा ह्मणजे तिचा विश्वासू कुत्रा असं कां तुला वाटतं ? कुत्र्याप्रमाणं फरपटत मला ओढीत नेतेस; कांहीं शरम ?

सुन्दर॰:—एक शब्द अधीक बोलूं द्यायची नाहीं- " सांगशील त्याप्रमाणं ऐकेन " असं तुम्हीं आणि या तुमच्या मंजूळ साळुंकीनं कबूल केलं आहे !

सुन्दर॰:—अग पण त्यावेळेला आमच्या दोघांच्याही जिवावर बेतलं होतं ! जीव वांचवण्याकरतां वाटेल ते कपट करावं असं राजकारण आहे !

कामिनी—( सुंदरलालास एकीकडे ) अहो—पण देवीची शपथ दिली आहे ना तिला ? शपथ मोडली ह्मणजे देवीचा रोष तर नाहींना होणार ?

सुन्दर॰:—( कामिनी ) अग राजकारणांत देवाला मज्जाव आहे—समजलीस ?

कामिनीः—( सुंदर॰ला. )—पण बाई—

सुंदर॰:—( कामिनीस ) बाई आपला पण शेवटास जाईपर्यंत तुझे पण जरा बाजुला ठेविनास !

सुंदरः—कायहो, खलबत कसलं करताय ? एकादा राजकारणांतला घोटाळा आहे कीं काय ? पण सांभाळाहो—नाहीं तर या प्रेमांतली अक्कल बोकाळतां बोकाळतां, एकदम राजकारणांत घुसल्यामुळं; प्रेमांतली एक अक्कल आणि राजकारणांतली दुसरी अक्कल, मिळून तुह्मी बे—अक्कल व्हाल—

सुंदर॰:—हां खबरदार ! बे अकली बेफाट पणानं बडबडणाऱ्या—

कामिनीः—अहो—अहो—रागावूं नका तिच्यावर ! ती मेली रागावली ह्मणजे पिडा होईल ना—

सुंदरः—( स्वगत. ) वेडे कामिनी—तुझ्या या भोळ्या प्रेमाचं या दगडोबा-पुढं काय चीज—होणार ( उघड )—कायहो—सांगेन त्या प्रमाणं वागणार कीं नाहीं ?

कामिनीः—( सुंदरलालास ) म्हणा ' हो ' म्हणून ! म्हणा कीं ' हो ' ! बाई सुंदर-तुझ्या सांगण्याप्रमाणं मी वागायला तयार आहें ! पण अशी भेड सावूं नकोस आह्माला.

सुंदर०:—( कामिनीस ) अग अशी भितेस काय ? आजपर्यंत भीत आलों तेवढं पुरे झालं ! हातांत काय आहे तें पाहिलंस ना आतां ? ( तरवार दाख-वतो. ) सुंदरकडे वळून कायग ए—तुझ्या शद्बाप्रमाणं वागायला मी काय तुझी बायको आहें का ?

कामिनीः—अरे देवा—हे तर रागावले सुद्धां ! आतां काय होणार ? देवी सांभाळ ग—बाई आह्माला.

सुंदर०:—हं—तोंड सांभाळा ! माझ्या तोंडाला तोंड देऊं नका—

सुंदर०:—तुझ्या तोंडाला मी तोंड देऊं नको तर काय सारा गांव देणार ?

सुंदर०:—लढाईचे हात शिकायला तयार आहांत कीं नाहीं ?

सुंदर०:—अग, तुझ्यासारख्या बायकोकडून लढाईचे हात काय शिकायचे आहेत ? तुला लढाईची घमेंड असेल—चल—होऊं दे तुझे माझे चार हात.

सुंदर०:—अस्सं का ? या—रणधीर—या तर असे ! हं कामिनी—काल शिक-वलेले हात तूं त्या बाजूनं सुरू कर ! मी इकडून चाल करतें. मधे हे वीर—शिरो-मणी आहेतच ! हं करा सुरूं. [ दोघी पवित्र्यांत उभ्या रहातात. ]

सुंदर०:—अरे—यानीं तर माझ्यावर हल्ला करण्याचा विचार केला ! यांच्या कोल्हे-कुईंत माझी हाडं तरी शिल्लक राहणार कां ? एकजण दुसरीचा राग होऊं नये ह्मणून प्रेमानं लचका काढणार, तर दुसरी प्रेम नाहीं ह्मणून हाडूक उप-सणार ! देवारे देवा—

सुंदर०:—हं—सुरवात करा—

सुंदर०:—कुठनं ही बायकांची साडेसाती माझ्या मागं लागली कोण जाणं ! अग ए—काय वाटेल तें दुसरं सांग; पण लढाईचं नको सांगूस ! एक महिना-

भर डोळे झांकून आंधळी कोशिंबीर खेळायला सांग.–खेळतों ! तुझ्यासमोर कान धरून, दररोज पन्नास उठाबशा काढायला सांग,–काढतों;–लहान मुलांना पंतोजी घोडी देतो, तशी घोडी मला आठ दिवस दे–पण–

**मुंदर०:**—तें कांहीं नाहीं–माझ्याकरतां नाहीं पण तुमच्या स्वतःच्या जिवा-करता तरी लढायला शिका ! हं कामिनी, कर सुरूं—

**सुंदर०:**—आतां तर ही अगदीं हातघाईवर आली !–या दोन्हीकडून अंगा-वर आल्या कीं मधून एकदम निसटतों. मग एकमेकींवर आदळल्यामुळं यांच्या शरीराच्या चिंध्या होऊन या मेल्या तरी हरकत नाहीं ! ( प्रकाश ) हं–चल ये एकदां. तुझी घमेंड उतरायला हा वीर तयार आहे ! ( कामिनीस ) कामिनी, तूं माझ्यावर थोडा नाजूक हल्ला कर ह्मणजे–दाखवितों माझा पराक्रम–

**कामिनी:**—माझी काळजी नका करूं ! तुह्मी तिला सांभाळा ह्मणजे झालं–

[ मुंदर त्यांच्यावर चाल करून जाते, कामिनी तेथेंच तरवार फिरवते. व सुंदरलाल तरवार फिरवीत ओरडतो. ]

**सुंदर०:**—अरे–अरे–माझा रेंदा पाडायचा विचार केलास कीं काय ? ( स्वगत ) हिच्या तावडीतनं निसटायला कांहीं तरी युक्ति केली पाहिजे. [ उघड ] अग ए–असल्या लढण्यांत रंग येत नाहीं ! ही लढाई कांहीं अटीवर झाली पाहिजे !

**मुंदर:**—असं का ? वा; फारच छान—

**कामिनी:**—अहो, आतां कसली आणखी अट काढता ? आतांपर्यंत थोड्या का अटी आपल्या पाठीशीं लागल्या–

**सुंदर०:**—( कामिनीस एकीकडे )–तूं मुळींच भिऊं नकोस. माझ्या युक्तीनं आपण आतां गप्पा मारायला मोकळे होऊं ! ( उघड ) मुंदर–आपल्या तिघा-तलं एक कोणी तरी जमिनदोस्त होईपर्यंत ही लढाई चालावी.

**कामिनी:**—अगबाई ! मी नाहीं तुमच्याशीं लग्न झाल्याशिवाय जमिन-दोस्त व्हायची !

**सुंदर०:**—( मुंदरला ) बोल–आहेस माझ्या अटीवर लढायला तयार ?

**मुंदर:**—हो–हो–माझी सुद्धां हीच इच्छा आहे ! कसे तरी एकदा तरवार फिरवायला शिकून आपला जीव या कडुकाळांतनं वाचवा ह्मणजे झालं !

सुंदर०:—तुझ्या तडाक्यातनं ज्या वेळीं वाचेन त्यावेळीं कंडुकाळाला बळी पडायची भीति ! पण चल–ठीक आहे.

कामिनीः—अहो ठीक काय ? ही कावेबाज आहे; तुह्मांला खरोखरीच ती मारील ! मुंदर–ते नाहींत या अटीवर तुझ्याशीं लढत.

सुंदर०—कामिनी, मी या अटीवर हिच्याशीं सामना द्यायला तयार आहे ! चल मुंदर–सलामी दे–( तरवार सरसावतो )

कामिनीः—आतां काय करूं ?

सुंदरः—अगदीं स्वस्थ रहा !–हर हर महादेव–

[ मुंदर लढूं लागते, सुंदरलाल गिरक्या घेत तरवार फिरवतो व मध्येंच जमिनी-वर लोळण घेतो ]

मुंदरः—अहो, हें काय ? असे लोळतां काय ?

कामिनीः—अगबाई, काय झालं ? ( सुंदरलाल जवळ घाबरून बसते ) मेले घात केलास ग, घात केलास ! नवऱ्याला मारलंस–नरकांत पडशील ! आतां मी लग्न कुणाशीं हो करूं ?

सुंदरः—( पडल्या जागेवरूनच ) अग माझ्याशींच–

मुंदरः—अहो उठा–

सुंदर०:—मी मरून जमिनदोस्त झालों आहे ! लढाई बंद होत असेल तर उठतों !

कामिनीः—अरे देवा, तुम्ही मेल्यावर कसे हो उठणार ? अग काय ग केलंस यांना ?

सुंदर०:—ती काय करते मला ? तिची काय थोबडी ? तिला मी लढाईंत जिंकली आहे ! बोल लढाई बंद कीं नाहीं ?

कामिनीः—हिला जिंकलीत कां ? बरी मेलीची खोड मोडलीत ! मग तर तुह्मी आपले असेच पडून रहा हो !

मुंदरः—( स्वगत ) ही अट माझ्याच गळ्यांत आली खरी ! आजपर्यंत त्यांनीं माझ्या अटी पाळल्या पण आतां ही अट मला पाळलीच पाहिजे ! (उघड) मला फसविलंत काय ? उठा–लढाई बंद !

सुंदर०:—( एकदम उठून ) शाबास विरानों ! कामिनी जयाचं निशाण उभार ! शरण आलेल्या शत्रू मुंदर—( आंत पाहरा बदलल्याचा तास वाजतो )

मुंदरः—अगबाई; पहारे बदलले. मला तपासणीला गेलं पाहिजे.

सुंदर०—जाव–पराजीत झालेल्या अवले, तुझ्या तरवारीची खंडणी घेऊन तुला आह्मी सोडून देतों.

मंदर—याचा सूड घेईन बरं–( हंसत जाते. )

सुंदर०—कामिनी, जित्याची खोड मेल्याशिवाय जात नाहीं असं ह्मणतात त्याची सत्यता आज मला पटली—

कामिनीः—ती कशी ?

सुंदर०:—अग–मीं मेलों–आणि त्या जित्या मुन्दरची खोड मोडली ! पण तिला मारून टाकल्याशिवाय आपल्याला पूर्ण शांति मिळणार नाहीं ! हें पहा कामिनी, तिची चटणी आजच रात्रीं करण्याचा बेत केलाय !

कामिनीः—ती कशी ? एखादा पाप–मार्ग तर नाहींना ?

सुंदर०:—अग कारस्थानांत पाप मुळींच नसतं ! पूर्ण पवित्र जर जगांत कांहीं असेल तर तें कारस्थान ! हें पहा–आज मीं असा बेत केलाय, कीं दारूच्या कोठारावरचा पाहारा तपासायला ती आली कीं त्याला आग लावायची ! जाईल त्या धूमधडाक्यांत उडून ! ! आणि मीं जी तुला पूड दिली तीसुद्धां तूं आज रात्रींच झाडून साऱ्या टाकींत मिसळ ! मग पाहूं; उद्यां आपले शत्रु कसे शिल्लक राहतात ते !

कामिनीः—पण वीप मिसळण्यांत पाप—

सुंदर०:—अग, तुझ्या हातून पाप घडेल कसं ? तूं जर पापी असतीस तर देवी इतक्या लौकर तुला कशी प्रसन्न झाली असती ?

( जातात. )

पडदा उघडतो.

[stamp]

# लहरी चवथी.

[ स्थळ—झांशी. शंकर किल्ला. समर वेषांत लक्ष्मी व एक दूत प्रवेशतात. ]

लक्ष्मी:—काय ह्मणालास? पेशव्यांचा मोड झाला? इंग्रजांची सरशी होऊं लागली?

दूत:—होय सरकार—

लक्ष्मी:—निकमहराम! लाज नाहीं वाटत असला निरोप सांगायला? टाक दे टाकून— ती तरवार आणि या लक्ष्मीच्या हातांतल्या बांगड्या आपल्या हातांत भर! झांशीनं पेशव्यांच्या बलावर आपली तरवार उपसली नाहीं, तर आपल्या आत्मतेजावर विश्वास टेऊन, तिनं ही रणकुंडांत उडी घेतली आहे! समजलास? झांशीनं रणांगणांत उडी बण्डांत सामील होण्याकरतां घेतली नाहीं तर या झांशीच्या राजनिष्ठेचा झालेला अपमान—या झांशीच्या बाबतींत झालेला अन्याय यांचा सूड घेण्याकरतां—स्वतःच्या स्वातंत्र्याचं रक्षण करण्याकरतां! श्रीशिवाजी-महाराजांच्या तेजस्वितेचा एकादा जरी किरण तुमच्या अंगांत आज असेल, तर तुमच्या देशभगिनींच्या पेक्षां तरी नामर्द बनूं नका—आपला मर्दानीपणा कायम ठेवा—जा; तुमच्या आया—बहिणींच्या अब्रूची—तुमच्या स्वतःच्या बायकांच्या पातिव्रत्याची जर तुह्मांला कांहीं चाड असेल तर शत्रूंशी शेवटपर्यंत झुंजत रहा—जा.

( दूत जातो )

लक्ष्मी:—( घनगर्ज तोफेवर बसते ) इंग्रजांचा विजय!—हतभागी आर्यदेवी, तुझ्या चारित्र्यपटावर तुझ्या कोणत्या कालाची ही रेषा उमटत आहे? तुझ्या भाग्याची ही प्रभातकाळ, मध्यान्ह, सायंकाल, कीं मध्य—निशा? हा प्रभात-काल काय? नाहीं, शिवाजी महाराजांच्या अस्ताबरोबरच त्या रमणीय काला-चाही अस्त झाला! पहिल्या बाजीरावांच्या तेजस्वी कारकीर्दीत तुझ्या दैव—गग-नाच्या मध्यावर आलेला तुझा वैभवसूर्य, बाळाजीरावच्या आयुष्यांत, पानि-पतच्या रणमैदानावर मराठ्यांच्या विक्रमशाली रक्तांत एकदम खळाळून पडला! आणि हल्लींच्या या मध्य—रात्रीला सुरवात करून देणारा हा पापी सायंकाळ,

मालकम् साहेबांच्या हातावर पेशवाईचं उदक सोडणाऱ्या बाजीरावाच्या कारकीर्दींत आला ! मध्यनिशा–मध्यनिशा–सर्वत्र घोर अंधार–अनाचार ! या मध्यरात्रीच्या वेळीं सैतानी–सत्तेशिवाय दुसऱ्या कोणाचं साम्राज्य सुरू होणार ? भानुरायाचा अपहार करून, मानवी नेत्रांना–“ पूर्वेकडून अंधार येतो ” अशी भूल पाडणाऱ्या या पश्चिमेला, या अंधाराची जननी ह्मणूं कीं जगाच्या व्यवहारांत परमेश्वरानं निर्माण केलेली पापी जादुगारीण ह्मणूं ? अन्यायाचा विजय–राक्षसी वृत्तीचा विजय व्हावा अशाच तऱ्हेची गति परमेश्वरानं आपल्या कालचक्राला हल्लीं दिली काय ? परमेश्वराच्या कल्पनातरंगाच्या हेलकाव्यावरोवर वाटेल त्या दिशेनं फिरणाऱ्या असुरी कालचक्रा, तुझी ही वक्रगति थांबणार तरी केव्हां आणि तुझ्या या कृतांत–कृतींत सांपडलेल्या माझ्या देशाच्या दुर्दैवाचा शेवट होणार तरी केव्हां ?

**मोरोपंतः**—[ प्रवेशून ] मनू, पेशव्यांचा मोड झाला !–पण हें–हें काय मी पाहतों ? मनू, तूं आज अशी उदास कां ? चार दिवसांपूर्वी या तुझ्या तोंडावर खिदळणारा आनंदाचा गुलाब आज असा सुकून कां गेला ? या तुझ्या दिव्य डोळ्यांच्या कोंदणांतल्या देदीप्यमान हिऱ्यांच्या ऐवजीं आज हे लाल कुठून आले ? हें अश्रु–पटल–मनू–तुझ्या डोळ्यांतली मर्दानी चमक पार नाहींशी करीत आहे ! पूस, पूस ते डोळे ! तुझा तेजस्वी स्वभाव आज कुठं लपून बसला ? तुझं मानी मन–मनू–आज इतकं कमकुवत कसं बनलं ? मनू, सांग–कोणत्या भयंकर संकटानं ही आनंद–चंद्रिका आज अशी भांवावून गेली ?

**लक्ष्मीः**—बाबा–काय सांगू ?

**मोरोपंतः**—मनू–बाळ मनू–लाडके छबेली, या युद्धांत उडी घेतल्यानं तुला त्रास होतो कां ? बोल, ही तुझ्या बापाची छाती तुझ्या कोणत्याही दुःखाला झेलून धरायला तयार आहे !

**लक्ष्मीः**—होय, बाबा, या मनूच्या कोणत्याहि दुःखाला आपली छाती झेलून धरील, बाबा, या तुमच्या पोरीचं संकट नाहींसं करण्याकरतां, तुह्मी आपली मान वनराजाच्या जबड्यांत आनंदानं घाल; पडत्या आकाशाचं निवारण–बाबा–या तुमच्या छबेलीच्या रक्षणाकरतां, स्वतःच्या कपाळमोक्षानं कराल; पण–या वेळेला मी काय बोलूं ?

**मोरोपंतः**—हें काय बाळ ? सांग—कोणत्या कारणानं; माझ्या या बाळाच डोळे अश्रुनं डवडवले ?—सांग पेशव्यांच्या पराजयामुळं, आपल्यावरही येणाऱ्या त्याच प्रसंगाच्या कल्पनेनं तुझं हृदय दडपून गेलं काय ? तुझा मूळचा स्त्रीस्वभाव आज जागा होऊन, वीरालाही लाजवणारी तुझ्या हृदयाची कठोरता नष्ट झाली काय ?

**लक्ष्मीः**—पेशव्यांच्या मोडानं—माझ्या स्वतःच्या अपयशानं—या लक्ष्मीचं हृदय दडपून जाण्याइतकं—बाबा—तें आतां कमकुवत राहिलं नाहीं ! या इंग्रजांच्या तरवारीच्या प्रखरतेनं बिचकून मागं सरण्याइतकं जर या लक्ष्मीचं हृदय भित्रं असतं, तर मी युद्धाचा पुकाराच केला नसता ! बाबा—फत्तर फुटेल पण या लक्ष्मीचं हृदय अभेद्य राहील ! कोंवळ्या बाळाच्या पोटांत कट्यार खुपसतांच, त्याच्या चिमुकल्या काळजांतून उसळणाऱ्या रक्ताच्या लाल चिळकांडीकडं, एक सारखी दृष्टी रोखून—त्याची केविलवाणी किंकाळी ऐकण्याचं सामर्थ्य माझ्या देशाच्या परिस्थितीनं मला दिलं आहे ! रण—कल्लोळांत, दीनदुबळ्यांच्या हृदयभेदी विलापाकडं पाठ फिरवून, राष्ट्रोद्धाराच्या पवित्र मंदिराच्या कळसावर, रक्तानं रंगलेलं या लक्ष्मीचं मस्तक ठेवायला मी केव्हांही तयार आहें ! पण बाबा—

**मोरोपंतः**—छबेली, बोल—या तुझ्या मुग्धपणानं तुझ्या पित्याच्या मनाला यातना होत आहेत ! बोल—छबेली—हें पाणी तुझ्या डोळ्यांत कशाकरतां ?

**लक्ष्मीः**—कशा करतां ? खरंच, कशा करतां बरं हे अश्रु ? कशा करतां आहेत हें जर मी तुम्हाला सांगितलं, तर बाबा—तुमच्या अपजयानं—तुमचं हृदय फाटून नाहीं का जात ? रणांगणावर तडफडणाऱ्या जीवांच्या क्षणिक किंकाळ्या, या अपजयानं भारतवर्षांत अखंड चालू राहतील !—बोला—आपल्या आंतड्याला पीळ नाहीं का पडत ? कुमारिकांचं कौमार्य—पतिव्रतांचं पातिव्रत्य दिवसा ढवळ्या नष्ट होऊन, त्या बाजारबसव्यांच्या ओळीला खेंचल्या जातील ! बोला—बाबा—तुमच्याही डोळ्यांत पाणी नाहीं का येत राष्ट्राचं धुरिणत्व धारण करणाऱ्याचं हृदय कितीहि कठोर असलं तरी तें व्यक्ति पुरतंच !—रणांगणावरचं त्याचं हृदय निराळं आणि इतर वेळचं त्याचं हृदय निराळं ! बाबा, राष्ट्रोद्धाराच्या मागं लागलेल्या पुढाऱ्याचं हृदय म्हणजे राष्ट्रांतील प्रत्येक व्यक्तिच्या हृदयाचं मूर्तिमंत प्रतिबिंब पाहिजे.

**मोरोपंतः**—अहाहा ! बोल–लाडके मनू–चालू दे ! राष्ट्रोद्धाराच्या कल्पनांची अशीच रसवंती सुरू ठेव ! म्हणजे त्या रसवंतीच्या हेलकाव्यानं हालणारा या हवेंतला प्रत्येक अणुरेणु, तुझे विचार या आर्यावर्ताच्या गुलाम होणाऱ्या भावि पिढीला सांगेल ! राष्ट्र-यक्षिणी, फिरव–आपली वाचा-मोहिनी जन्माला येणाऱ्या गोजिरवाण्या बालकांच्यावरून फिरव म्हणजे त्यांच्या गर्भवासांतच, त्यांच्या कोंवळ्या मनावर हे राष्ट्रोद्धाराचे विचार बिंबले जाऊन-जन्माला येतांच तीं स्वतंत्र मनानं खिदळूं लागतील !

**लक्ष्मीः**—बाबा, कालचक्राच्या कोणत्या भयंकर खांचेंत आपला देश सांपडला आहे याचं निरीक्षण करा ! माझ्या शब्दानं–अशुभ बोलूं नये, पण बाबा, तुमच्या सुद्धां शब्दानं ती खांच भरून येणार नाहीं; तर त्या खोल-खांचेंत जगांतील साऱ्या अनर्थांची, पुनरावृत्ति होणार–असाच ईश्वरी संकेत दिसतो !–अशा वेळेला हृदयाचे सारे कोमल धागे पिळवटून, त्याचा करुण–रस अश्रूंच्या रूपानं जर डोळ्यांत चमकला तर त्यांत काय नवल ?–मनांतील शांतता नष्ट होऊन, भाविकालांत होणारा आत्मयज्ञ याच क्षणाला करून–

**मोरोपंतः**—अरेरे ! लक्ष्मी–नको–नको ही विचारतंद्री ! अग तुझ्या सारखी–रण–देवता विधि–संकेत आपल्या तरवारीच्या जोरावर कशावरून बदलणार नाहीं ! पण याच वेळ्या विचार लहरींनं–मनाला हेलकावे बसतां बसतां, जर मन भडकल्यामुळं आपला भावि आत्मयज्ञ अविचारानं तूं अकालीं करून घेतलास, तर देवि–दैववशात् तुझ्या कडून राखले जाणारे या आर्य-देवीचे चुडे कोण राखणार ? दैवयोगानं जी कालचक्राची खांच शत्रूनं भरून निघण्याचा संभव आहे तीच खांच तुझ्या अविचारीं कृत्यामुळं, आपल्याच भावि जनतेच्या हाडामांसानं खात्रीनं भरून निघेल ! मनू–मनू–तुझ्या मनांत उसळणाऱ्या या अविचाराच्या अस्पष्ट लाटेवर, हिंदुस्थानचं सारं भवितव्य हेलकावत आहे याचा विचार कर ! या लाटेच्या धडाक्यानं भावि पिढी गुलामगिरीच्या रुक्ष वाळवंटांत खात्रीनं लोटली जाईल ! तुझा आनंदा–त पोरकं पोर–

**आनंद०**—[ प्रवेशून. ] आई–आई, आपला जय झाला. आई [ जवळ जातो. ]

**लक्ष्मीः**—आई ! अहाहा—आई ! या लक्ष्मीला ' आई ' ह्मणून संबोधणारा माझा लाडका आनंद ! पतिप्रेमाला पारखं झालेल्या, मातृपदाला कायमचं आंचवलेल्या या लक्ष्मीच्या हृदयांत—मातृ-प्रेमाच्या मृदुल लहरी उत्पन्न करणारा माझा राजहंस आनंदा— [ जवळ घेते. ]

**मोरोपंतः**—होय, मनू—तोच—तोच तुझा आनंद ! या जगांत उरलेला तुझ्या आनंदाचा ठेवा. तुझ्या प्रेमाचं भांडार ! लक्ष्मी, घे त्याला जवळ; आपल्या हृदयाशीं असाच त्याला कुरवाळून धर ! तुझ्या हृदयांत खेळत असलेल्या मातृ-प्रेमाच्या समुद्रावर त्याच प्रेमाच्या लाटा इतक्या तुफान उसळूं दे कीं त्याच्यांत तुझ्या विचारांची ती शेवटची अकाली आत्मयज्ञाची नादान लहरी एकरूप होऊन जाईल ! मनू—तुझ्या राज्ञी—हृदयांत, मातृ-प्रेमाच्या कारंजाचे तुषार इतके चौफेर उधळूं दे कीं त्या तुषारांत, या झांशींतील—नाहीं साऱ्या भरत खंडांतील प्रजाजन भिजून चिंब होतील ! आणि प्रजारूपानं नटलेल्या तुझ्या साऱ्या आनंदी—आनंदांच्या अंगावर आनंदाचे रोमांच थरारून, त्यांना मातृ-प्रेमाचा उमाळा येईल !

**लक्ष्मीः**—होय, बाबा—आणि ह्मणूनच माझ्या वात्सल्य प्रेमाच्या उमाळ्यानं, माझ्या राज्ञीपदाच्या जबाबदारीनं मी सांगतें कीं माझ्या आनंदरावाला स्वतंत्र करण्याकरतां,—प्रजारूपानं नटणाऱ्या माझ्या हजारो आनंदीआनंदांची गुलामगिरी चुकवण्याकरतां—ही लक्ष्मी—राष्ट्राच्या हाकेबरोबर कुठंही आपला आत्मबळी द्यायला तयार आहे !

**मोरोपंतः**—अहाहा ! लक्ष्मी—खात्रीनं या कालचक्राच्या कालगतीला कापून तूं या भारतवर्षाची गौरवलक्ष्मी होणार ! प्रत्येक हिंदुत्वाचा अभिमानी आपली प्राणवैजयंती तुझ्या गळ्यांत घालणार ! बाळे—या मोरोपंताला तूं धन्य केलंस ! मनू, तांब्याचं घराणं आपल्या पतीच्या वंशाबरोबरच तूं उद्धारलंस ! पुत्र एकाच कुलाचा उद्धार करतो—कन्या दोन वंशांचा उद्धार करूं शकतात !—मनू—ये—या तुझ्या पित्याला कडकडून भेट— [ भेटतात. ]

**लक्ष्मीः**—बाबा, खऱ्या आर्यांची मान शत्रू पुढं नमायच्या आधीं तुटून पडले !

**आनंदरावः**—मग आई, ह्मणूनच का ग आपल्या देशाला " आर्यावर्त " असं नांव पडलं आहे ?

**लक्ष्मी**:—होय बाळ; या देशांतल्या लोकांनीं आजपर्यंत शत्रुपुढं मरेतों आपली मान वांकवली नाहीं ! आणि ह्मणूनच या देशाचं नांव ' आर्यावर्त 'असं पडलं आहे ! ईश्वरकृपेनं हें नांव असंच कायम राहो—

**आनंदराव**:—राहणार—आई—तें असंच कायम राहणार—

**मोरोपंत**:—पण हें काय ?—लक्ष्मी—दारुगोळा पेटला—आग—

[ आंत दारुगोळा पेटतो. आवाज होतात. ]

**सेवक**:—[ प्रवेशून ] सरकार, पलीकडच्या बुरुजावरचा दारुगोळा पेटला! दारुगोळा खलास झाला ! पाण्याच्या टाकींत कुणीं दुष्टानं वीष मिसळलं; फितुरी झाली—

**लक्ष्मी**:—हरामखोर—दगलबाज ! मस्तकांचे गोळे करून शत्रूवर फेंका ! या लक्ष्मीचं मस्तक या घनगर्ज तोफेंतून शत्रूवर प्रथम डागा—

**मोरोपंत**:—विश्वासघात—दगा—

[illegible]

**लक्ष्मी**:—अरेरे ! बाळ, अशा विश्वासघातामुळं तुझ्या सारख्याच्या नशिबीं—' अरेरे ' च ह्मणायचं आहे ! या विश्वासघातानं—या फितुरीनं माझ्या दुर्दैवी देशा, तुझ्या स्वातंत्र्याला आग लागली तरी तुझे डोळे उघडूं नयेत ना ?

[ पडदा पडतो. ]

---

## लहरी पांचवी

[ **स्थळ**:—**काल्पी**, पराभूत रावसाहेब प्रवेश करतो. ]

**रावसाहेब**:—अरेरे ! झांशी, काय तुझी स्थिती झाली असेल ? लक्ष्मी, या रावसाहेबाच्या पराजयाची बातमी ऐकतांच, तुझ्या हृदयाला आगींत फेंकून दिल्यासारखं झालं असेल ! या रावसाहेबानं तुला फसवलं; हा रावसाहेब विश्वासघातकी भित्रा ठरला ! देवि, सारं जग या रावसाहेबाला " हाच तो फसव्या

रावसाहेब ’ ह्मणून तुच्छतेनं माझ्याकडं बोटं दाखवील ! ‘ रावसाहेब नामर्द–रावसाहेब नामर्द ’ ह्मणून सारं जग माझा–उपहास करील ! लक्ष्मी, आतां मी तुझ्यापुढं कोणत्या तोंडानं उभा राहूं ? तुला मी माझं, नीच, दगलबाज, भित्रं अन्तःकरण पुनः कसं दाखवूं ? अरेरे ! नको हा जीव !! रावसाहेबा—विश्वास-घातकी रावसाहेबा, काय केलंस हें ? लक्ष्मीला विश्वास देऊन तिचा विश्वासघात केलास ! नको—लक्ष्मी, माझ्याकडं अशी क्रूर नजरेनं पाहूं नकोस ! माझ्या कर्तव्यांत मी नादान ठरलों—भेकड ठरलों ! क्षमा कर ! तुझ्या दृष्टिक्षेपाबरोबर माझ्या सर्वांगाला हा पहा कंप सुटला आहे ! तुझ्या नजरेला नजर देण्याचं सामर्थ्य या रावसाहेबांत नाहीं ! आर्ये महामाये, तुझ्या नेत्रकुंडांतून निघणारा तुझ्या दृष्टीचा प्रत्येक किरण मला भाजून काढीत आहे ! काय ह्मणालीस ? माझ्या पराजयाचा डाग माझ्या शत्रूच्या रक्तानं धुऊन टाकूं ? टाकलों; माते, तुझी आज्ञा, तुझी प्रत्येक आज्ञा, हा यःकश्चित रावसाहेबच काय पण सारा आर्यावर्त ईश्वरी आज्ञेप्रमाणं पवित्र मानील !—माझ्या अपमानाचा सूड माझ्या पराजयाचा सूड मी कसा घेऊं ? या काल्पींत कल्पांत करूं कीं या रावसाहेबाच्या शरिरांतील हाडन् हाड उपसून, ह्या जिवन्त शस्त्रांनीं माझ्या शत्रूला लोळवूं ? काय—करूं काय ? माझ्या मायबहिणींच्या बेअब्रूमुळं फोडल्या जाणाऱ्या कर्कश किंकाळ्या, लहान कोंवळ्या बालकांना आकाशांत फेंकून संगीनींच्या टोंकावर झेलल्यामुळं, त्यांच्या नाजूक देहांतून झालेला पवित्र रक्तपात दुःखाचा हुंदकाहि फोडायला सवड न दिल्यामुळं,–कसायांच्या सुरीखालीं निव्वळ तडफडत—तडफडत प्राण सोडणाऱ्या आमच्या गोमातांचे आत्मे–हे पहा–माझ्या भोंवतीं थैमान घालूं–लागले ! धर्मछळामुळं धार्मिकांचा उडालेला हलकल्लोळ, निष्पाप आत्म्यांचा उडत असलेला चक्काचूर, आमच्या देवळांची होत असलेली विटंबना, आह्मां हिंदूंच्या हृदयांतल्या फाजील नीतिमत्तेच्या कोमल विचारांचा चक्काचूर उडवून द्यायला पुरेशी नाहीं काय ?—खुनाला खून, रक्तपाताला रक्तपात, क्रूरपणाला क्रूरपणा दाखवून झालेल्या पराजयाचा सूड घेऊं कीं न्याय–देवतेच्या पावलावर पाऊल टाकून, धर्मयुद्धानं–मनाची शांतता करून घेऊं ?-नको ! पापी विचारांना आर्य-हृदयांत मुळींच थारा नको ! जा–सूडाच्या पापी कल्पनेच्या पिसाट पिशाच्चांनों, या डोक्यांतून एकदम चालते व्हा ! या रावसाहेबाचा मार्ग, धर्म, नीति आणि न्याय या त्रयीचाच केलेला पाहिजे !

या रावसाहेबाचं अपजयानं काळं झालेलं तोंड या मार्गानं पुनः उज्ज्वल होऊन, त्या विक्रमदेवतेच्या-माझ्या देशाच्या आईच्या-झांशीच्या त्या लक्ष्मीच्या पुढं जाईपर्यंत, दयाघन परमेश्वरा, त्या देवतेला तिच्या संकटकालांत, तुझा दयेचा हात दे,—एवढीच तुझ्याजवळ तिच्या या पुत्राची विनंति आहे !—[ जातो.]

( पडदा उघडतो. )

K. V. Dalar ——

## लहरी सहावी.

——:०:——

[ स्थळः—झांशी. शंकर किल्ला. सिंहद्वार. मुंदर पहारा करीत असतां हेस्टी ससैन्य प्रवेश करतो. ]

**हेस्टीः**—ओ ब्यूटी ! औरत-साऱ्या औरत लढाऊ ?-पलो-रश ऑन् !

**मुंदरः**—[ तरवार उपसून ] एक पाऊल पुढं टाकशील तर रक्ताचे पाट या ठिकाणीं वाहूं लागतील ! समजलास ? ( लढूं लागतात. )-धांवा हो धांवा-

[ मोरोपंत तरवार उपसून सिंहद्वारांतून प्रवेश करतो. [

**मोरोपंतः**—भिऊं नको-मुंदर-भिऊं नको !-चल ये-या मोरोपंताच्या तरवारीशीं सामना दे !

[ लढूं लागतात. ]

**हेस्टीः**—ये तो शैतान ! अॅन अॅवच्युल मान्स्टर !

**लक्ष्मीः**—[ एकदम प्रवेशून ] दूर व्हा-एकदम दूर व्हा ! या महाराणी लक्ष्मीच्या तरवारीचं तेज या बाजारबुणग्यांना समजूं द्या !

[ सर्वजण लढूं लागतात. ]

**हेस्टीः**—ओ माय गॉड !, ये खूब शूरत औरत बिजली तो नही !-भागो दौरो-भागो—

[ पळून जातात. ] लक्ष्मी बेफाम होऊन जाऊं लागते-मोरोपंत तिला आंवरून धरतात. ]

**लक्ष्मी:**—सोडा; बाबा, सोडा मला! शत्रूशीं मरेपर्यंत झुंजायची या लक्ष्मीची इच्छा पूर्ण होऊं द्या! आज या लक्ष्मीच्या रक्ताचे पाट माझ्या झांशी-तल्या गरीबदुबळ्यांच्या वाहत्या रक्तांत मिळून गेल्याशिवाय, माझ्या आत्म्याला शांति मिळणार नाहीं!--सोडा मला--

**मुंदर:**—बाईसाहेब--शांत व्हा--शांत व्हा--

**मोरोपंत:**—बाळ अविचार करूं नकोस--

**लक्ष्मी:**—अविचार! बाबा, आज जर ही लक्ष्मी मेली नाहीं तर या लक्ष्मीनं महाराज्ञीचा मुकुट आपल्याला लोळायला मिळावं म्हणून आपल्या मस्त-कावर ठेवला,—प्रजेच्या दुःखाची वांटेकरीण होण्याकरितां ठेवला नाहीं--असं सारं जग म्हणेल!--ऐका—बाबा--ऐका या आरोळ्या. माझ्या दीनदुबळ्या प्रजेच्या या आरोळ्या—माझ्या आंतड्यांना पिळून टाकीत आहेत! तें पहा--बाबा--हल-वाईपुऱ्याच्या आगींत माझ्या झांशीचं स्वातंत्र्य कसं जळून खाक होत आहे या हृदयाला लागलेली आग--बाबा--माझ्या दुस्मानांच्या रक्तानं मला विझवूं द्या! चला--बाबा--वीरांना साजेल अशा रीतीनं आपण मरूं या.

**मोरोपन्त:**—[ तिच्या आड येऊन ] मनू, प्रसंग लक्षांत घे! स्त्रीकुल कार्यांत मृत्यु आणि निराशा स्पष्टपणानं दिसत असतांना—मनू—हा अविचार तूं करणार? —मनू जीव वांचव—जीव वांचव आणि देशोद्धार कर! बाळ, परमेश्वर अजून आपल्याला मदत करील!—मनू—नको—नको—हा आत्मघात करूं नको—

**लक्ष्मी:**—आत्मघात! आत्मघात! नाहीं बाबा--हा आत्मघात नाहीं तर आत्मोद्धार आहे! या रणयज्ञांत जिवाची आहुती दिल्यानं माझ्या देहाचं सोनं होऊन जिवाचं मोल होईल!--सोडा मला--माझ्या मार्गांत येऊं नका--

**मुंदर**—बाईसाहेब, या मुंदरला--आपल्या प्रजेपैकींच एकीला तुडवून पुढं जा--[ तिचे पाय धरते ]

**लक्ष्मी:**—मृत्यु—मुखांत सांपडलेल्या माझ्या हजारो प्रजाजनांना सोडवण्या-करतां, ही लक्ष्मी या एका मुंदरला लाथेनं अशी दूर सारायला कधींच मागं पुढं पाहणार नाहीं!—[ लाथ मारते ]—खबरदार मला अडथळा कराल तर!—[ जाऊं लागते. मोरोपंत तिचे पाय धरतात. ]

**मोरोपन्तः**—मनू–पितृत्वाचा अभिमान सोडून हा मोरोपंत तुझे पाय धरीत आहे !–लक्ष्मी, शांत हो–शांत हो–आणि हा वेडा विचार सोडून दे—

**लक्ष्मीः**—जें उत्तर मुंदरला तेंच उत्तर माझ्या जन्मदात्या पित्याला ! काय ? नाही जाऊं देत ? हें भेकडपणाचं वर्तन या लक्ष्मीच्याच बापाकडून होत आहे का ? कवडी किंमतीच्या एका प्राणाच्या आशेनं, तडफडणाऱ्या हजारो निराश्रित प्राण्यांकडं दुर्लक्ष करणाऱ्या या माझ्या बापाला मी बापच ह्मणूं का ? जा, बाबा–तुम्हाला तुमच्या कवडी किंमतीच्या प्राणांची पर्वा वाटत असेल तर खुशाल जा;—प्राण वांचवा; साऱ्या जगाकडून धिःकारून घ्या !–माझ्या प्रजेवरून ही लक्ष्मी, हा एकच प्राण काय पण शेकडों जन्मींचे प्राण आनंदानं उधळून द्यायला तयार आहे ! जा–

**मोरोपन्तः**—या कवडी किंमतीच्या प्राणांच्या करतां ! अरेरे -चालव–चालव आपली समशेर या निमकहराम मोरोपंतावर–तुझ्या बापावर !–त्याचा प्राण घे–त्याच्या रक्तांत न्हाऊन नीघ; पण बाळे, अविचारी पोरी, स्वतःचे प्राण अविचाराच्या भरांत गमावूं नकोस. लक्ष्मी, अग ही टीचभर झांशी ह्मणजे तुझा देश नव्हे;--आज हिंदूच तुझ्या तरवारीची अपेक्षा करीत नाहीं तर प्रत्येक हिन्दी, स्वतःला हिंदुस्थानचा रहिवाशी असं ह्मणून घेणारा प्रत्येक हिन्दू–मुसलमान तुझ्या तरवारीकडं आशापूर्ण दृष्टीनं पहात आहे !--लक्ष्मी, चालव--आपली तरवार या हृदयावर चालव–त्यांतून उडणाऱ्या भडक कारंजांत चिंब हो आणि मग पुढं पाऊल टाक !--या टीचभर झांशीला वांचवण्याकरतां पितृघात करून साऱ्या देशहिताचा खून पाड—

**आनन्द०:**—[ सिंहद्वारांतून प्रवेशून ]–आई–मला टाकून जाणार—आई—

**लक्ष्मीः**—आई !–देवा–किती भयंकर प्रहार या हृदयावर झाला ! आई--आई--नको--नको बाळ तो शब्द पुन्हां उच्चारूस !–[ तरवार फेंकून देते. ]--तुझा ‘ आई ’ हा प्रत्येक शब्द या हृदयाच्या चिंध्या–चिंध्या उडवून देतो !--काय करूं ? सारं ब्रह्मांड माझ्या आनन्दाच्या सुरानं मला ‘ आई--आई ’ अशा केविलवाण्या हाका मारीत आहे.

**मोरोपन्तः**—मनू–चालव–ती अविचारी तरवार–आधीं तुझ्या आप्तेष्टांच्यावर चालव आणि मग पुढं जा ! ज्या या आनन्दाला ‘ माझा आनन्दा--माझा



# मुंबईत गणेशोत्सवासाठी कडेकोट बंदोबस्त

मुंबई, रविवार (प्रतिनिधी) — मुंबई शहरातील गणेशोत्सव निर्विघ्नपणे पार पडावा, यासाठी मुंबई पोलिस दलातर्फे कडेकोट सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात आली आहे.

गेल्या आठवड्यापासून प्रतिबंधात्मक उपाययोजनेखाली २५० हून अधिक जणांना ताब्यात घेण्यात आले आहे. तसेच १४४ टेनामेंट, दगडी चाळ, कुंभारवाडा, क्रांतीनगर, टेमकर मोहल्ला आदी भागांत पोलिसांनी छापे घातले. शहरातील २५ भाग संवेदनक्षम मानून तेथे बंदोबस्त वाढविण्यात आला आहे.

मुंबई पोलिस दलाच्या मदतीसाठी राज्य राखीव पोलिस दलाच्या ५३ तुकड्या तसेच धडक कृती दलाच्या काही तुकड्या शहरात पाचारण करण्यात आल्या आहेत. जनतेत विश्वासाचे वातावरण निर्माण करण्यासाठी गेल्या शुक्रवारपासून शहरातील विविध भागांत शहर पोलिस आणि राज्य राखीव पोलिस दलातर्फे ध्वजसंचलन करण्यात येत आहे. काल वान्द्रे ते दहिसर परिसरात तर आज चेंबूर ते मुलुंड या भागात ध्वजसंचलन करण्यात आले.

उद्या दक्षिण मुंबईत ध्वजसंचलन करण्यात येणार आहे. त्याचबरोबर प्रत्येक गणेशोत्सव मंडळाचे कार्यकर्ते दिवसरात्र त्यांच्या मंडळाच्या परिसरात लक्ष ठेवणार आहेत.

आनन्दा ' म्हणून त्याचं कोडकौतुक केलंस, त्याला या जगांतून नाहींसा कर आणि मग त्या आगींत उडी घे

आनन्दः—आई, आधीं मला मार–आई–

लक्ष्मीः—आई–आई ! नको–एक शब्द सुद्धां या, तुझ्या आईला ऐकवूं नकोस ! शत्रूच्या गोळ्यांनीं न मरणारी ही लक्ष्मी–बाळ–तुझ्या ' आई ' या एकाच शब्दानं ठार झाली ! शत्रूच्या संगीनींच्या टोंकांना–त्यांच्या तरवारींना बोंथट करून मागं रेटणारी या लक्ष्मीची छाती पार फुटून गेली ! तुझ्या हृदयावर मस्तक ठेवून भवितव्यतेकडं डोळे लावून बसणारी तुझी मानलेली माता, आज तुझ्या शब्दानं मेली !–झांशी–झांशी, या लक्ष्मीला वाटेल तो शाप दे, पण या माझ्या लाडक्या लडिवाळाला लोटून देण्याचं सामर्थ्य या लक्ष्मींत नाहीं आनन्दा–आनन्दा—

[ बेशुद्ध होते. मोरोपंत तिला सांवरून धरतात. सुंदर वारा घालते. आनन्दराव घाबरून उभा राहतो. ]

( ड्रॉप पडतो. )

K. V. Dalar

## तिसरा झंकार समाप्त.

स्वस्तिक वाचनालय,

**राव०:**—काय ? काय बोलतेस मनूताई ? मोरोपंत शत्रूच्या हातीं सांपडले–

**लक्ष्मी:**—नाहीं–माझे बाबा आपण होऊन शत्रूच्या हातीं सांपडले नाहींत तर " शीर कलम झालं तरी वेहेत्तर पण शील कलम होऊं देणार नाहीं "–ही या लक्ष्मीची प्रतिज्ञा, शत्रूला माझ्या जन्मदात्या कडून समजावी ह्मणून एका नराधम–हिंदूनं त्यांना मृत्यूच्या जबड्यांत लोटून दिलं !

**रावसाहेब:**— अरेरे ! काय ऐकतों हें मी ? राक्षसी, हिंदा, तुझ्या पोटची ही असुरी अवलाद केव्हां उलथून जाणार ?

**लक्ष्मी:**—घ्या–साहेब, घ्या ही आपली कुलदेवता–ही पवित्र समशेर ! पेशव्यांच्या दिग्विजयाची ही लक्ष्मी, यापुढं आपल्याच हातीं राहणं इष्ट आहे ! निर्वाणीच्या प्रयत्नांत यापुढं या लक्ष्मीचीं हाडं रणांगणांवर कोणत्या वेळीं पसरलीं जातील याचा नियम नाहीं–माझ्या पश्चात् या दिव्य देवतेचा दुसऱ्याकडून यत्किंचितहि उपमर्द झालेला या लक्ष्मीच्या आत्म्याला पाहवणार नाहीं ! या मराठ्यांच्या या शेवटच्या केशरींत–शेवटच्या क्षणाला–प्रत्येकाचं वैभव पत्येकाच्या जवळच पाहिजे ! घ्या ही तरवार !–या लक्ष्मीची भवितव्यता—

**रावसाहेब:**—तुझी भवितव्यता ? जी साऱ्या आर्यावर्ताची भवितव्यता तीच तुझी–

**लक्ष्मी:**—नाहीं; या लक्ष्मीची भवितव्यता कदाचित् आर्यावर्ताच्या नशिवाळा भलत्याच रीतीनें रंगवील !--रावसाहेब, ही लक्ष्मी मरून पडेल पण आर्यांचं वैभव स्वातंत्र्य कायम राहील-असा आत्मविश्वास या हृदयांत आतां जागृत झाला आहे या लक्ष्मीच्या मरणानं जर या हिंदुस्थानचं मरण थांबलं नाहीं तर माझ्या मागं या तरवारीला पुढचा मार्ग विचारा ! आणि पुढं पाऊल टाका ! तुह्मालाहि दुर्दैवानं अपयश आलं तर तुमच्या हातीं देत असलेला हा या जिवाचा जीव, झांशीचा हा बालसूर्य आपल्या पावलावर पाऊल टाकील ! त्याच्या मागून हिंदमातेचे तेजस्वी पुत्र याचं अनुकरण करतील;–अशी ही स्वातंत्र्याची प्रतिज्ञा परंपरेनं या हिंदुस्थानांत झाली पाहिजे–ह्मणजे एक दिवस असा खात्रीनं उगवेल कीं त्यावेळीं स्वातंत्र्यसूर्य या हिंदुस्थानांत तळपल्या शिवाय खात्रीनं राहणार नाहीं !–करा हात पुढं; ही समशेर आणि हा बालयुवराज यांना हातीं धरायला–आपल्याशिवाय। दुसरा कोण योग्य असणार ?

**रावसाहेबः**—तूं;–देवि तुझ्या सारखी विक्रम–देवता या आर्यावर्तांत संचार करीत असतांना. ही सेनानींची समशेर जर दुसऱ्या कोणाच्या हातीं गेली तर या पवित्र वस्तूचा अपमान केल्यासारखं होईल! या लक्ष्मीच्या रूपानं प्रकट झालेल्या या भारतीय राज—लक्ष्मीचं हें भूषण तिच्याच हातीं पाहिजे! या देवतेच्या पंथां तिची प्रतिज्ञा परंपरेनं चालवून जिवाचं मोल देऊन या अमोल वस्तूचं रक्षण करणं हीच आमची योग्यता! तुझी कर्तबगारी जगाच्या इतिहासांत तुझं नांव रक्ताक्षरांनीं खात्रीनं लिहून ठेवणार!—मंगले, साऱ्या आर्यावर्ताच्या तर्फेनं, ही सेनानींची समशेर मी तुझ्या हातीं देतो;—तिचा अनादर करूं नकोस—

**लक्ष्मीः**—श्रीमंत या देवतेचा अनादर करण्याची पापी बुद्धि मला कधींच न होवो!—( तरवार घेते )—पण श्रीमंत, माझी एक इच्छा पूर्ण करा—मृत्यूशीं टक्कर देण्यापूर्वी, माझ्या तळमळणाऱ्या जिवाच्या समाधानाकरितां मला एक वचन द्या! माझ्या पश्चात् या माझ्या लाडक्याचं रक्षण–

**रावसाहेबः**—हा बाळ आतां तुझा नाहीं तर तो या हिंदुस्थानाचा आहे एवढं वचन–

**लक्ष्मीः**—मला अगदीं पुरेसं आहे–

**रावसाहेबः**—तर मग आतां पुढच्या उद्योगाला लागायला कांहींच हरकत नाहीं. आतां या बाजुला राहणं मुळींच सुरक्षित पणाचं नाहीं. शत्रु आपल्या भोंवतीं सारखा नाचत आहे, अशा वेळीं जर आपण ग्वालेरकडं–

**लक्ष्मीः**—माझाहि तोच विचार होता. शिंदे आपल्याला मिळाले तर ठीकच–

**रावसाहेबः**—नाहीं तर ?

**लक्ष्मीः**—तरवारीच्या जोरावर त्यांना नमवूं!

**रावसाहेबः**—शाबास ! अशी तडफ असल्यावर आपलं दैव आपल्यापुढं हात जोडून कां उभं राहणार नाहीं ? बहूतेक तरवार उपसण्याची पाळी आपल्यावर येणार नाहींच. तात्या टोपीनं आपलं वजन शिंद्याच्या रिसाल्यावर बरंच बसवलं आहे–

**लक्ष्मीः**—तर मग–हाच बेत कायम–

**रावसाहेबः**—त्याच उद्योगाला आतां लागलं पाहिजे ! [ जातात ]

**पडदा उघडतो.**

K. A. Dalal

# लहरी दुसरी.

[ स्थळः—झांशी फाशीचा देखावा. सुंदरलालला कैद केलें आहे असा प्रवेश ]

सुंदरलालः—थांबा, थांबा ! हा देशाभिमानी वीर देशाकरतां कैदखान्यांत सांपडला आहे ! त्याचा जयजयकार करा ! अरे कोणींच का माझा जयजयकार करीत नाहीं ? कृतघ्न—सारे बेट्याचे कृतघ्न—

हेस्टीः—फूल ! व्हॉट नॉन् सेन्स ! टूम गिल्ला क्या करटे ?

सुंदरः—( स्वगत ) या वाकड्या तिकड्या भाषेच्या कड्याकपरीतून मी वांचणार का ? [ प्रकाश ] नाहीं साहेब, मी आपल्याला शरण आहे ! मी आपल्याला नुकतीच किल्ला पाडण्यांत मदत केली—पाण्यात वीष मिसळवलं—किल्यांतल्या दारुगोळ्याला आग लावली ह्मणून माझ्यावर दयाळू इंग्रजसरकारानीं दया करावी—मला क्षमा करावी—

हेस्टीः—क्षमा ! क्वाईट ॲवसर्ड ! क्षमा मिलनं शक्य नॉय—टरी पन टूं आमाला मडट केली मनटो, टेवा टूज्या केशचा इचार आमी करूं—

सुंदरः—तर मग हाय हाय ! देवा, धांव रे धांव ! द्रौपदीच तुला काय देत होती ? तिच्या हांकेबरोबर धांवून जायला तिनंच असं कोणतं पुण्य केलं होतं ? अरेरे, परमेश्वरा मला कां रे द्रौपदी केलं नाहींस ! -( प्रकाश ) साहेब, क्षमा करा ! मी हिंदु झालों ह्मणून तोंडांत मारून घेतों ! लहानपणीं रांगून गुडघ्याला घट्टे पडले तरी पण पुन्हः पाहिजे तर रांगून दाखवितों; पण दया करा! मी आपल्याला शरण—

मोरोपन्तः—[ पडद्यांतून ] सुंदरलाल—सुंदरलाल—

सुंदरः—कोण ? मामासाहेब ? झाला ब्रह्मघोटाळा—

[ रक्तानं न्हालेला मोरोपंतास पकडून श्यामराज वगैरे प्रवेश करतात. ]

मोरोपंतः—सुंदरलाल—काय करीत होतास ?

सुंदरः—[ बाजूस ] माझं कपाळ—

हेस्टी—कोन बंडखोर मोरोपंट? कशा शांपडला ?

**श्यामराजः**—मी या चोराला पकडला आणि सरकार कदमाशीं हजर केला ! बक्षीस—

**मोरोपन्तः**—बक्षीस ! पाजी निर्लज्जा, स्वतःचं पोटच जाळायचं होतं तर या अवाढव्य हिंदुस्थानांतल्या तेहतीस कोट प्राणांच्या तोंडचं एक एक शीत मिळून अन्नाचा पर्वत तुझ्यापुढं पडला असता ! तुझ्या त्या राक्षसी किडून, कुजून गेलेल्या मनाला दिपवून सोडणारी संपत्तीच तुला पाहिजे होती तर हिमालयापासून तें कन्याकुमारीपर्यंत आपल्या भिकार भाग्याची चोपदारी करून भीक कां मागितली नाहींस ? या कंगाल हिंदुस्थानानं कवडी कवडी करून, संपत्तीच्या राशीवर तुला बसवलं असतं !–पण असल्या पापानं, कोणत्या पुण्याईचे डोंगर तू उभारलेस ? तुझ्या सारख्या पाप्यांचीं आंतडीं जिवंतपणीं तोडून काढायला रौरवांतली गिधाडं तुझ्यावर सोडली पाहिजेत ! देशबांधवांचा विश्वासघात करणारं तें बदमाष अंतः-करण अस्मानच्या विजलीनं एकदम फोडून त्याच्या चिंध्या उडवल्या पाहिजेत ! बोल, कोणत्या अधम वृत्तिनं तुला इतकं बदफैली, खुनी, मात्रागमनी बनवलं ? राष्ट्रमातेच्या निरीला हात घालणाऱ्या सैताना, बोल–कोणत्या नरकाच्या आशेनं तुला नरकवासना झाली ? या मोरोपंताच्या रक्तालाच तूं इतका हापापला होतास तर त्याला हा मार्ग कशाला पाहिजे होता ? तुझ्या हातीं जी मी विश्वासानं मान दिली ती ही मान आपल्या दगाबाज हातांनीं मुरगळून माझ्या रक्ताच्या फवाऱ्यांत तूं का चिंब झाला नाहींस ?

**हेस्टीः**—आटा टोच फवारा आमी फोरूं-

**मोरोपंतः**—त्या फवाऱ्यांत फिरणाऱ्या प्रत्येक रक्त–बिंदूंत या मोरोपंताची संतापानं पेटलेली ही क्रूर मूर्ति दिसेल ! हा एक मोरोपंत या ठिकाणीं मरून पडेल पण माझा हेतू सिद्धीस नेण्याकरतां,-या हिंदू पिशाच्याच्या कृष्णकृत्याचा डंका आलम् दुनियेंत गाजवण्याकरतां माझ्या रक्ताचा प्रत्येक थेंब देहधारणा करील ! त्या मायावी मोरोपंतानीं फोडलेला टाहो–हिमालयाच्या दरींत दडून बसलेल्या महात्म्यांच्या आत्म्याला–हिंदूंच्या अधःपाताची हकीकत सांगेल आणि गर्भवासांत असणाऱ्या भावि पिढीचे चिमुकले जीव क्रोधानें बेफाम करून सोडील !

**हेस्टीः**—चूप—खुनी—

**मोरोपन्तः**—काय ?–खुनी ?

**श्यामराजः**—हो हो—खुनी !

**मोरोपन्तः**—खुनी—खुनी—अरेरे खुनी !—ऐका—जगांतल्या जितांच्या मेलेल्या अंत:करणांनो,—गर्विष्ठांचे गुलाम होऊन गुलामगिरींत खितपत पडलेल्या जिवंत प्रेतांनों ऐका—हा न्यायाला न्यायानं दडपून टाकण्याचा न्याय ऐका ! दीन दुबळ्यांचीं घरं जाळून—त्यांच्या बायकांची गरीब अब्रू घेणारे खुनी नसतात; दीन हृदयांनं हृदयाआड दडवलेल्या दीडवीत पोरांच्या रक्तानं रंगून गेलेले हात खुनी नसतात ! पतिपत्नींनं आयुष्याच्या शेवटच्या क्षणाला, एकमेकाला करपाशांत बांधून, मिटल्या डोळ्यांतलं प्रेम उघडल्या तोंडांत आणून प्रेमाच्या ऋणांतून एकमेक मुक्त होत असतांना, त्यांच्या देहांच्या चिंध्या उडवणारे खुनी नसतात !

**हेस्टीः**—चूप ! शट अप ! राजद्रोही—खुनी—

**मोरोपंतः**—कोण खुनी ! निष्पाप रक्तानं कुणाचे हात माखले आहेत ? या मोरोपंताचे ! नाहीं—हें पहा—हें रक्त अद्याप काळवंडलं नाहीं, यांत खुनाची कालिमा कुणालाच काय पण प्रत्यक्ष खुन्याला सुद्धां दिसणार नाहीं ! ही पहा, ही पहा—ही तोंडं उघडं ठेऊन बुलबुल बोलणारी या मोरोपंताची ताजी जखम, ' खुनी कोण ' याचा पुरावा देत आहे ! खुनाची कालिमा—घालवण्याकरतां या लाल रक्ताची पिचकारी कुणाकडं उडते ? बोला, कुणाकडं ?

**हेस्टीः**—चलो—अढीक बोलू नको ! शीपॉय, या बडमाश राजद्रोह्याला फाशीवर चडवा ! मोरोपंट, टूमी शरकार विरूड बंड—

**मोरोपंतः**—नाहीं, हें सरकार विरुद्ध बंड नाहीं; तर हातीं आलेल्या अल्पशा सत्तेच्या जोरावर वाटेल तसा धुडकूस घालणाऱ्या अधिकाऱ्यांवर,—सम्राट्सत्तेच्या तेजोमय सूर्याला खग्रास—ग्रहण लावणाऱ्या या पापी केतूवर ही मोहीम होती !

**हेस्टीः**—टें कॉय नॉय् ! टूमी बंड करून राजड्रोह केला हाय ! टेवा अशा गूना पूना होऊ नॉय ह्मणून आमच्या न्यायापरमानं टूमाला मरेपर्यंत फाशीची शिक्षा देण्यांत येत हाय—

**सुंदर०ः**—हाय हाय—

**मोरोपंतः**—[ शिपाई ओढीत असतां ] सुंदरलाल, ऐक, ही शिक्षा ऐक ! आणि यदाकदाचित् तूं सुटलास तर माझ्या मनूला—लाडक्या छबेलीला सांग



**मोरोपन्त०**:— ऐका— जगांतल्या जितांच्या मेलेल्या अंतःकरणांनो—ऐका ! [ पृष्ठ ८० ]

कीं मोरोपंत तांव्यांचा खून न्यायानं केला ! मी फाशी गेल्यानंतर, तोंडाबाहेर पडणाऱ्या माझ्या दीड हात जिभेचा—माझ्या देशबंधूना टाहो फोडून निरोप सांग, कीं मोरोपंत तांव्याचं मस्तक झांशीच्या वाड्यासमोर भर दोनप्रहरीं न्यायाच्या अन्यायी फासावर लटकलं गेलं !—माझ्याकरतां दुःखाचा एक अश्रूहि न ढाळतां याचा नीट विचार करा !—माझ्या मनूला आणि आनंदाला माझा आशीर्वाद सांग—

**हेस्टी**:—चलो—

**मोरोपंत**:—हा चाललों ! [ फाशीजवळ जाऊन ]—साहेब, या मृत्यूचं, असल्या दिव्य मृत्यूचं भय कर्मनिष्ठ हृदयाला कधींच वाटत नाहीं समजलांत ? पुण्यश्लोकांच्या पतन पावलेल्या पुण्यपावन मस्तकांच्या फुलांचा रक्तवर्ण गालीचा तुडवीत, आपल्या देशापायीं वधस्तंभाकडं जाण्याचं भाग्य फारच थोड्यांच्या नशिबीं असतं ! हा पहा, माझा उद्धार करण्याकरतां मूर्तिमंत स्वर्गलोक या ठिकाणीं अवतरला आहे ! रात्रीच्या वेळीं आकाशांत चमकणारे दिव्य तारे, या मेलेल्या महाभागांच्या डोळीच्या कोंदणांत प्रकट झाले आहेत ! स्वर्गांच्या आवारांत नाचणारी विद्युल्लता, या वीरांच्या समशेरींत चमकूं लागली आहे आणि स्वर्गाला स्वर्गत्व देणारी भगवान् भास्कराची तेजोमय रश्मिा, या वीरांच्या रक्तानं रंगली आहे ! बोला, हा स्वर्ग नाहीं का ? हें भाग्य सर्वांच्या वाट्याला येईल का ? नाहीं, कधींहि नाहीं ! पवित्रमनांना हीं देखावा स्वर्गांच्या संसारासारखा वाटेल, पण अनीतीच्या पायघडीवरून हरघडी पावलं टाकणाऱ्या पाप्यांना, नरकाचं नाचतं चित्र यांत दिसेल ! चला; हा—मोरोपंत आपखुशीनं फाशीवर जायला तयार आहे! माझ्या लाडक्या जगजीवन देशा, या जन्मीं नाहीं पण स्वर्गांतून तरी स्वातंत्र्याचा दिव्य मुकुट तुझ्या मस्तकावर झळकलेला मला दिसूं दे !

**हेस्टी**:—चढवा टेला—

**मोरोपंत**:—[ फाशीवरून ] आज हा मोरोपंत फाशीला जात नाहीं तर हिंदुस्थानचा न्याय माझ्या रूपानं फासावर जात आहे !

**हेस्टी**:—हेल् ब्रिटानिया !

[ पडदा पडतो. ]

---

# लहरी तिसरी

[ स्थळ ग्वालेर लक्ष्मीबाई व रघुनाथराव प्रवेश करतात. ]

**लक्ष्मीः**—काय ह्मटलंत रामचंद्रराव, श्रीमंतांनीं आज दरबार भरवला आहे ?

**रामचंद्रः**—दुर्दैवानं ही बातमी खरी आहे ! बाईसाहेब, शिंद्याचा मोड होऊन, त्यांनीं पळ काढला तो आपल्या तरवारीमुळं आणि आपल्यांकडे रावसाहेब आतां पहात सुद्धां नाहींत—

**लक्ष्मीः**—देशमूख, याचा अर्थ—श्रीमंत कृतघ्न—असा मात्र नाहीं ! त्यांच्या उतावळ्या स्वाभावामुळं, त्यांच्या हातून असे प्रमाद होतात ! कांहीं असलं तरी त्यांच्या हातून होत आहे ही गोष्ट या प्रसंगी तरी अगदीं अयोग्य आहे ! शत्रूनं गांवाला वेढा दिला, असं असतां—श्रीमंतानीं स्वस्थ रहावं ह्मणजे मूर्खपणाची कमाल करण्यासारखं आहे ! जा, रामचंद्रराव माझा घोडा तयार ठेवायला सांगा; श्रीमंतांना यावेळीं जागं करणं माझं कर्तव्य आहे, असं मी समजतें—जा—

[ रामचंद्रराव एकाबाजूनें जातो—लक्ष्मी दुसऱ्या बाजूनें जाऊं लागते इतक्यांत आनंदराव येतो. ]

**आनंद०:**—आई—

**लक्ष्मीः**—आई !—ही या तान्हुल्याची शेवटचीच हाक काय ? माझ्या या अभागी कानांना, या लडिवाळाच्या " आई " अशा हृदयांतून मारलेल्या हाका किती दिवस ऐकायला मिळणार ? आनंदा—मार अशाच " आई " ह्मणून हांका मार ! या तुझ्या आईच्या चिंध्या उडेपर्यंत—तिच्या जिवाचे परिमाणु दाहीदिशांत मिसळून जाईपर्यंत— " आई—आई " असा शब्द माझ्या कानावर पडूं दे !

**आनंद०:**—आई—आई—

**लक्ष्मीः**—ऐका—माझ्या कानांनो—हा मोहक स्वर तुमच्या श्रवण शक्तींत सारखा घुमूं द्या ! डोळ्यांनो—पहा, या माझ्या छकुल्याच्या उघड्या तोंडाकडं सारखी टक लावा, आणि " आई " अशी हाक मारतांना फुलून दिसणारं

याचं सुख मंडल आपल्या दृष्टिपटावर कोरून ठेवा; ह्मणजे डोळ्यांतली तेज-ज्योत मावळल्यानंतर सुद्धां याची मनमोहन मूर्ति तुमच्यांत कायम राहील! देवानं मला जन्माला तरी कशाला घातलं? तुझ्या "आई" अशा केविलवाण्या हाका ऐकायलाच का?

**आनंद**:—आई, तूं रडतेस कां?—मागं तूं रडत नवतीस—

**लक्ष्मी**:—रडतेस का? मागं मी रडत नवते आणि आतांच या लक्ष्मीनं कां रडावं? देवानं रडवलं—दैवानंही रडवलं, ह्मणून बाळ! वीरांच्या आत्मिक तेजाला परिस्थितीची गुलामगिरी सहन होत नाहीं—पण प्रेमाचं दास्य त्याला करावंच लागतं—ह्मणून बाळ!

**आनंद**:—आई, आपले मामा आले नाहींत म्हणून का तूं रडतेस?

**लक्ष्मी**:—तुझे मामा, बाळ—या लक्ष्मीचे बाबा—जिथून गेलेला मनुष्य फिरून कधींच येत नाहीं अशा दिव्य लोकांत गेले असतील! त्यांच्या करतां मी कशाला रडूं?

**आनंद**:—मग कुणाकरतां रडतेस?

**लक्ष्मी**:—तुझ्याकरतां! माझ्या प्रेमाच्या या ठेव्याकरतां! माझ्या मागं तुझं काय होईल!

**आनंद**:—पण तूं नेहमीं नाहीं का सांगत होतीस कीं आपल्या रामानं सुद्धां सीतेसह लक्ष्मणाबरोबर रानांत दिवस काढले—

**लक्ष्मी**:—हो—काढले! पण प्रेमाचा पुतळा लक्ष्मण आज लाखांत तरी तुला मिळेल का? देहाची वेली आणि प्राणांची फुलं करून त्यावर श्रीरामचंद्राला झेलून धरणारी साध्वी सीता अजून तुला लाभली नाहीं! पण छेः—त्या सीता देवीचीच माता, ही जगन्माता भूमी तुझं रक्षण करायला तयार असतांना तुला कुणाचीच जरूरी नाहीं! माते राष्ट्रभूमी, तुझ्या पोटीं आलेल्या हजारो जिवांकरतां या डोळ्यांत अश्रु न येतां मनुष्य स्वभावाला अनुसरून माझ्या या आनंदाकरतां अश्रु ढाळण्याचा स्वार्थ साधला, पण त्या स्वार्थबुद्धीची मला क्षमा कर! कारण माझ्या बाळाकरतां माझे अश्रु पण तुझ्या संतानाकरतां माझे रक्ताचे थेंब आहेत!—जा बाळ घोडा तयार आहे का पहा!

आनंदः—आत्तां पोहून येतों—पण तूं रडूं नकोस—

लक्ष्मी—नाहीं–मुळींच नाहीं! [आनंदराव जातो]–या हंसऱ्या बाल–जिवाची जाणीव किती निर्विकार आहे! माझ्या डोळ्यांत अश्रु आले कीं याच्याहि डोळ्यांत अश्रूनं उभं रहावं! माझं तोंड हंसरं–मग तें बळेंच का होईना–पण हंसरं दिसलं कीं याच्या तोंडच्या गुलाबानंही हंसू लागावं! आणि असलं–पाडस–असलं काळजाच्या कोंदणांत ठेवायचं रत्न, या पसाऱ्याच्या जगाच्या अडगळींत टाकून जायचं! रडूं नको–रडूं नको–बाळ रडूं नको तर काय करूं? ते तुझे छकुले हात, या तुझ्या मातेच्या हातून कायमचे सुटत असतांना, ते तुझे हंसरे विशाल डोळे, या अभागी डोळ्यांआड होत असतांना, परलोकच्या पायरीवर पाय देऊन उभी असणाऱ्या या तुझ्या लक्ष्मीच्या डोळ्यांत जिव्हाळ्याच्या जलानं जर चमक मारली तर त्यांत काय आश्चर्य! या कर्तव्याचा उज्ज्वल मार्ग जर माझ्या पुढं नसता तर तुझी आई ह्मणून घेणाऱ्या या तुझ्या मातेनं, तुझ्या वरून सारं ब्रह्मांड ओंवाळून टाकलं असतं! माझ्या जिवाच्या कलिजा–या कौसल्येच्या कर्महीन कुमारा, तुझ्यावरून ओंवाळणी, माझ्या वात्सल्यप्रेमाच्या शेवटच्या कुरवंडीची खूण, ह्मणून ही मोत्यांची माळ, मी तुझ्या गळ्यांत घालतें–हीच तुझं रक्षण करील—

[ इतक्यांत आनंदराव येतो. त्याच्या गळ्यांत लक्ष्मी मौक्तिक–माला घालते ]

आनंदः—आई, घोडा तयार आहे–पण हें काय?

लक्ष्मीः—हें? हें कांहीं तरी! चल–मी, वाड्यांत जाऊन येते; तोंपर्यंत तूं आपल्या मुंदरशीं खेळ—

[ जातात. ]

पडदा उघडतो

स्वस्तिक वाचनालय, नौपाडा - ठाणे.

## लहरी चौथी.

( स्थळः—ग्वालेर. कामिनी डोळ्यावर बांधण्याकरितां पडदा घेऊन येते. )

कामिनीः—माझ्या लाला, मला फसवून कुठे हो गेलांत? तुह्मी गेल्यापासून दुसऱ्या पुरुषांकडे फारसा पाहण्याचा प्रसंग येऊं नये ह्मणून पुरुष दिसताच डोळ्यावर असा पडदा सुद्धां हो घेतें! आतां मी तुमच्या विरहानें मरून गेलें ह्मणजे मग कुणाशीं लग्न लावूं? लाला—याना! झांशी पडली त्यावेळीं तुह्मी पळालात ते अजून कसे हो येत नाहींत?–[ लांबून शिपायाच्या वेषांत सुंदरलाल येतांना पाहून ] अगबाई, तो पहा मेला कुणी धटिंगण येत आहे! सुंदरलाल, देवाला स्मरून मी आतां परपुरुषाला आंधळी झाली आहें!

( डोळ्यावरून पडदा घेते इतक्यांत सुंदरलाल—खालीं पहात शिपायाच्या पोषाखांत घाईनें प्रवेशतो ) त्याचा धक्का कामिनीस लागतो.

कामिनीः—अग आईग—कोण रे मेल्या तूं! डोळे फुटले का?

सुंदरः—( एकदम डोळे झांकून )—अरेच्या, ही काय पिडा! ही सुंदर वाटतं (प्रकाश) चुकलों—माफ करा—मी एक आंधळा आहें—

कामिनीः—आंधळा? मेल्या, माझ्या डोळ्यावर जर हा पडदा नसता तर तुला ओळखून, तुझी चामडीच लोळवली असती—

सुंदर०ः—[ स्वगत ] आमचा तोफखानाच हा! त्याच्या शिवाय इतका झपाटा नाहीं यायचा!–[ प्रकाश ]–काय, तुह्माला पण दिसत नाहीं? पण बाई, मला 'आंधळा व्हायला जसं कांहीं कारण आहे तसं तुमच्या आंधळेपणाला आहे का?

कामिनीः—तुमच्या आंधळेपणाला कारण आहे? कोणतं तें?

सुंदर०ः—मी एका काळतोंडीला भीत आहे! ती या देवडीवर दिसेल ह्मणून मी आंधळा झालों आहे.

मोहून मला पाप लागेल हों ! तुम्हीं एकादे फटिंग असाल–

सुंदर:—पण अहो बाई, मी जर एकादा फटिंग असतों तर बायको पायीं ळा का झालों असतो ?

कामिनी:—काय ? बायकोपायीं आंधळे ? म्हणजे या कामिनीचे लालच !

सुंदर०:—कोण ? कामिनी ? पण मला नाहीं हें खरं वाटत ? या ीवर, बाईसाहेब मंदर शिवाय दुसरी कोणती मुलुख–मैदान ठेवणार ! तिचं पाहण्यापेक्षां जन्मभर आंधळं राहणं मला पुरवलं !

कामिनी:—अहो, खरंच मी कामिनी आहें.

सुंदर०:—कशावरून ? देवीची शपथ घेतेस ? माझी भोळी कामिनी देवीला भिते—

कामिनी:—देवीशपथ मी कामिनी आहे ! पण तुह्मी सुंदरलालच ना ? मला नाहीं आणि तुह्मी पहात नाहीं ! आतां काय करूं ? उघडूं का डोळे ? नाहीं–प्रथम तुम्हीच उघडा–

सुंदर०:—मी नाहीं उघडणार; प्रथम तूंच उघड. पण असं कशाला ? आपण हे एकदमच डोळे उघडूं या ! म्हणजे कुणाकडंच दोष येणार नाहीं !– गत ] परमेश्वरा, ही जर मुंदर असेल–तर दारूच्या भडक्यानं नाहींतर ,पण माझ्या डोळ्यांत साठलेल्या तेजानं हिची रक्षा होवो–[ प्रकाश ]–हं– कदम डोळे उघडतात ]–खरंच, माझी कामिनीच तूं–

कामिनी:—अगबाई, सुंदरलालच तुम्ही–

सुंदर०:—पण त्या राक्षसणीच्या ऐवजीं तूं कशी इथं ?

कामिनी:—बाईसाहेबांनीं माझी नेमणूक देवडीवर केली आणि तिला खास तींत घेतलं आहे ! पण तुम्ही कसे आलास–

**सुंदर०:**—तें कुठं बोलायचं नाहीं ! पाण्यांत तूं पूड मिसळलीस तिच्या पुण्य-प्रभावानं मी इथं आलों !

**कामिनी:**—खरं का हें ?

**सुंदर०:**—खरं म्हणजे ? ज्यानं मला पूड दिली होती त्या साहेबाच्या प्रेमळपणामुळं मी इंग्रजांच्या तावडींतून सुटलों ! तूं पाण्यांत पूड मिसळलीस; सुंदरला मारण्याकरतां मी कोठाराला आग-लावली, पण याच्यामुळं फायदा झाला त्या इंग्रजांचा ! झांशी पडतांच बाईसाहेबांना किल्ला सोडावा लागला—

**कामिनी:**—पण ग्वालेरच्या वेशींतनं कसे आंत आलात ?

**सुंदर०:**—माझ्या ओळखीचे बाईसाहेबांचे कांहीं लोक वेशीवर होते; मामासाहेब फाशीला गेल्याची बातमी बाईसाहेबांना सांगायची आहे—असं म्हणतांच त्यांनीं माझा झाडा घेऊन मला आंत सोडून दिलं—

**कामिनी:**—काय ? मामासाहेब फाशीला गेले ? अरे देवारे—

**सुंदर०:**—खरोखर, काय तो भयंकर देखावा ? अंगावर अजून सुद्धां शहारे येतात—

**कामिनी:**—पण हा शिपाई थाट ?

**सुंदर०:**—तें सारं तुला मग सांगेन ! आधीं बाईसाहेबांना मामासाहेबांचा निरोप कळवूं दे—

**कामिनी:**—त्या आत्तांच रावसाहेबांच्याकडं वाड्यांत गेल्यात; त्या येईपर्यंत तुमची सारी हकीकत—त्या तिथं बसून मला सांगा—चला—

**सुंदर०:**—चल— [ जातात. पडदा उघडतो. ]

---

## लहरी पांचवी.

[ **स्थळ:—ग्वालेर. राजदरबार. रावसाहेब, सरदार वगैरे.** ]

**रावसाहेब:**—वीरहो, आजचा समारंभ मला राज्याभिषेक करण्याकरतां नाहीं; पेशव्यांच्या गेलेल्या सत्तेच्या पुनर्जीवनाकरतांहि नाहीं, तर मोडलेल्या

मराठेशाहीचा यशोध्वज, आपला भगवा झेंडा पुन्हां विजयी मुखानं नाचूं लागला ह्मणून आहे ! आज या हिंदुस्थानच्या स्वराज्यमंदिराचा कळस उचलला गेला असं जाहीर करण्याकरितां आजचा समारंभ आहे ! आजपर्यंत या भरतभूमींत अनेकांचीं अनेक सम्राट्‌सिंहासनं निर्माण झालीं आणि कालाच्या धडकीनं भूगर्भांत गाडलीं गेलीं ! पण मराठ्यांचं नांव जगाच्या इतिहासांत अजरामर होणार असा विधिसंकेत दिसतो. लक्ष्मीबाईच्या तरवारीच्या जोरावर हें ग्वालेर आपल्या हातीं आलं, शिवासारख्या रणमर्दाला पळतां भुई थोडी झाली हें कशाचं लक्षण ? श्रीशिवाजीमहाराजांचा अशा वेळीं जयजयकार झालाच पाहिजे ! इतक्या उच्च स्वरांत जयजयकार करा कीं हिमालयाच्या अत्युच्च शिखरावर, अवतारसमाप्तीनंतर शंकराच्या रूपानं निद्रासुख अनुभवीत असणारे आपले शिवाजी महाराज खडबडून जागे होतील ! आणि आपल्या स्वतंत्र भगव्या झेंड्याकडे दृष्टि फेंकून आनंदानं हंसू लागतील !

**सर्वः**—श्री शिवाजी महाराजकी जय !—[ लक्ष्मी प्रवेश करते. ]

**लक्ष्मीः**—थांबा, पुन्हां जयजयकार करूं नका !—रावसाहेब,—काय? आपण सिंहासनावर ? शिवाजीमहाराजांचा जयजयकार करण्याचा आपल्याला काय अधिकार ? शिवाजीमहाराजांचं मंगळ नांव आपल्या सारख्या दिवाणा झालेल्या वैभव-लोलुप रावसाहेबांकरतां नाहीं; रावसाहेब, ही लक्ष्मी—आपली सेनानी ही लक्ष्मी—आज बेमुर्वतीनं आपल्याला बोलत आहे ! तो समर्थांचा भगवा झेंडा आपल्यासारख्या उतावळ्यापुढं मान डोलावण्याकरतां नाहीं ! आज तुह्मी राष्ट्र-देवतेचे अपराधी आहात ! शत्रु दारापुढें उभा असतांना, या वैभवाच्या नादीं लागून, या समारंभांत दंग होणाऱ्या रावसाहेबांचं तेज, स्वातंत्र्याकरतां उसळणाऱ्या रावसाहेबांच्य पूर्वीच्या ऊर्मी, आज मरून पडल्या काय ? "भगवा झेंडा, भगवा झेंडा"—असं घसा कोरडा करून ओरडणाऱ्यांना, त्या भगव्या झेंड्याची योग्यता, त्याचं मर्म काय आहे याची जाणीव आहे का ? हा सुवर्ण रेखांकित भगवा झेंडा ह्मणजे खऱ्या राजकर्त्याला पावलागणीत सांवरून धरणारी समर्थांची सामर्थ्यपूर्ण पुण्य—पताका आहे ! राजाचं राज—वैभव आणि फकीराची संन्यास—वृत्ति याच भगव्या झेंड्यांत गोंवली आहे ! रावसाहेब, राजमार्गी—संन्यासी--फकीराच्या मेलेल्या आशांच्या पण उच्च ध्येयाच्या भगभगीत भगव्या

पायघडीवरून गेलेला असतो ! राजानं, एका हातांत राजदंड—आणि दुसऱ्या हातांत फकीराची कफनी घेतली तर तो त्या भगव्या झेंड्याचं, जगाला दिसणाऱ्या त्या भगव्या फडक्याचं नामोच्चारण करायला योग्य आहे ! उतावीळ आल्या, हातांतला राजदंड गळून पडतांच, मस्तकावर शत्रूसत्तेची ठोकर बसून सिंहासनावरून अधःपात होतांच, आत्मतेजाच्या जोरावर, फकीराच्या स्वातंत्र्यमय स्वयंतेजावर,—गेलेली राज--लक्ष्मी--परत फिरवण्याकरितां, राजानं आपल्या फकीरी छाटीचाच अंगीकार केला पाहिजे ! राष्ट्राला, पारतंत्र्यामुळं येणाऱ्या कंगाल--स्थितींत स्वतःला मिसळून घेऊन--संन्यासी राष्ट्रांतली लुप्त ईशस्वरूप तेजस्विता, आपल्या फकिरी वागीश्वरीनं जागी केली पाहिजे ! क्षणांत राजा तर क्षणांत एक फकीर--संन्यासी म्हणून वागायला ज्याची तयारी असेल, त्यालाच समर्थांच्या भगव्या झेंड्याचा आणि--शिवाजी महाराजांचा जयजयकार हक्कानं करण्याचा अधिकार आहे--समजलांत ?

राव०:—देवी--

लक्ष्मी:—नाहीं, मी देवी नाहीं; राष्ट्रदेवीला विसरणाऱ्या--

राव०—मी राष्ट्रदेवीला विसरलों नाहीं ! राष्ट्रदेवीची जागती ज्योत, तुझ्या रूपानं, या रावसाहेबापुढं सारखी तेवत असतांना, मी माझ्या राष्ट्रदेवीला कसा विसरेन ? पण माझं ऐकून--

लक्ष्मी:—काय ऐकून घेऊं ? माझ्या डोळ्यांनीं आपल्याला या शिंद्यांच्या सिंहासनावर प्रत्यक्ष पाहिलं असतांना, आपण आपली तरफदारी कशी करणार ? ही लक्ष्मी--आपली सेनानी आज तीन दिवस कुठं आहे, याचा आपण तपास केलात काय ? आपण काय सांगणार ? रावसाहेब, बोला—आपल्या विजयाला आपल्या राजपदाला सिंहासनाची जरूरी होती काय ? आपल्या मस्तकावर मुकुट म्हणून तो शोधून काढण्याकरतां, शिंद्यांचे जवाहीरखाने पालथे घालण्यांत आपण गुंतला होता काय ? फाटक्या भगव्या झेंड्याला, ठिगळ देण्याकरतां या राजवाड्यांतला कोणता पीतांबर भगवा करूं, असा विचार डोक्यांत आल्यांमुळं आपण स्वस्थ राहिलांत काय ? असल्या दिखाऊ दिमाखावर अवलंबून राहणारी, श्रीसमर्थांचा कृपाप्रसाद मिळालेली ही गादी नाहीं ! विश्वव्यापी ध्येयाच्य वैभवानं नटलेल्या त्या समर्थांच्या गादीवरून, असलीं सोनेरीं सिंहा-

सनं लाखानं उधळून द्यावीं लागतील ! स्वातंत्र्याचा मुकुट राष्ट्रांतील व्यक्ति-व्यक्तीच्या मस्तकावर तळपूं लागल्यामुळं प्रत्येक जण राजा झाल्यावर, त्याच्या तोंडावर चमकणाऱ्या तेजापुढं, त्या रत्नमय मुकुटांतलीं रत्नं फिकीं पडतील !-

**रावसाहेबः**—लक्ष्मी, लक्ष्मी, किती कठोर प्रहार तूं माझ्यावर करणार ? मी मेलों—ठार झालों ! क्षमा कर; एका क्षणापूर्वीचा रावसाहेब निराळा होता, आणि या क्षणाचा रावसाहेब निराळा आहे ! ताई—ताई क्षमा कर ! तुझा-गैरसमज झाला असो किंवा या रावसाहेबाचा मार्ग चुकलेला असो, पण तुझ्या कठोर उपदेशानं माझ्या हृदयाचे तुकडे उडाले आहेत.

**लक्ष्मीः**—रावसाहेब, माझा गैरसमज ? नाहीं;-आपलीच दिशाभूल झालेली आहे ! रावसाहेब, शिवाजीराजानं एकाकाळीं तोरणागडावर बांधलेलं, पण हल्लीं तुटत असलेलं स्वराज्य-तोरण सांवरण्या करतां किती देवतांनीं आपलीं मंगल-सूत्रं त्याला वाहिलीं असतील ! त्या तोरणाच्या पानांवरून पुसून जाणाऱ्या राष्ट्रीय कल्याणाच्या कुंकुमरेषा पुन्हां ओढण्या करतां किती पतिव्रतांनीं आपल्या कपाळींचं कुंकू आपखुशीनं वाढवलं असेल ! किती तापसीनीं—आपल्या आसवांच्या गंगा यमुना, त्या तोरणाच्या पानांची टवटवी कायम राखण्याकरतां निर्माण केल्या असतील ! रावसाहेब, रणांगणावर होत नसतील इतके आवाज, त्या तोरणापायीं हिंददेवतांच्या पिचणाऱ्या चुड्यांचे झाले आहेत ! आणि असं असतांना, अशा आणीबाणीच्या प्रसंगीं, आपल्या गाफीलपणानं तें गळतं स्वराज्य—तोरण जर एकदम गळून पडलं तर आपल्या—सौभाग्याची होळी करणाऱ्या तपस्विनींचे शाप कुणाच्या मस्तकावर पडतील ?· आपल्याच ना ?

**रावसाहेबः**—माते, चुकलों ! मी माझा मूर्खपणा कबूल करतो. पण मला माफी कर !-[ तिचे पाय धरतो. ]-तूं क्षमा केल्या शिवाय, मी तुझे पाय सोडणार नाहीं !

**लक्ष्मीः**—उठा, रावसाहेब, तुमच्या कोंवळ्या मनावर अधीक प्रहार करायची माझी इच्छा नाहीं. तुमचं तेज जागं झालं ! खरं आर्य-तेज जागं झाल्यावर,

त्याच्या कर्तव्याची जाणीव आपोआपच त्याला होत असते ! सेनानी या नात्यानं रणांगणावर पाऊल टाकायच्या आधीं, आपल्याला एवढंच सांगते कीं ही लक्ष्मी आपल्याला बोलली नाहीं तर तिचं कर्तव्य बोललं—

[ एकदम निघून जाते. ]

**रावसाहेबः**—हें न समजण्या इतका मी मूढ नाहीं !–तात्या, जा–एकदम आपले सारे रिसाले त्या अंबिकेच्या निशाणामागं रणांगणावर जाऊं द्या.– [ तात्या टोपी वगैरे सर्व जातात. ]–गेली, या मूढ रावसाहेबाला शुद्धीवर आणणारी यक्षिणी त्याच्या डोळ्यासमोर निघून गेली ! काय माझी ही दशा ! माझ्या आजपर्यंतच्या तेजस्वी शक्ति आजच कुठं लपून बसल्या होत्या ? देवि, देवि, आजचं तुझं ऋण मी कसं फेडूं ? या जिवाची ज्योत करून तुझी पंचारती करूं कीं माझ्या उसळत्या रक्ताचा अभिषेक तुला घालूं ? मला नवजीवन देणाऱ्या माझ्या माते, माझ्या अधःपातावरून सांवरून धरणाऱ्या माझ्या गुरो, तुझ्या उपदेशाची रसवंती ऐकतांना, मी जिवंत होतों कीं दगडाचा पुतळा होतों ? माते, या क्षणापासून तुझा उपदेश हाच माझा मार्ग–दर्शक ! राष्ट्रीय–मंगल थांटण्याकरतां स्वतःला अमंगल करून घेणाऱ्या शक्तिनों,—तुमच्या दिव्य पायांना साक्षी ठेवून, हा रावसाहेब शेवटची प्रतिज्ञा करीत आहे,–देश फकीर तर राजा कुबेर आणि देश स्वतंत्र तर राजा फकीर हें त्रिकालाबाधित तत्त्व गोंवलेल्या भगव्या झेंड्याला स्मरून हा रावसाहेब आपल्या आयुष्याचा हा शेवटचा पण जाहीर करीत आहे कीं देशाला स्वतंत्र बनवण्याकरतां मी या क्षणीं फकीर झालों; आणि राज-कर्तव्याला विसरणाऱ्या राजाला संन्याशाची शुद्धता देण्याकरतां, या साडेतीन हात देहाच्या [illegible] काटी सोलायला मी याक्षणीं तयार आहें ! ! !

[ पडदा पडतो. ]

स्वस्तिक वाचनालय, नौपाडा - ठाणें.

---

K. V. Dalar.

## लहरी सहावी.

[ स्थळः—ग्वालेर. रणांगणाची एक बाजू. सुंदरलाल शिपायाच्या पोषाखांत कामिनीसह प्रवेश करतो. ]

सुंदर०ः—खरोखर, कामिनी, हे शिपाई लोक कसे जगत असतील देव जाणं! हे कपडे घालल्यापासून एक घटका कांहीं लोटली नसेल, पण एकाद्या विरह-वेच्या पेंवांत मला फेंकून दिल्यासारखं झालं आहे—

कामिनीः—मग टाकून का द्याना तो—

सुन्दर०ः—अग, आपण इथं सुंदरचं मरण पाहण्याकरतां जरी आलों असलों, तरी पण आपल्याला जिवन्त राहायचं आहे, हें आपण लक्षांत ठेवलं पाहिजे! लोक जीव जावा म्हणून शिपाई होतात; मी जीव वांचवण्याकरतां शिपाई झालों आहे! या पोषाखांत मी असलों तर आपल्यांतलाच एकादा शिपाई असेल असं समजून हे लोक माझ्याकडं मुळीं लक्षच देणार नाहींत!

कामिनीः—लालजी, तुम्ही तरी बेरेच दिसता हो! आपल्या जिवाची तेवढी तुम्ही काळजी घेतलीत पण माझ्या—

सुन्दर०ः—अग, तुलां तर या सैन्यांत मुळींच भय नाहीं! मराठे बायकांना रणांगणावर जीव गेला तरी हात लावायचे नाहींत मग जिवन्तपणीं तर नाहींच नाहीं! चल, आपण ह्या दगडा आडून लढाई पाहूं! ती कपाळकरंटी सुंदर एकदा आटोपलेली दिसली कीं एकदम–इथनं सूंबाल्या आणि वोहोल्यावर पाय—

( दगडा आड लपून बसतात. )

सुंदरः—[ मर्दानी वेषांत प्रवेशून ]–कोण ? कोण आहे तें ?;

सुंदर०ः—[ कामिनीस ] अरेवापरे–कामिनी, आलां ग ? लग्नघटके ऐवजीं–आपली शेवटची घटका भरली वाटतं!

सुंदरः—कायरे कोण आहे ?

कामिनीः—[ हळूंच सुंदरलालास ] चला--हळूंच पळ काढतां कां ?

सुंदर०ः—( कामिनीस ) अग, त्याचीच तर भ्रांत आहे! क्षण जायची जिथं वानवा आहे तिथं पळ कसा जाणार ? पण थांब, मी शिपायाचा पोषाख

केला आहे नाहीं कां ? मुंदरनं पथ्याचे हाल आपल्याला शिकवलेच आहेत; शिवाय झांशींत इंग्रजी सैन्यांत जे हुकूम सुटत असत, ते मी कैदी असतांना पाठ केलेत ! त्या साऱ्याची उजळणी इथं करतों ! एकादा बाजारबुणगा असेल तर पळेल भिऊन—

[ पुढं होऊं लागलो; कामिनी त्याला बसवते. ]

**कामिनीः**—अहो मराल उगीच ! हातीं तरवार नाहीं—

**सुंदर०ः**—तरवारीचाच हाल आहे तिथं हातीं तरवार काय करायची ?

**कामिनीः**—[ स्वागत ] अगबाई हे सुद्धां भडकले—

**मुंदरः**—उत्तर कां नाहीं ?

**सुंदर०ः**—( स्वगत ) काय वरं नियम !-हां-उजव्या पायाची येडी आन डाव्या पायाचा चंपा ठेऊनशान् चक्कावानी गर्रकन् फिरायचं ! लेफ्ट टर्न— ( उजवीकडे वळतो. ) अरे हीतर आमची बोलभांड ! आतां दाखतोंच पराक्रम ! हॉल्ट साल्यूट !—( सलाम करतो )—आटेंशन—लाय डौन ! ( पडतो. )

**मुंदरः**—कोण ? इकडं ?

**सुंदर०ः**—होय, इकडंच वरं ! पण अजून मेली कशी नाहींस ? मी इतकं शौर्य गाजवलं तरी तूं अजून जिवन्त ह्मणजे काय गोष्ट आहे ?

**मुंदरः**—हें काय शौर्य ! असल्या शौर्यानं फुकट कुठं तरी मरून जाल ! हा इंग्रजी पोशाख जर कुणी इकडच्यानं पाहिला तर शत्रू ह्मणून फटकन् गोळी घालतील—

**कामिनाः**—( धांवत पुढें येऊन ) तर मग ऐका—माझं ऐका ! या टाकून ते कपडे; वाटल्यास मी ते अंगावर घालते—पण तुह्मी ते टाकून द्या—

**सुंदरः**—[ स्वागत ] अहाहा, कामिनी—याच तुझ्या भोळ्याप्रेमानं मला जिंकलं ! आज माझ्या आयुष्याच्या शेवटच्या दिवशीं मी स्वतः तुझा प्रेमठेवा तुला देणार—

**सुंदर०ः**—हा इंग्रज शिपायाचा पोशाख हें मी विसरलों ! शत्रूकडूच प्रेत होण्याचा प्रसंग येऊ नये ह्मणून एका बिनवारसी प्रेताचा पोशाख अडकवला आणि आतांपर्यंत जीव वाचवला पण—

मुंद्र:—आतां मात्र तो जाण्याचा संभव आहे. या पोशाखांत तुह्मी असतांना मी तुमच्याशीं बोलत असल्याचं जर कुणी पाहिलं, तर मलाच शत्रूशीं खलबत करीत आहे म्हणून गोळी बसेल ! काढा–काढा ते कपडे–नाहींतर—

कामिनीः—अगबाई—नको ग त्यांना मारूस; मला मार वाटल्यास ! लालजी, काढाहो ते कपडे हें आपल्या लग्नांतलं विघ्न आहे–

मुंद्र:—अग मेले, मी तर आज मरणारच आहे पण तूं या मूर्तिमंत विघ्नाशीं का लग्न लावणार ? हे कपडे यांच्या अंगावर असले ह्मणजे विघ्नांना कांहीं तोटा नाहीं–

सुंद्र०:—चूप !

मुंद्र:—हं—खबरदार ! मूर्खपणाचं झालं एवढं सोंग पुरं झालं—

सुंद्र०:—अरेरे–अधःपात–धर्माचा अधःपात ! या ज्वालामुखीचं तोंड लिंपायला हिमालयचा बोळा याच्यांत घालूं कीं ब्रह्मांडाचा बोळा करूं ? मी शिपायी बनल्याचा हिला कांहींच कसा अभिमान नाहीं ! नुसता लष्करी पोषाख केलेल्या रणमर्दांच्या गळ्यांत फुलांचे झेले आणि गोंडस हातांच्या माळा घालून, त्यांच्या वरून जान कुर्बान करून टाकणाऱ्या रसिक रमणी कुणीकडं आणि आमच्या या हिंदी हिडिंबा कुणीकडं !

मुंद्र:—मी तुमच्या कल्याणाची गोष्ट सांगतें !

सुंद्र०:—तूं ज्या दिवशीं माझ्या गळ्यांत पडलीस त्याच दिवशीं माझं जन्माचं कल्याण झालं आहे !--हे घे--काढले कपडे--( डगला काढून टाकतो. )

कामिनी:—झालं बाई आतां तुझं समाधान ?

मुंद्र:—हो झालं; आतां वाटल्यास हातीं तरवार घ्या आणि तुमचं शौर्य दाखवायला चला माझ्याबरोबर--

मुंद्र०:—मी लढूं शकतों ! पण आतां मी घाबरलों आहें ! शिवाय तुझ्यासारख्या बायका जर पुरुष होऊन फिरूं लागल्या तर, आह्मी घरींच बसलं पाहिजे—

मुंद्र:—ठीक आहे; तसंच करा. कामिनी, इकडं ये·-अग भिऊं नकोस–

कामिनी:—आणखी मला आतां तूं काय करणार ?

मुंद्र:—अगदीं तुझ्या मनासारखं–

**कामिनीः**—ह्मणजे ?

**मुंदरः**—तुला आजपर्यंत मी तुझी वैरीण वाटत होतें ना ? अग--अशी भितेस काय ?--पण आज मी ती तुझी कल्पना खोटी ठरवणार आहे.

**कामिनीः**—हें तूं काय बोलतेस ?--मला तर कांहींच समजत नाहीं—

**मुंदरः**--तुझा हात दे माझ्या हातीं ह्मणजे समजेल तुला !--[ कामिनी--तिच्या हातांत हात देते ]--मी आज प्रेमानं हा हात इकडच्या हातांत देते !

( सुंदरलालच्या हातीं हात देते )

**सुंदर॰ः**—शुभ मंगल सावधान ! मुंदर सावध आहेस ना ?

**मुंदरः**—अगदीं पूर्ण सावध आहे.

**कामिनीः**—माझी देवी आज नवसाला पावली ! मुंदरबाई, मी तुमच्या पाया पडते ! तुह्मी किती हो चांगल्या आहांत ! किती तरी गोड--किती तरी काय बरं--काय बरं आहात तुह्मी !

**मुंदरः**—कामिनी, यांत मी विशेष तें काय केलं ? माझ्या आयुष्याच्या शेवटच्या दिवशीं, मी तुझा आणि यांचा संयोग घडवून आणला येवढंच ना ? उद्यां जें होणार होतं तें आज झालं—

**कामिनीः**—हें काय तुह्मी बोलता ?

**मुंदरः**—दैवानें आज दावा साधला ! आज आह्माला मरण्याशिवाय दुसरा मार्गच नाहीं ! जाते मी; बाईसाहेबांचा जो निश्चय तोच माझा निश्चय ! जगून वांचून जर आलेच, तर तुमच्या प्रेमांत मला जागा द्या एवढंच सांगते—

**कामिनीः**—मग बाई तुह्मी जाऊंच नका कशा ! मला काय माहीत कीं तुह्मी इतक्या प्रेमळ आहात ह्मणून ! मी तुह्माला आजपर्यंत उगीच टाकून बोलले ! पण आतां तुमच्या आज्ञेंत वागेन--मग तर झालं ना ?

**मुंदरः**—मला तुझ्या ह्मणण्याप्रमाणं वागतां येत नाहीं ! बाईसाहेब ह्मणजे माझा जीव आहेत. जा आतां इथून आणि सुखानं संसार करा !--[ पडद्यांत रणशिंग वाजतें ) तें ऐका--रणशिंग वाजलं ! बाईसाहेबांचा रिसाला निघाला ! जाते मी. पतिराय, मी आजपर्यंत आपल्याला छळलं, पण पतीच्या दगडाचा देव बनवण्याकरतां, त्याच्या पत्नीनं बेमुर्वतपणाची टांकी अवश्य घेतली पाहिजे—या भावनेनं माझं आजपर्यंतचं वर्तन झालं,—त्याची क्षमा करा !—( जाते. )

**सुंदर०:**—अरे, तूं इतकी समजूतदार, शहाणी होतीस कां ? गेलीस–जा. कामिनी, मला काय होतंय ह्मणून सांगूं ?

**कामिनी:**—प्रसंगच विलक्षण ! देव तिला सद्गती देईल !

**सुंदर०:**—हुश्श ! या सुंदरलालच्या संसाराचा हास्यरस शेवटीं असा शोक-रसांत मिळावा ना ? चल, कामिनी, झालं तें झालं ! गतं न शोचयेत् ! चल–आतां पुढच्या उद्योगाला लागलं पाहिजे ! माणसं आहोंत ना आपण–

**कामिनी:**—चला– [ जातात. ]

[ पडदा उघडतो. ]

---

# अंत्य लहरी.

[ स्थळ:–ग्वालेर. रणांगण. लक्ष्मी मर्दानी वेषांत घोडीवर बसली आहे. पुढें वाहणाऱ्या जलप्रवाहाला बुजून घोडी अडून राहिली आहे असा देखावा. ]

**लक्ष्मी:**—चल, बिजली–पुढं चल ! काय ? रणांगणांतून पाय काढायला तुझी तयारी नाहीं ? हो हेंच कारण; नाहीं तर या दीडहात प्रवाहाला पाहून तूं कां बिचकतीस् ? रक्ताच्या नद्या ओलांडून जाण्याकरतां थैमान घालणाऱ्या तुझ्या पायांना या एवढ्याशा प्रवाहाचं भय कां वाटावं ? " महाराणी लक्ष्मीनं रणांगणांतून पळ काढला " असा डाग मला लागूं नये, ह्मणून तर तूं अडून राहिली नाहींस ना ?–" या उघड्या जगांत, या अभागी जिवाला आतां जागा नाहीं " असं स्वप्न तर तुला पडलं नाहीं ना ? " पतिहीन, मातृहीन, पितृहीन अशा या मरत्या जिवाच्या जळत्या आशा, त्याच्या बिनवारशी प्रेताबरोबर, ग्वालेरच्या या रण–भूमींतच गाडल्या गेल्या पाहिजेत "–असं भविष्य तर तुला समजलं नाहीं ना ?–नाहीं, पुढं पाऊल टाकायला मी तुला आतां मुळींच सांगणार नाहीं–

[ पडद्यांत,—बाईसाहेब, जीव वांचवा, पळा–पळा.– लक्ष्मी–घोडीवरून उडी टाकते. घोडी पळून जाते. ]



लक्ष्मी०:—या—एक या—हजार या !                [ पृष्ठ ९७ ]

जीव वांचवूं ? आतां जीव वांचवून काय करायचं ? ज्या जिवाच्या आशेनं जगांत जगायचं, तो स्वातंत्र्याचा जीव जिवाला पारखा झाल्यावर, जगण्यांत काय हशील ? कर्तव्यांत निराश झालेला प्राणी, आपल्या मातीमोल आशा मातींत मिळाल्या असतील, या आशेनं, आपल्या जिवाची माती करून घेतो–धुळीला मिळतो '–[ शत्रूचे कांहीं लोक येतात. लक्ष्मी तरवार उपसते. ]–या–एक या–हजार या ! कहरी प्राण्याच्या करारा कदरेंत नसेल इतका जहरीपणा निराश जिवाच्या निर्वाणीच्या तडफेंत असतो ! !

[ लढतात. लक्ष्मीला कांहीं वार होतात पण ती शत्रूला पिटाळून लावते. ]

संपला–आज या महामानीं लक्ष्मीचा अवतार संपला !–रणांगणांतून पळ–छेः ही कल्पना सुद्धां या हृदयाला आतां कशी जाळत जाते ! माझ्या लांछनाची जाणीव मला करून देणारी बिजली–कुठं आहे ?–गेली, या लक्ष्मीच्या पतन पावणाऱ्या मनाचा उद्धार करणारी स्वर्गीय बिजली, आपलं कर्तव्य करून चालती झाली ! नाहीं–बिजली, या रणांगणांतून मी पळ काढणार नाहीं ! तर माझ्या भवितव्यतेशीं मी अंतपर्यंत झगडणार !–माझ्या बाबानीं आनन्दानं–अगदीं हंसत फासावर आपल्या दिव्य आत्म्याची स्वतंत्र समाधी बांधली. अश्रूचा एकही थेंब, पश्चात्तापाची किंचित्‌हि छटा, त्यांच्या डोळ्यांत दिसली नाहीं, असंच सुंदरलालनं नाहीं का सांगितलं ? मग मी त्याच वीररत्नाची कन्या ना ? या लक्ष्मीच्या कपाळीचा सौभाग्याचा टिळा गेला, पण त्याच्या ठिकाणीं नामर्दपणाचा टिळा माझ्या कपाळीं आला असता काय ? नाहीं, देवानं पांढरं फटफटीत पाडलेलं हें लक्ष्मीचं कपाळ, आतां देवाच्या देवाला सुद्धां कलंकांत करतां येणार नाहीं–

( रामचन्द्रराव व सुन्दर आनन्दरावला घेऊन प्रवेशतात. )

**रामचंद्रराव**:—सरकार, बालराजाचं रक्षण करा ! शत्रूनं आपल्याला पाहिलं. पळा–आम्ही शत्रूला थोपवून धरतों–

**सुंदर**:—बाईसाहेब, चला -कुठं तरी दडून रहा–

**लक्ष्मी**:—वेडे जीव ! या जित्या जिवाची तुटती ढाल या लेंकराचं रक्षण आतां कसं करणार ? परमेश्वरी इच्छा असेल तर मेवाडपती रणधीर प्रतापानं सोसले नाहींत, इतके भयंकर हाल सोसून सुद्धां हा जिवन्त राहील !

**सुंदर**:—बाईसाहेब, बालराजावरचं आजपर्यंतचं प्रेम आजच कुठं गेलं ?

लक्ष्मीः—या हृदयांतच तें आहे ! हातांतल्या समशेरीनं हें हृदय उकलून पहा, माझ्या आनन्दाच्या प्रेमाचा पूर यांतून बाहेर येईल ! हा कठोरपणा माझ्या पवित्र भवितव्यतेचा ! कर्तव्यामागं पळत सुटलेल्या-चिमुकल्या जिवाला, त्याची भग्न भवितव्यता जर समजती, तर त्याचे चालत्या काळांत गुरफटलेले पाय विरुद्ध दिशेनें ओढ घेऊं लागते !! पण ही ओढाताण टाळण्याकरतां, जगाच्या मानवी आयुष्यांतल्या इतिहासांतली, वर्तमान कालावर सत्ता चालवणारी, भूत-कालीन भवितव्यता-परमेश्वरानं भविष्यकालाच्या अज्ञात पडद्या आड—केलेली असते—

सुंदरः—चला, वेडा विचार सोडून द्या. हें ठिकाण सुरक्षीत नाहीं—

लक्ष्मीः—ह्मणजे, मी रणांगणांतून पळ काढूं ?

रामचंद्ररावः—सरकार पळा—

सुंदरः—अगबाई, ते पहा शत्रूचे लोक आले—

लक्ष्मीः—तर मग माझा आत्मयज्ञ जवळ आला ! आपल्या देशबांधवांच्या गैवानीपणामुळं कोंकावलेली भवितव्यता बलिष्ठ कीं निश्चयी जिवाची प्रखरता बलिष्ठ यांचा निर्णय आतांच होऊन जाईल !—रामचन्द्रराव, बाळाचं रक्षण करा—

( दुसरे शिपायी येतात. सर्वजण लढूं लागतात. )

आनंदः—आईग आई—

लक्ष्मीः—बाळ, तुझी आई आतां तुला स्वर्गांत भेटेल—

सुंदरः—बाईसाहेब, मेले हो मेले--

[ वार होऊन मरून पडते. ]

लक्ष्मीः—[ लढतांना ] मेलीस ? देव तुला सद्गती देईल ! मलाहि इथं फार वेळ रहायचं नाहीं--

( इतक्यांत रक्तानं चिंब झालेला रावसाहेब प्रवेशतो. दुसरे पळतात. लक्ष्मीस वार झाल्यामुळें ती विकल होऊन एका शीळातळास टेंकून पडते. )

आनंदः—आई--

लक्ष्मीः—रावसाहेब, बाळाला आपल्या पदरांत घ्या !-रामचन्द्रराव, त्याच्या रक्षणाची जबाबदारी आतां तुमच्यावर आहे ! माझं शरीर शत्रूच्या हातीं लागूं देऊं नका !

रावसाहेबः—देवा, काय पाहतों मी ? लक्ष्मीताई, काय तुझी ही दशा !

लक्ष्मीः—रावसाहेब, आतां रडण्यांत काय अर्थ आहे ! तुह्मी कशा-कशा-करतां ह्मणून आतां रडणार ? या लक्ष्मीच्या साडेतीन हात देहाच्या चिंध्या झाल्यामुळं, तिचा प्राण आतां स्वर्गात जाणार ह्मणून रडणार,-आजपर्यंत हजारों जिवांचे बळी निष्कारण रण-देवतेला गेले ह्मणून तुमच्या डोळ्यांत पाणी येणार कीं स्वातंत्र्याला मुकून आपलीं तोंडं मातींत खुपसण्याचा प्रसंग आपल्यावर आला ह्मणून तुह्मी अश्रु ढाळणार ? तुह्मी रडूं लागाल तर तुह्माला तुमच्या अश्रुनं सारं ब्रह्मांड भिजवून टाकावं लागेल ! रडण्याची वेळ ही नव्हे—

रावसाहेबः—बोल, रणदेवते-बोल; या वेळचा तुझा प्रत्येक शब्द मी माझ्या हृद्पटावर लिहून ठेवीन ! आणि तो उपदेश साऱ्या जगाला सांगेन-

लक्ष्मीः—तर मग ऐका ! आज जो तुमच्यावर रडण्याचा प्रसंग आला तो तुह्मी नामर्द ह्मणून नाहीं ! तुमच्या काळावर तुह्माला स्वार होता आलं नाहीं याचं कारण तुमचा कमकुवतपणा असं नाहीं, तर या चलचाल जगाच्या मोहिनीमुळं तुह्मी बेफिकीर बनलात ह्मणून ! कोडो कौरवांना धूळ चारणारे पांडव पांचच होते ! पण पांच पांडवांचा इतिहास ह्मणजे मानवीं आयुष्याला दिव्यरूप देणारी पवित्र पंचगंगा आहे ! रावसाहेब, ज्या क्षणीं भगवान् कृष्णाच्या कृपाकवचाखालील-अर्जुनाचा आत्मविश्वास, धर्माची धर्मनिष्ठा, आणि नकुलसहदेवाचा समवर्तिपणा यांनीं नटलेल्या द्रौपदीच्या नीतिमय पुण्याईच्या प्रभावळीचा आपल्यांतून लोप झाला, त्याच क्षणीं भीमाची शक्ति असून सुद्धां आपण दुर्बल ठरलों-

रावसाहेबः—हो-ठरलों-खरंच ठरलों;-नाहीं तर आज खालीं मान घाला-यचा प्रसंग कधींच आला नसता-

लक्ष्मीः—तर मग जा; या आर्यावर्ताच्या माझ्या आयाबहिणींना या लक्ष्मीनं आपल्या मृत्यु-शय्येवरून सांगितलेला हा शेवटचा निरोप कळवा-कीं आपल्या पतींना तेजस्वी पांडव बनवण्या करतां,-त्यांच्या मेलेल्या सद्गुणांना

स्वस्तिक वाचनालय